# पुनर्वसन

मनोहर ( बी.बी. देसाई )



ई प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

eleventh floor, eternity

eastern express highway

Thane, 400604

प्रकाशन : ८ ऑक्टोबर २०१५

©esahity Pratishthan®2015

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा

वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# पुनर्वसन

मनोहर
(बी. बी. देसाई)

प्रकाशन

**पुनर्वसन (कादंबरी)** । मनोहर तथा बी. बी. देसाई

**Punarvasan (Kadambari)** I Manohar (B. B. Desai)

---


- © नंदादेवी बी. देसाई


'संतोष' सुखसागर कॉलनी,
(जैन मंदिर गल्ली)
गणेशपूर – बेळगाव – ५९११०८
भ्रमणध्वनी – +९१९९४५७६३१२६
+९१८१२३२१४३२६
Email : bbdesai11@gmail.com



- **पहिली आवृत्ती : १ जानेवारी २०१५**

- प्रकाशक
नीता नितीन हिरवे
**।। संवेदना प्रकाशन ।।**
बी/१८, सुखकर्ता अपार्टमेंट,
मोरया गोसावी समाधी मंदिराजवळ,
चिंचवडगाव, पुणे – ४११ ०३३
भ्रमणध्वनी : ९७६५५५९३२२
Email : sanvedanaprakashan95@gmail.com

- मुखपृष्ठ : पोरे ब्रदर्स
- अक्षरजुळवणी : शुभांगी एन्टरप्रायजेस, पुणे.
- मुद्रितशोधन : राजेश हेंद्रे
- मुद्रक : प्रतिमा ऑफसेट,
१/बी, देवगिरी इस्टेट,
कोथरूड, पुणे ४११ ०३८.
- मूल्य : १२५ /–

# अर्पितो तव चरणी...

जन्मलो जरी मातेच्या कुशीत मी ।
वाढलो खरा मातृभूमिच्या छायेत मी ।।

आईच्या गर्भात मिळाली जरी जगण्याची उर्जा।
परि अजाणपणी झाली मज पोरकेपणाची सजा ।।

मायेची उब देण्या असंख्य हात सरसावले ।
मातेच्या ममतेने त्यांनी मज सावरिले ।।

मायभूमी बनली पालक यशोदा माता ।
'बेळवट्टी'मातेप्रती वदतो ही कृतज्ञता ।।

खेळलो, बागडलो, घडलोही तुझ्या कटी, खांद्यावर ।
सुख, दु:खाची शिदोरी बिंबविली मनाच्या पडद्यावर ।।

तुझीच कथा, व्यथा आज शब्दरुपे मी गुंफीली ।
अर्पितो तव चरणी माय, मातृभूमी 'ही' पुष्पांजली ।।

**– मनोहर (बी. बी. देसाई)**

# लेखक परिचय

नाव : मनोहर तथा बी. बी. देसाई

जन्म : १-५-१९५४

जन्मस्थळ : बेळवट्टी, ता. जि. बेळगाव

सध्याचा पत्ता : ६५१, 'संतोष'
सुखसगर कॉलनी (जैन मंदिर गल्ली),
गणेशपूर - बेळगाव (कर्नाटक) - ५९११०८

शिक्षण : एम. ए. बी.एड्.

व्यवसाय : १९७६ ते २००४ माध्यमिक शिक्षक
२००४ ते २०१४ - माध्यमिक शाळेत मुख्याध्यापक
मे २०१४ - सेवेतून निवृत्त

लेखन : दैनिक 'सकाळ' व 'बेळगाव वार्ता' मधून विविध
विषयांवर २० वर्षे लेखन
ज्वाला, जिव्हाळा, अमरदीप दिवाळी अंकातून कथा,
लेख व कविता प्रसिद्ध
अमरदीप दिवाळी अंकाचे सात वर्षे संपादक म्हणून कार्य
हव्यास : लेखन, वाचन, विविध विषयावर व्याख्याने,
सामाजिक कार्यात सक्रीय सहभाग

।।ओम् श्री साई।।

## लोक संघर्षाचा वास्तव वेध – 'पुनर्वसन'

वर्षापूर्वी श्री बी. बी. देसाईसर बोलले होते की, 'एक कादंबरी लिहितोय. पूर्ण झाल्यावर घेऊन येतो.'

देसाईसर म्हणजे आंतरबाह्य निर्मळ आणि प्रेमळ माणूस. गुरुवर्य परशुरामभाऊ नंदिहळ्ळींच्या तत्त्वानुसार अत्यंत प्रामाणिकपणे वाटचाल करणारा समाजसेवी शिक्षक! दोन वेगवेगळ्या गावांतील दोन हायस्कूलमध्ये प्रत्येक दिवशी तास घेणारा ध्येयवेडा! प्रत्यक्ष शिक्षणमहर्षी गुरुवर्य नंदिहळ्ळीसर हे प्रत्येक दिवशी वेगवेगळ्या गावांतील तीन–तीन हायस्कूलमध्ये तास घेत असत. त्यांचीच प्रेरणा देसाई सरांनी घेतली आणि आपल्या क्षमतेनुसार कार्यरत राहिले.

शिक्षण आणि समाजसेवा या बरोबरच देसाई सरांना लेखनाचेही अंग आहे. साधे, सोपे; परंतु अर्थपूर्ण लिहिण्याकडे त्यांचा कल. वृत्तपत्रातून त्यांचे नैमित्तिक लेखन प्रकाशित होई. यातूनच ते कादंबरीकडे वळले आणि प्रस्तुतची उत्तम कादंबरी लिहिली.

लेखक जे जीवन जगतो तेच जेव्हा चित्रित करतो, तेव्हा ते लेखन श्रेष्ठ दर्जाचे आणि वास्तवमूल्य असणारे होते. देसाईसर वस्तुनिष्ठपणे जीवनाचा आलेख मांडतात. आपण जे भोगले त्याचा वास्तववादी वेध घेतात. सत्यनिष्ठेमुळे या समग्र लेखनाला एक प्रखर धार प्राप्त होते.

अत्यंत व्यापक असा जीवनपट या कादंबरीत येतो. ही धरणग्रस्तांची कथा आहे. विस्थापितांची कर्मकहाणी आहे. कोणाच्या तरी सोईसाठी कोणाला तरी दु:ख भोगावे लागते. त्याचे चित्रण अत्यंत प्रत्ययकारकतेने इथे केले आहे.

ही सारी हकिगत खरी आहे. सत्य घटनांवर आधारित ही कादंबरी आहे.

राकसकोप धरण बांधल्यामुळे ज्यांच्या शेत-जमिनी, घरे, जागा गेल्या त्या सर्वांची ही कारुण्य कथा आहे.

विस्थापित गावातील जनतेची मानसिक स्थिती प्रत्ययकारितेने इथे चित्रित झाली आहे. लहान मुले, स्त्रिया, सामान्य जनता, संतप्त तरुण, समजूतदार वृद्ध, मतलबी नेते आणि सरकारी अनास्थेचे धोरण या सगळ्या आणि विविध पातळ्यांवरील संघर्षाचे भेदक चित्रण या कादंबरीत येते. ते अस्वस्थ करते.

परिपूर्ण विस्थापित ते अपरिपूर्ण पुनर्वसनापर्यंतचा इतिहास इथे वेधकतेने मांडला आहे. एकीकडे सुधारणा आणि दुसरीकडे विस्थापितांचे उद्ध्वस्तीकरण यांचे शोकसंतप्त पडसाद या कथेत सतत उमटत राहतात. विस्थापित होणार या वार्तेपासून अपुऱ्या पुनर्वसनाच्या फुफाट्यात पडणाऱ्या जनतेची ही हृदयद्रावक समग्र गोष्ट आहे. अगदी छोट्या अवकाशात कादंबरीकाराने मोठा आणि विस्तृत आशय भरला आहे.

एक दिवस आकस्मिकपणे ग्रामपंचायतीचा पट्टेवाला मल्ल्या सगळ्या गावाला धक्कादायक बातमी सांगतो – 'कालच वरच्या सायबाची आर्डर यलेय. व्हळेवर धरण बांधणार हाईत... गाव, घरं नि शातबी पाण्यात जाणार हाय म्हणी !'

या छोट्याशा गावात या वार्तेने भूकंपच होतो. गाव हादरून जाते.

साऱ्या गावाच्या मन:स्थितीचे वर्णन लेखकाने मार्मिकपणे केले आहे–

' गावावर उदासीनतेची छाया पसरली. सकाळच्या प्रसन्न वातावरणात खेळणाऱ्या मुलांचा गोंगाट गळा दाबल्यागत बंद झाला. पहाटेचा पक्ष्यांचा किलबिलाट कर्कश्श वाटू लागला. पिंपळाच्या पारावर गप्पागोष्टींत रमणारा थोरा-मोठ्यांचा घोळका, सवंगड्यांना हाका मारीत बैलजोडीसह शेतवाडीकडे निघालेले शेतकरी ...... सगळ्याच गोष्टी अदृश्य झाल्या. साऱ्यांना चिंता लागली

ती भविष्याची !’

आजपर्यंत अनेक पिढ्या ज्या घरात राहिल्या ती घरे सोडून द्यायची, ज्या शेतीतील पिकांवर या पिढ्या जगल्या ती शेती त्यागायची! घरे, शेती सगळेच पाण्याखाली जाणार... आशा-आकांक्षेवर पाणी फिरणार...

पाणी याचा अर्थ जीवन!

पण येथे पाण्यामुळे जीवनच उद्ध्वस्त होते आहे.

एकाची मजा आणि दुसऱ्याला सजा, असा क्रूर प्रकार होतो आहे.

शहराला सुरळीत, नियमित आणि भरपूर पाणीपुरवठा व्हावा म्हणून धरण बांधले जाणार आणि त्या साचलेल्या पाण्याखाली घरे, जमिनी आणि थोडक्यात मानवी जीवनच बुडणार!

अगणित वर्षे जे या जागेत राहिले, आपला इतिहास लिहिला, संस्कृती निर्माण केली... ते आता विस्थापित होणार!

लोक संतप्त होतात. पण या संतापाचे कृतिशील विद्रोहामध्ये रूपांतर होत नाही.

हळूहळू लोक मान्य करतात. परिस्थितीला सामोरे जायचे ठरवतात. शेजारच्याच टेकडीवर नवी जागा दिलेली असते. जिथे जुन्या घरातील दरवाजे - खिडक्या - चौकटी वगैरे जेवढे शक्य आहे तेवढे सामान हृदयावर दगड ठेवून नेऊ लागतात.

नवा संसार थाटण्याचा प्रयत्न आणि प्रयोग सुरू होतो ... मानवी जीवनाची फरफट लेखकाने प्रभावीरीत्या मांडली आहे. वाचकाला कासावीस करण्याचे सामर्थ्य या लेखनामध्ये आहे.

या विस्थापितांवर अन्याय झाला आहे. परंपरागत आणि वारसा हक्क असणारी घरे-शेती यावर पाणी सोडून नव्या जागी स्थलांतर करावे लागते.

मोठे संकट आहे. प्रथम राहायला जागा हवी. मग त्या जागेवर घर बांधायला हवे. त्यासाठी पैसे हवेत पण त्यातले काहीही नाही... भयंकर परिस्थिती !

पण निसर्गाशी झगडणारी ही माणसे परिस्थितीने गांजलेली असली, तरी मनाने पिचलेली नाहीत. अशा परिस्थितीतही मन घट्ट करून झुंजीसाठी प्रेरणा देणारी वयोवृद्ध माणसेही इथे आहेत. या कादंबरीतील बाय मोठ्या जिद्दीने सांगते -

‘न्हाय पोरा, आसं हातपाय गाळून चालायचं न्हाय. राती मागनं दीस यतायच न्हवं ! तस दुःखामागनं सुख हे यत्ताईच बघ. आजचे कठीण दीसबी निघोन

जातील ... जरा धीर धरूस पायजे. देवानं पॉट दिलंय, तसे हातपायबी दिल्यात. 'तो' साऱ्यांची परीक्षा घेताय. 'त्याच्या'वर इस्वास ठेवून जिद्दीनं कामास लागोस पायजे. सारं काय यवस्तीत व्हईल बघ.'

बायचं हे तत्त्वज्ञान लाखमोलाचं आहे. नवी ऊर्जा देणारं आहे. नवा शक्तिस्रोत निर्माण करणारं आहे. प्रेतातही प्राण फुंकून त्याला चैतन्य प्रदान करणारं आहे.

ग्रामीण भागातील ही बाय शिकलेली नाही. पण तिने जीवनाचं पुस्तक वाचलं आहे. तिने व्यक्तिरेखा लिहिल्या नाहीत पण तिने प्रत्यक्ष माणसे घडवली आहेत. तिला अक्षरे ठाऊक नाहीत, पण तिने अक्षरज्ञान प्राप्त केले आहे. निसर्ग, पृथ्वी आणि भौगोलिक घटनांचा तिचा अभ्यास आणि आकलन मानवाला प्रेरित करण्यासाठी ती वापरते. म्हणून तर जसा रात्रीनंतर दिवस येतो तसे दुःखामागून सुख निश्चित येते... रडू नका... लढा !! असा तेजस्वी संदेश ती देते.

ग्रामीण भागातील या दुर्दम्य व्यक्ती म्हणजे कुऱ्हाडीच्या घावालाही दाद न देणाऱ्या बाभळीच्या गाठी आहेत.

सरकारी व्यवस्थाही किती अलिप्त आणि तटस्थ राहाते, याचेही भेदक चित्रण ही कादंबरी करते.

लाखो शेतकरी आत्महत्या करताहेत, पण सरकार त्या बाबतीत पोकळ घोषणाबाजी करण्यापलीकडे काहीच करीत नाही, हे भयंकर चित्र आज आपण पाहतो आहोत. या कादंबरीतही याचा प्रत्यय येतो.

आश्वासन देणे आणि निवडून आल्यावर ती सोइस्करपणे विसरून जाणे, हे या नेतेमंडळींच्या इतके अंगवळणी पडले आहे की, त्यांना त्याचे काहीच वाटेनासे झाले आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षणमहर्षी गुरुवर्य परशुरामभाऊ नंदिहळ्ळी यांची या कादंबरीतील व्यक्तिरेखा खूपच प्रभावी झालेली आहे. त्या वेळी ते आमदार होते. त्यांचा मूळ पिंड समाजसेवेचा. पण त्यांनी प्रचंड कार्य केले ते शिक्षण क्षेत्रात!

'विश्वभारत' या शिक्षण संस्थेची स्थापना करून वाघ-अस्वलांनी भरलेल्या घनदाट जंगल भागात, दूरवरच्या ग्रामीण प्रदेशात त्यांनी शाळा सुरू केल्या आणि लाखो विद्यार्थ्यांचे, पर्यायाने त्यांच्या कुटुंबीयांचे आणि प्रदेशाचे कल्याण केले. या कादंबरीत शिक्षणमहर्षी अवतीर्ण होतात ते प्रामुख्याने आमदार म्हणून. श्री देसाईसरांना त्यांचा प्रत्यक्ष सहवास आणि मार्गदर्शन लाभल्यामुळे त्यांचे सुंदर चित्र त्यांनी रेखाटले आहे.

अजून हयात असलेल्या व्यक्तींचे कादंबरीत चित्रण करणे, हा तसा मराठी वाङ्मयात नवा प्रयोग म्हणायला हरकत नाही.

देसाई सरांनी ही कथा अनेक पातळ्यांवर रेखाटली आहे. गावचे राजकारण, सरकार, आमदार, इतर पुढारी, श्रीमंती – गरिबी, श्रद्धा – अंधश्रद्धा, निसर्ग, पिके, नद्या, गावे आणि शहरे, दुःखातही आनंद शोधणारी वृत्ती, झुंजण्याची कणखरता, सारी संकटे सोसून जीवनाला सार्थ बनविण्याची विलक्षण धडपड, याबरोबरच गावातील भजन, शिक्षण, नाटके यांच्यासह एक समग्र ग्रामीण जीवनविश्व उभे केले आहे.

सीमाभागामध्ये लेखक अनेक आहेत, पण कादंबरीकार फारच कमी आहेत.

देसाई सरांनी ही उणीव कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांची ही पहिलीच कादंबरी आहे. मी त्यांचे मराठी वाङ्मय प्रांतात एक यशस्वी कादंबरीकार म्हणून स्वागत करतो.

**– प्रा. डॉ. विनोद गायकवाड**

डीन, फॅकल्टी ऑफ आर्ट्स,

राणी चन्नमा विद्यापीठ, बेळगाव

भ्रमणध्वनी– ०९९४५०१५३६४

## मनोगत

'पुनर्वसन' ही माझी पहिली कादंबरी, आपल्या चरणी अर्पण करताना मला अत्यानंद होत आहे. मी ग्रामीण जीवनात जन्मलो, वाढलो नि घडलोही. खेड्यातील लोकांच्या रीतिभाती जवळून पाहिल्या, अनुभवल्या! जे पाहिलं, अनुभवलं नि भावलं त्याचं चित्रण कुठे तरी करावं अशी कित्येक दिवसांची मनात एक इच्छा होती. या पुस्तकाच्या रूपात आज ती पूर्ण करण्याचा मी प्रयत्न केला आहे.

खेड्यातील लोक निसर्गाच्या स्वच्छ, सुंदर, निरागस सान्निध्यात राहतात. परिस्थितीशी जुळवून घेऊन सुखात जगण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. परंतु अज्ञान, अंधश्रद्धा, जुन्या चालीरीती आणि दारिद्र्य यांच्या जोखडात ते अडकल्याने अनेक संकटांना त्यांना सामोरे जावे लागते. खाच-खळग्यांतून वाटचाल करताना कधी त्यांचा पाय मुरगळतो, कधी ठेच लागते; तर कधी त्यांच्या अनवाणी पायांत काटे रुततात. त्यातून

त्यांना असह्य यातना भोगाव्या लागतात; जीवन नको वाटते. तरीही एका अनामिक ओढीने जगण्याची त्यांची धडपड चालूच असते.

ग्रामीण भागाची सर्वसाधारण जीवनशैली सारखीच असली, तरी बेळवट्टी गावचं दु:ख काहीसं वेगळं होतं. त्यांना आपलं गाव-घर, शेतीभाती धरणात गमवावी लागली. सर्वजण बेघर झाले नि बहुसंख्य भूमिहीन झाले. 'भूक' हा त्यांचा मुख्य विषय बनला. ती भागविण्यासाठी त्यांची अविरत धडपड सुरू झाली. पांढरपेशा लोकांनी त्यांना झुलविलं नि मायबाप सरकारनं फसविलं. त्यांच्या अगतिकतेचा फायदा घेतला. तरीही या जीवननौकेतून तरून जाण्याचा त्यांनी कसा प्रयत्न केला, हेलकावे देणाऱ्या वादळ-वाऱ्याला त्यांनी कसे तोंड दिले याचे सरळ, सोप्या भाषेत शब्दचित्रण करण्याचा माझा हा प्रयत्न आहे.

प्रातिनिधिक स्वरूपात बेळवट्टी गावच्या पुनर्वसनावर आधारित हे वास्तव दर्शन असले, तरी एकंदर ग्रामीण जीवनशैली मांडण्याचा माझा येथे प्रयत्न आहे.

एखादा संकल्प सिद्धीस जातो, त्यामागे अनेकांचे पाठबळ, सदिच्छा नि परिश्रम असतात. शिक्षकी पेशात सेवा करीत असतानाच वृत्तपत्रसृष्टीत काम करण्याची मला संधी मिळाली. 'सकाळ', 'बेळगाव वार्ता' या दैनिकांतून व ज्वाला, जिव्हाळा, अमरदीप आदी दिवाळी अंकांतून मी विविध विषयांवर लेखन केलं. त्यातून लेखनानुभव व प्रेरणा मिळाली, लेखनाची आवड निर्माण झाली.

माझे पितृतुल्य गुरुवर्य व विश्वभारतसेवा समितीचे संस्थापक परशुरामभाऊ नंदिहळ्ळी यांचे लाभलेले मार्गदर्शन, त्यांनी दिलेली प्रेरणा मी हयातभर विसरू शकत नाही. सातत्याने वाचन करण्याचा व लिहीत राहण्याचा त्यांचा मला आग्रह असायचा. त्यांच्या या आग्रहामुळेच मी वृत्तपत्रसृष्टीकडे नि पुढे साहित्य क्षेत्राकडे वळलो. कांही माणसं कळत न कळत आपल्या जीवनात येऊन जातात – कधी मित्र बणून तर कधी एका आगळ्या नात्यातून ! त्यांच्या चालण्यातून, बोलण्यातून, आचार-विचारातून आपण बरच कांही घेत असतो नि कळत न कळत तेही आपणास कांही देऊन जातात. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. भीमराव गस्ती, कित्तुर चन्नमा विद्यापीठातील मराठी विभागाचे प्रमुख डॉ. विनोद गायकवाड, विश्वभारतसेवा समितीचे अध्यक्ष विजय नंदिहळ्ळी, प्रा. हेमंत शामराव सावंत आणि बंधू, कवयित्री सौ. वैशाली हेमंत सावंत आदींनी मला असंच कांहीसं दिलं आहे. त्यामुळेच ही कादंबरी आकार घेऊ शकली. संपादक आर. के. ओऊळकर यांनी आपल्या 'जिव्हाळा' मासिकातून ही कादंबरी क्रमश: प्रसिद्ध करून मला

प्रोत्साहन  दिले आहे. या सर्वांचे फार मोठे ऋण माझ्या जीवनात आहे. केवळ कृतज्ञता व्यक्त करून त्याची परत फेड करता येणार नाही.

प्रत्येक पुरुषाच्या यशात त्याच्या कुटुंबीयांचाही तितकाच मोलाचा वाटा असतो.  माझी पत्नी सौ. नंदादेवी हिची सतत कामात राहण्याची वृत्ती मला बरंच काही देऊन गेली. काही तरी करीत राहण्याचा तिचा आग्रहच मला या लेखनाप्रत घेऊन गेला. सॉफ्टवेअर अभियंता असलेली माझी मुलगी संतोषी व जावई अतुल, माझा मुलगा डॉ. संतोष यांचेही या पुस्तक प्रकाशनासाठी तेवढेच मोलाचे पाठबळ लाभले. सेवानिवृत्तीनंतर मी एखाद्या कामात गुंतून राहावे यासाठी लेखन प्रपंचाकडे वळण्याचा त्यांनी आग्रह धरला. त्यातूनच साहित्यक्षेत्रातील  कादंबरीरूपी माझे हे पहिले  अपत्य जन्माला आले आहे.

डॉ. विनोद गायकवाड यांना विद्यापीठाच्या कामाचा मोठा व्याप असतानाही वेळ काढून या कादंबरीसाठी त्यांनी प्रस्तावना लिहून दिली. कादंबरी अधिक वाचनीय होण्याच्या दृष्टीने मौलिक सूचना केल्या. या शिवाय अनेक हितचिंतकांचे वेगवेगळ्या प्रकारे सहकार्य लाभले. त्या सर्वांचा येथे नामोल्लेख करणे अशक्य आहे. त्या सर्वांचा मी मनपूर्वक ऋणी आहे.

कादंबरी लिहून पूर्ण झाली तरी ती प्रकाशात येत नाही. त्यासाठी प्रकाशकांचे परिश्रम तितकेच मोलाचे असतात. पुणे येथील 'संवेदना' प्रकाशनाचे नितीन हिरवे आणि सौ. नीता हिरवे यांची ओळख झाली नि त्यांनी माझ्या मनातली संवेदना जाणली. लागलीच पुस्तक प्रकाशनाची त्यांनी जबाबदारी उचलली. नवोदित लेखकांना असं प्रोत्साहन देणारे प्रकाशक फारच कमी ! परंतु सौ व श्री हिरवे यांनी ते करून दाखविलं; म्हणूनच माझं हे शब्दचित्रण वाचकांपर्यंत पोहोचू शकलं. मी त्यांच्या ऋणातच रहाणं पसंद करीन.

माझा हा पहिला-वहिलाच प्रयत्न असल्याने त्यामध्ये शुद्धलेखनाच्या चुका होण्याची शक्यता नाकारता येत नाही.  वाचक मोठ्या मनाने त्या पोटात घालतील  नि साहित्य क्षेत्रात या कादंबरीचं स्वागत होईल एवढीच अपेक्षा !

**– मनोहर (बी. बी. देसाई)**

*बेळवट्टी गाव नि गावची सुपीक शेती राकसकोप धरणात गेली. गावचे पुनर्वसन झाले. नवीन गावात नव्या संसाराची उभारणी करताना लोकांना अनेक संकटांचा सामना करावा लागला. त्याचं प्रसंगानुरूप वास्तविक व विदारक सत्य मी येथे चित्रित केले आहे. लेखन वाचनीय व मनोरंजक व्हावे यासाठी त्याला काल्पनिक वर्णनाचीही जोड दिली आहे. कादंबरीतील काही नावे खरी असली, तरी बहुतेक काल्पनिक आहेत. त्यांचा कुणाशी काही संबंध जुळल्यास तो केवळ योगायोग मानावा.*

# १. पुनर्वसन

बऱ्याच दिवसांनंतर जुन्या गावठाणाकडे जाण्याचा योग आला. पावलं नकळत धरणाकडे वळली. काठावर उभा राहिलो, तोच नजर काहीसं धुंडाळू लागली. येथेच बालपण गेलेलं, येथेच खेळलो नि बागडलोही होतो!...छोट्या, छोट्या कौलारू घरांचं ते टुमदार गाव. त्याच्या उत्तरेला नागमोडी वळणे घेत जाणारी मार्कंडेय नदी, तिच्या दुतर्फा पसरलेली हिरवीगार विस्तीर्ण सुपीक शेती!... साऱ्या गोष्टी एक एक करत नजरेसमोर तरळू लागल्या.

मार्कंडेय माता म्हणजे बेळवट्टी गावाला लाभलेलं वरदान! पावसानं दगा दिला तरी मार्कंडेय मातेच्या ओलाव्यानं शेती बहरून येई. वाऱ्याच्या झुळकीबरोबर मोत्याच्या झुंबरावाणी डोलणारी, सळसळणारी भातशेती पाहून मन प्रसन्न होई. दृष्ट लागावी अशी गावची समृद्धी! त्यामुळे मार्कंडेय मातेवर लोकांचंही जिवापाड प्रेम! पण

या गोष्टींचा आज कुठे मागमूसही नव्हता. ना ती सुंदर घरं, ना पिकानं भरून आलेली शेती, ना मार्कंडेय नदी... सगळीकडे पाणीच पाणी! मन निराश झालं; जुन्या स्मृती एकदम जाग्या झाल्या नि त्यातच ते गढून गेलं.

एक दिवस अचानक ग्रामपंचायतीचा पट्टेवाला-मल्ल्या येड्यागत गल्लीतनं वरडत सुटला,

'रामण्णा, गणप्यादा... ऐकल्याशी काय गा ऽ सगळ्यासनी गाव सोडून जाऊच लागणार म्हणं!'

हाफिसात काही घडलं की तो असंच गावभर सांगत सुटायचा. ग्रामपंचायतीचा खबऱ्या म्हणून लोक त्याला ओळखत. पण आज त्याचा चेहरा घाबरल्यागत झाला होता. त्याच्या बोलण्यात रोजचा जोर नव्हता. लोकांना आश्चर्य वाटलं नि कुतूहलाने ते चौकशी करू लागले,

'आरे, थोडं थांबशील काय...? भुतानं झपाटल्यागत का पळोलेस?'

'व्हय, व्हय लई मोऽ ठ्या भुतानं झपाटलंय... बघशीलाच...!' त्याच्या बोलण्यानं साऱ्यांचं औत्सुक्य पुन्हा वाढलं.

'काय झालं सप्पय सांग तरी. कशापायी गाव सोडूच लागणार...?' त्यांनी विचारणा केली. त्यावर भेदरलेल्या भेकरासारखा तो थांबला नि कावराबावरा होऊन म्हणाला,

'कालच वरच्या सायबाची आर्डर यलेय. व्हळेवर धरण बांधणार हाईत... गाव- घरं नि सगळं शातबी पाण्यात जाणार हाय म्हणी...!'

ऐकून लोकांना धक्काच बसला. त्यांची एकच धांदल उडाली. सारेजण बिथरले. घोळक्या-घोळक्याने चर्चा करू लागले. कुणी म्हणालं,

'न्हाय, आमी गाव सोडतला न्हाय.' कुणी म्हणालं,

'अरे, वरच्या सायबाची आर्डर यल्यावर तुझ्या-माझ्या हातात काय असणार?'

'गाव सोडतला न्हाय म्हटल्यावर जाऊचं लाग्याल खडी फोडूस!'

'तुजबी खरं हायगा! तरीबी घरदार, शेती-भाती सोडतली म्हटल्यावर... ऱ्हातलं खुटे नि खातलं काय?'

'अरे, सरकार करील काय तरी यवस्ता...!'

'सरकारचं काम नि यलो जरा थांब... म्हाईत न्हाय!'

साऱ्यांना तोंडचा घास काढून घेतल्यागत झालं. त्यांच्या मनात चीड निर्माण झाली. ते आपल्या बोलण्यातून संताप व्यक्त करू लागले.

'आतं काय करतलं गा!' म्हणून एकमेकाला विचारू लागले. परंतु विचार करूनही त्यांना मार्ग सापडत नव्हता.

गावावर उदासीनतेची छाया पसरली. सकाळच्या प्रसन्न वातावरणात खेळणाऱ्या मुलांचा गोंगाट गळा दाबल्यागत बंद झाला. पहाटेचचा पक्ष्यांचा किलबिलाट कर्कश्य वाटू लागला. पिंपळाच्या पारावर गप्पागोष्टींत रमणारा थोरामोठ्यांचा घोळका, सवंगड्यांना हाका मारीत बैलजोडीसह शेतवाडीकडे निघालेले शेतकरी... सगळ्याच गोष्टी अदृश्य झाल्या. साऱ्यांना चिंता लागली ती भविष्याची!

त्या वेळी माझं कोवळं पोरवय. लोकांच्या बोलण्यातला नि वागण्यातला अर्थबोध व्हायचा नाही. पण आज त्यांची ती तगमग नि मनातील भावना मला उमजू लागतेय. मार्कंडेय मातेच्या प्रेमाच्या ओलाव्याला लोक आता मुकणार होते. तिच्या कुशीत जन्मलेली, तिच्या कटीखांद्यावर खेळणारी, तिच्या मायेच्या उबेत वाढलेली तिची लेकरं आता तिला सोडून दूर जाणार होती. कुणा अवदसेची दृष्ट लागली अन् ताटातुटीची वेळ आली. असे घडेल, हे कुणाच्या ध्यानीमनीही नव्हते.

***

लोकांना योग्य दिशा दाखविणारा, उपदेशाच्या चार गोष्टी सांगणारा, धीर देणारा गावात कुणीच नव्हता. श्रीमंत पाटलांची पोरं परंपरेने गावचं नेतृत्व करीत. ते सांगतील ती दिशा नि दाखवतील तो मार्ग. लोकांनी विचार केला नि ते मुकाट्याने स्थलांतराच्या तयारीला लागले. साऱ्यांची एकच धावपळ सुरू झाली.

राहण्यापुरता निवारा ठेवून साऱ्यांनी आपापल्या घरांचा उर्वरित भाग पाडला. टुमदार घरे विकलांग स्थितीत पडली. कोसळलेल्या भिंतींच्या मातीचे ढीग, दगड, फुटक्या कौलांचे अन् लाकडांचे तुकडे इतस्तत: विखुरले. सुखसागरात आनंदाने वावरणाऱ्या गावात स्मशानागत भकास स्थिती निर्माण झाली.

शेजारच्याच टेकडीवर नवा गाव वसणार होता. आखून दिलेल्या जागेत निवारावजा घरे उभारण्याची कामे सुरूही झाली. लोकांनी संसाराच्या पुनर्वसनाची तयारी चालविली. गावात महिना-दोन महिने हीच धांदल. जुनी कौले, चौकटी, दरवाजे व इतर साहित्याचे स्थलांतर करून नव्या वसाहतीत ते नवी घरे उभारू लागले. सरपंच रामराव पाटील, नाना दुकानदार, शिवू गावडा... यांची घरे सजलीसुद्धा! आपले नवे संसार त्यांनी तेथे कधीच सुरूही केले. बड्यांची ही

तऱ्हा; तर सोम्या-गोम्याचे काय! त्यांना दुसरा पर्यायच नव्हता. कशीबशी झोपडीवजा घरे उभारून जीवनाचं रहाटगाडगं चालविण्याची त्यांची धडपड.

घरांसमोर बैलगाड्या उभ्या होत्या... भांडीकुंडी, कपडालत्ता, वाकळं, जाती, मुसळं, शेतीची अवजारे... सारे गाडीत येऊ लागले. पावसाळ्यापूर्वी नव्या जीवनाची उभारणी करण्याची साऱ्यांना घाई. गाव सोडायला मनं तयार नव्हती; परंतु माणसाच्या मनासारख्या गोष्टी घडतात थोड्याच! मनातील राग ते कृतीतून व्यक्त करू लागले. सामानाची आदळ-आपट करीत सामान बैलगाड्यांतून भरू लागले. मला या साऱ्या गोष्टींचे नवल वाटे. आम्हा कोवळ्या जीवनाला संसाराची दगदग काय माहीत? 'गावाला जाणार, आमी गावाला जाणार...!' म्हणत अल्लडपणे उड्या मारीत होतो. ज्या घरात जन्म झाला; खेळलो, वाढलो, बागडलो; ते घर कायमचे सोडून जावे लागणार याची आम्हाला काय कल्पना!'

गाडीत सामान भरून झाले. अण्णांनी (माझे बाबा) जड अंत:करणाने दावणीचे बैल सोडले. परंतु त्या मुक्या बिचाऱ्यांनाही काय उमगले कोण जाणे! त्यांनी मानेला हिसका देताच त्यांच्या हातातील दोरी सुटली, डोळ्यांतून अश्रू घळाघळा वाहू लागले. मुक्या जनावरांना माणसागत भावना बोलून दाखविता येत नाहीत. परंतु त्यांच्या डोळ्यांतील आसवं बरंच काही सांगून गेली. ते पाहून अण्णा गहिवरले. त्यांचेही डोळे पाण्याने ओथंबले. पण इलाज नव्हता. वेसणीला धरून बळेबळेच त्यांनी बैलांना बाहेर काढले अन् गाडीचे ओझे त्यांच्या खांद्यावर टाकले.

कुठेतरी गावी जाणार एवढेच मला समजत होते. गावी जायचं म्हटलं की आम्हा पोरांना मोठा उत्साह. परंतु मोठ्यांचे उदास चेहरे पाहून माझा हिरमोड झाला होता. तरीही मी सर्वांत आधी गाडीत येऊन बसलो. डोळ्यावर पदर घेऊन आई मुसमुसत होती. तिने पडक्या घराकडे नजर टाकली. त्याबरोबर तिच्या डोकीत आठवणींचं काहूर माजलं. अण्णांच्या हाकेने ती भानावर आली. पडक्या घरासमोर तिने डोके टेकले नि त्याचा अखेरचा निरोप घेतला. पाणावलेले डोळे पदराने पुसत मन मारून ती गाडीत बसली.

लग्नानंतर मोठ्या अपेक्षा मनात बाळगून तिने घरचा उंबरठा ओलांडला होता. दीर-जावांसमवेत उमेदीने ती संसार करीत होती. परंतु संयुक्त कुटुंबात संसार करण्याचे भाग्य तिला फार काळ लाभले नाही. भरल्या घरात तिला वेगळी चूल मांडावी लागली. नुकताच कुठे संसार स्थिरावला होता; तोच पुन्हा गाव-घर

सोडून जायची वेळ आली.

बैलांच्या वेसणीला हिसका देऊन अण्णा गाडी हाकणार तोच त्यांना बाय गाडीत दिसली नाही. बाय म्हणजे माझी आजी. सारा गाव तिला बाय म्हणूनच बोलवी.

'अरे, बाय खुटे हाय?' म्हणत त्यांनी आईकडे पाहिले. आईने अबोलपणेच पडक्या घराकडे हात केला. बैलांच्या दोऱ्या माझ्या हातात देऊन ते परत घरात गेले. सत्तरी ओलांडलेली बाय पडक्या देवघरासमोर बसली होती. बोचक्यात देवाच्या मूर्ती घेऊन 'राम, राम' करीत होती.

'बाय, देवावरच भरवसा ठेवून आतं निघोस पायजे. 'त्याच्या' इच्छफुडे कुणाचं कायबी चालायचं न्हाय बघ.' अण्णा म्हणाले.

'तुजबी खरं हाय पोरा. तुझ्या बाप्यानं मोठ्या उमेदीन हे घर बांधलं. चार दीस सुखानं घरात ऱ्हाऊसबी त्यासनं मिळोस न्हाय. मिय्या तरी उरले चार दिस सुखानं काढून हीतेच मऱ्यानं म्हटलं तर तेबी नशीबात न्हाय. आतं 'त्याच्या'वरच भरवसा टाकून निघोस पायजे.'

'रामराम' करीत बाय उठली. देवाच्या मूर्ती काखेत घेऊन ती बळेबळेच बाहेर पडली.

घराशेजारचे लक्ष्मीचे मंदिर अद्याप तसेच उभे होते. साऱ्या लेकरांना नव्या गावात पाठविल्यानंतर ही ग्रामदेवता नव्या गावात येऊन विराजमान होणार होती. बाय मंदिराच्या पायऱ्या चढली. देवीच्या गाभाऱ्यासमोर उभी राहून टकमक देवीच्या मूर्तीकडे पाहू लागली.

'तुझ्या मनात काय हाय माय, तुजच म्हाईत. तुझी लेकरं नव्या गावात निघाल्यात. त्यांच्यावर कुरपा ठेव' असं बोलून तिने देवीच्या मूर्तीसमोर डोके ठेवले व पानावलेल्या डोळ्यांनी गाडीत येऊन बसली.

बैलगाडीने नव्या वसाहतीची वाट धरली. खाच खळग्यांचे हादरे झेलत ती पुढे जाऊ लागली. साऱ्यांची मनं मात्र पडद्याआड गेलेल्या गतायुष्याची उजळणी करीत होती. बैलगाडी पुढच्या वळणावर येताच, त्यांच्या नजरा पुन्हा जुन्या घराकडे वळल्या. पडक्या भिंती हताशपणे उभ्या होत्या. छप्पराचे ओझे झेलत ऊन-पावसात वर्षानुवर्षे त्यांनी साऱ्यानां निवारा दिला होता. सुंदरशा घरकुलात अनेक संसार उभे केले होते. आज हेच संसार मोडून जावे लागल्याने साऱ्यांची मने हेलावली, बेचैन झाली. तेथेच घुटमळू लागली. अण्णांच्या हातातील बैलांच्या

दोऱ्या नकळत ओढल्या गेल्या. गाडी क्षणभर थांबली. बायने पुन्हा एकवार पडक्या घराकडे पाहून हात जोडले अन् गाडी मार्गाला लागली.

डोकीला उन्हाचे चटके बसत होते. रस्त्यावरील खाच-खळग्यांचे हादरे झेलावे लागत होते. परंतु त्याची जाणीव कुणालाच होत नव्हती. होणार कशी? त्यांची मनं गतकाळात वावरत होती. एकएक करत सारा भुतकाळ त्यांच्यासमोर उभा राहिला.

पाच वर्षांपूर्वीच जुने घर मोडून आजोबांनी नवे घर बांधण्यास काढले होते. साऱ्यांनी मोठ्या उमेदीने कामात हातभार लावला. त्यासाठी कर्जाचे ओझे झेलले; परंतु त्याचे त्यांना दु:ख झाले नाही. स्वत:च्या मालकीचे नवे घर होणार याचाच त्यांना आनंद वाटत होता. हे सुख उपभोगण्याचे मात्र आजोबांच्या नशिबी नव्हते. पुढे दोन वर्षांतच त्यांना देवाज्ञा झाली. त्यानंतर एका घरात चार चुली झाल्या. पोरं वेगळी झालेली पाहून बायचं मन कासावीस झालं. परंतु हे केव्हातरी होणारच असा विचार करून तिने मनाची समजूत काढली. सारे जबाबदारीने संसार करीत होते; तोच आता नवे आव्हान समोर येऊन ठेपले होते. तसा गावातील सर्वच लोकांपुढे पुनर्वसनाचा गंभीर प्रश्न उभा होता.

'काय काकू, चालल्याशी...?' रामा पाटलाच्या हाकेने बाय भानावर आली. तिचं मन भूतकाळातून बाहेर आलं नि तिनं मनातलं दु:ख व्यक्त केलं.

'काढल्याशी बाबा एकदाचं भाईर. उतरतीच्या काळातले चार दीस हीतेच सुखात काढीन म्हटलं तर ते बी नशिबात न्हाय, मुकाट्यानं वाट न्हेईल तिकडी जातलं झालं!'

'नशिबाचा अन् सरकारचा घाला कधी टळायचा न्हाय काकू. धरण बांदोस कुणी इरोधच करूस न्हाय, त्यात सरकारच फावलं. इरोध करून तरी काय व्हणार म्हणा? ईल त्या परसंगास तोंड देणं यवढंच आमच्या हातात...'

'व्हय बाबा, आतं त्याशिवाय गत्यंतर न्हाय.'

बोलता, बोलता गाडी अर्ध्या वाटेवर आली. मागे-पुढे रामा पाटलाची आणि सोम्या चौगुल्याची गाडी नव्या जीवनाचं रहाटगाडगं घेऊन निघाली होती. नेहमी अवखळपणे बोलणारी, चेष्टामस्करीत रमणारी रमी आज वेगळ्याच तंद्रीत होती. ती निमूटपणे बकरी हाकीत नव्या गावाच्या दिशेने चालली होती. सतत बडबड करणारा जीवणू गावडाही मुकाटपणे म्हसरांच्या मागून निघाला होता. जनावरांच्या टाचांनी उडालेले धुळीचे लोट आकाशाला गवसणी घालीत होते. तापलेल्या

जमिनीचे पायाला चटके बसत होते. उन्हाच्या तिरिपीने जीवाची घालमेल होत होती. रस्त्यावरील खाचखळग्यांचे हादरे भावी जीवनातील धक्क्यांची जाणीव करून देत होते.

बैलगाडी नव्या वसाहतीतील नव्या घराजवळ येऊन पोहोचली तसे अण्णा भानावर आले. 'हुश ऽ ऽ...' करीत त्यांनी गाडीतून खाली उडी घेतली. खांद्यावरच्या टॉवेलने कपाळावरचा घाम पुसला. गाडीच्या ओझ्यातून बैलांना मुक्त केलं; परंतु नव्या संसाराच्या ओझ्याच्या जाणिवेने त्यांचं मन अस्वस्थ बनलं. बैलांना गाडीच्या दांडीलाच बांधून त्यांच्यासमोर गवताची पेंडी टाकली नि नव्या घराच्या व्हरांड्यातच डोकीला हात लावून ते बसले. बायनेही अण्णांच्या शेजारीच 'राम, राम' करीत बैठक मारली. त्याबरोबर भानावर येऊन ते म्हणाले,

'जमीन-जुमला गेला. गावाचं पुनर्वसन झालं; पर संसाराचं...?'

अण्णा हताश झालेले बायला पहावले नाही. तिचा दुःखी, कष्टी चेहरा अचानक करारी बनला, तिने मनातली निराशा झटकून टाकली.

'डोकीस हात लावून भागणार न्हाय. अजून सारं आयुष्य फुडं पडलंय. आपुनच असे हातपाय गाळून बसलं तर कसं व्हणार?... पोरास धीर देऊस पायजे.' असा मनात विचार करून ती म्हणाली,

'न्हाय पोरा, आसं हातपाय गाळून चालायचं न्हाय. रातीमागन दीस यतायच न्हवं! तसं दुःखामागन सुख हे यत्ताईच बघ. आजचे कठीण दिसबी निघोन जातील... जरा धीर धरूस पायजे. देवानं पॉट दिलय, तसे हात-पायबी दिल्यात. 'तो' साऱ्यांची परीक्षा घेताय. 'त्याच्या'वर इस्वास ठेऊन जिद्दीनं कामास लागोस पायजे. सार काय यवस्तीत व्हईल बघ.'

बाय साऱ्या गावची माय. अशाच उपदेशाच्या चार गोष्टी सांगून ती साऱ्यांना नवी उमेद द्यायची. अडल्या-नडलेल्याला मदतीचा हात पुढे करायची. मग आपला मुलगा निराश झालेला तिला कसा पहावणार होता! नव्या उमेदीने कामाला लागायचा तिने नवा मंत्र दिला.

त्याबरोबर अण्णानेही आळस झटकला.

'बाय, तुझ म्हणणंबी बरोबर हाय. डोकीस हात लाऊन भागणार न्हाय. समोरचं आव्हान पेलून त्याच्यावर मात करतला परयत्न तर करूस पायजे!' म्हणत ते उठले नि नव्या उमेदीने संसाराचे पुनर्वसन करायच्या कामाला लागले.

'समोरच्या परसंगास तोंड दिल्याबिगर इलाज न्हाय' असा विचार करून

गावातील लोकही आपापल्या परीने नव्या संसाराची मांडणी करू लागले .

‘मास्तर, धरणाच्या काठावर असंच किती येळ उभं ऱ्हाणार...?’ शेजारीच शेतात काम करणाऱ्या एका जुन्या मित्राच्या हाकेने भानावर आलो. आठवणींची शिदोरी मनात बांधून टाकली नि उदास अंत:करणाने परत घरी जायला निघालो.

# २. लाल दिव्याची गाडी

जुन्या गावच्या पूर्वेला शाळेची छोटीशी इमारत. शनिवारचा दिवस असल्याने दुपारी सुटी होती, म्हणून आम्ही पोरं शाळेसमोरील अंगणात गोट्यांनी खेळत होतो. एवढ्यात शिटी वाजली नि त्या पाठोपाठ 'खाड्खाड्' बुटांचा तालबद्ध आवाज आला. साऱ्यांनी दचकून वर पाहिले, तर खाकी गणवेशातले पोलीस गावच्या वेशीतून येताना दिसले. घरात कधी हट्ट केला कि आई-अण्णा दटावयाचे,

'गुमान ऱ्हा न्हायतर पोलिसाकडे देईन.'

त्यामुळे कधीच न पाहिलेल्या पोलिसांची मनात धास्ती होती. आज त्यांना प्रत्यक्ष पहात होतो. एवढ्यात

असक्या म्हणालं,

'अरे, पोलीस यले, पळा ऽ.'

खेळायच्या गोट्या तेथेच टाकून आम्ही आपापल्या घराकडे पळालो. घाबरण्याचं तसं कारण नव्हतं; पण लहान वयातच आई-वडिलांनी पोलिसांविषयी मनात

एक प्रकारची भीती निर्माण केली होती. त्यामुळे घराच्या दरवाजाआडून मी त्यांना चोरून पाहू लागलो.

बायका व पुरुष मंडळीही घराघरांतून बाहेर आले. मोठ्या कुतूहलाने रस्त्याकडे पाहू लागले. गावात गणवेषातले पोलीस पाहून सर्वांची घाबरगुंडी उडाली. पोलिसांनी गावात पथसंचलन केले. गावात काही भानगड झाली म्हणजे पोलीस यायचे; परंतु आज पोलिसांची मोठी झुंड आली होती. जो तो विचारत होता,

'गावात पोलीस कशापायी यल्यात गा? काय भानगड-बिनगड न्हाय न्हवी...?'

शेजारची लक्षी परसदारातून चोर पावलांनी आमच्या घरात आली. आई जवळ जाऊन काहीसं कुजबुजू लागली. मीही आईचा पदर धरून तेथेच रेंगाळू लागलो. हळू आवाजात लक्षी म्हणाली,

'काकू, बघितल्याशी? पोलीस यल्ले कळताच घरातल्या ट्युबा घेऊन रघ्या मागच्या दारान पळोन गेला. गावात दारू इकत असल्याची वार्ता कळल्यापासनं पोलीस यल्यात म्हणी.'

'काय म्हाईत न्हाय बाई, पर पयलीच येळ यवढे पोलीस गावात यल्यात बघ.' आई म्हणाली.

अण्णा नि काही मंडळी याच विषयावर कठड्यावर बसून चर्चा करीत होते. ल्हवारचा नाग्या त्यांच्याजवळ येत म्हणाला,

'काय गा...? काय भानगड हाय! पोलीस कशासाठी यल्यात?'

'अरे, तिय्या गावात फिरणारा गडी. गावातली सगळी बित्तम्बातमी तुझ्याकडे आसतेय. मग आमास काय ईचारतोस?' अण्णांनी प्रतिप्रश्न केला.

'गावड्याच्या म्हारत्या बायकोस मारून म्हायेरास धाडलीय! तिनं तक्रार-बिक्रार केली नस्याल न्हवी पोलिसांत...? '

'अरे, काय अशाल ते कळ्यालंच की, म्हाईत नसतानं कुणाच्या नावांन' काय बी बोलू न्हवे. जो करताय त्यो भोगताय.' अण्णा म्हणाले.

'तस न्हाय गा, गावात अशी चर्चा हाय म्हणून इचारतोय.' त्याने सारवासारव केली.

एवढ्यात सरपंच समोरून येताना दिसले. त्या बरोबर सगळेजण गप्पगार झाले. ते म्हणाले,

'रामू, गणू, नागो, ...... ...... देवळाकडे चला रे पोरांनू!'

'काय, मीटिंग हाय सरपंच?' गणपाने चौकशी केली.

‘अरे, राज्याचं मुख्यमंत्रीसाईब यनार हाईत म्हणी, त्यासाठीच हे पोलीस यल्यात न्हवी. धरण बांधण्याबद्दल बोलणार हैत... ’ सरपंचांनी सांगितलं. त्याबरोबर लोकांच्या वायफळ चर्चा बंद झाल्या.

साऱ्यांनी सुटकेचा नि:श्वास सोडला. पण धरणाचं नवं संकट पुढे आ वासून उभा! त्यात साऱ्यांचे संसार उद्ध्वस्त होणार होते. सोम्यानं आपली शंका विचारली,

‘पर सरपंच, गाव-घर नि शात धरणात गेलं तर काय करतलं...?’

‘ते तर हायच. त्याबद्दलच आज मुख्यमंत्रीसायेब बोलणार हैत.’

‘शेतीच गेली तर या धरणाचा गावास काय उपेग गा...?’

‘अरे, आपल्या गावासाठी हे धरण न्हाइच मुळी! बेळगाव शराची पाण्याची टंचाई सोडवूस सरकारानं ही योजना आखलीय. काय इचारायचं ते मुख्यमंत्र्यांसनी आजच इचारा. मागनं माज दोष नको.’ सरपंचानी स्पष्टीकरण केलं.

धरणाच्या पाण्याखाली बेळवट्टीचे गावठाण आणि सभोतालची सुपीक शेती जाणार होती. त्यामुळे गावकऱ्यांना एकच चिंता लागून राहिली. लोक कुरबूर करू लागले; परंतु विरोध करण्याचे धाडस कुणामध्ये झाले नाही. किंबहुना त्यांना तसे नेतृत्व लाभले नाही.

सीमाप्रश्नाची चळवळ त्या काळात भरास आली होती. महाराष्ट्र एकीकरण समितीने सरकारशी संपूर्ण असहकार पुकारला होता. समितीच्या आंदोलनात लोकांनी स्वतःला झोकून दिले होते. आंदोलनाने ऊग्र रूप धारण केल्याने त्या वेळेच्या म्हैसुर राज्याचे मंत्री उघडपणे सीमा भागात येण्याचे धाडस करीत नसत. बेळवट्टी गाव तर शंभर टक्के मराठी भाषक, महाराष्ट्राच्या सीमेवर वसलेला. त्यामुळे सीमाप्रश्नाच्या चळवळीचा गावावर प्रभाव असणे स्वाभाविक होते. त्यातच धरण बांधण्याच्या घेतलेल्या निर्णयामुळे सरकारवर लोकांचा रोष होता. अशा परिस्थितीत म्हैसूरचे तत्कालीन मुख्यमंत्री बी. डी. जत्ती यांनी धरणाची निकड पटवून देण्यासाठी बेळवट्टी गावाला भेट देण्याचा घेतलेला निर्णय तसा धाडसीच होता.

मुख्यमंत्र्यांच्या आधीच पोलीस गावात येऊन दाखल झाले. त्यांच्या बुटाच्या खडखडाटाने लोकांच्या छातीत धडधड सुरू झाली. सीमा चळवळीत पोलिसांनी केलेल्या गोळीबारात काही लोक हुतात्मा झाल्याचे लोक ऐकून होते. तेव्हापासून लोकांच्या मनात चीडवजा भीती होती.

एवढ्यात रस्त्यावरची धूळ उडवीत लाल दिव्याची गाडी गावात आली. मागे-पुढे पोलिसांच्या जीपगाड्या होत्याच. लाल दिव्याची गाडी लोक गावात प्रथमच पहात होते. एवढी मोठी व्यक्ती गावात यावयाची ही पहिलीच वेळ.

मुख्यमंत्र्यांचे म्हणावे तसे गावात स्वागत झाले नाही. त्याला कारणही तसेच होते. एकतर सीमाप्रश्नामुळे कानडी मंत्र्यांवर लोकांचा रोष, त्यातच धरण बांधण्याचा सरकारचा निर्णय!

मुख्यमंत्र्यांसारखी मोठी व्यक्ती गावात आली, तरी सभेच्या ठिकाणी काही पंच व मोजकेच लोक जमा झाले. ग्रामपंचायतीचा शिपाई मल्ल्या घरोघरी जाऊन हाका मारू लागला.

'गणप्यादा, हनम्याण्णा चला देवळाकडे, सरपंच बलवित्यात.'

दबकत, दबकत एक-एक करत पाच पन्नास लोक लक्ष्मीच्या मंदिरासमोर येऊन उभा राहिले. मंदिराच्या कठड्यावरच चार-पाच खुर्च्या मांडल्या होत्या. अंगात खादी अंगरखा, त्यावर जॅकेट, पंच्या व डोकीवर गांधी टोपी घातलेली व्यक्ती मधल्या खुर्चीवर बसली होती. अंगाने सडपातळ; परंतु चेहरा मोठा करारी.

'हेच मुख्यमंत्रीसाईब हाईत म्हणी' गणप्या कुजबुजला.

डाम्यानं मान डोलावली.

मुख्यमंत्र्यांच्या दोन्ही बाजूला पांढऱ्या खादीच्या पोशाखातील दोन गलेलठ्ठ व्यक्ती बसल्या होत्या. शरीरापेक्षा खुर्च्या लहान पडल्याने ते स्वत:ला चोपून बसले होते. त्यांचे एकमेकांशी कानडीत काहीसे संभाषण सुरू होते.

त्याचा कुणाला काहीच अर्थ लागत नव्हता. तसा मराठी आणि कानडी भाषेचा कुठेच काही संबंध येत नाही. लिपी वेगळी, शब्द वेगळे; कुठेच काही जुळणारे नव्हते. त्यातच सीमाप्रश्नाच्या वादाने कानडी भाषेविषयी लोकांच्या मनात आकस निर्माण झालेला.

मुख्यमंत्र्यांच्या मागे बंदूकधारी पोलीस उभा होता. बाकीच्या पोलिसांनी मंदिराला जणू वेढाच घातला होता. त्यामुळे लोकांमध्ये थोडी धास्ती होती. एव्हाना लोकांची गर्दी थोडी वाढली.

गावचे सरपंच रामराव पाटील उभा राहून बोलू लागले,

'राज्याचं मुख्यमंत्रीसाईब आज आमच्या गावास यल्यात, हे आमचं भाग्यच. त्यांचं आमी स्वागत करतो.'

त्यांनी एक भला मोठा हार त्यांच्या गळ्यात घातला आणि ते पुढे बोलू लागले.

'राकसकोप धरण बांधण्यास आमचा ईरोध न्हाय, पर धरणात आमचा जमीनजुमला गेल्यावर आमच्या पोटापाण्याचं काय व्हणार याचीच चिंता सगळ्यासनं लागून ऱ्हायलीय. 'साईबच' आमचे मायबाप. त्यांनीच गावास आधार देऊस पायजे.'

सरपंचांनी मुख्यमंत्र्यांना नमस्कार केला आणि बाजूलाच ठेवलेल्या खुर्चीत जाऊन बसले. त्यानी मोजक्याच शब्दात लोकांचे दुःख मांडले होते, वेदनांवर बोट ठेवले होते.

त्यानंतर खादी पोशाखातील बड्या व्यक्ती काहीसे कानडीत बोलल्या. ते सर्वांच्याच डोकीवरून गेले.

मुख्यमंत्री उठले. डोकीवरची टोपी सरळ केली. सभोवार सहज नजर टाकली. त्यांचा चेहरा गंभीर; परंतु करारी वाटत होता. नजर भेदक होती. ते बोलू लागले,

' बेळवट्टी गावच्या बंधू-भगिनींनो'

लोकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. ही मुख्यमंत्र्यांच्या भाषणाची स्तुती नव्हती, तर त्यांनी मराठीत भाषणाला सुरवात केल्याचा तो आनंद होता.

मुख्यमंत्री बी. डी. जत्ती यांचे शिक्षण महाराष्ट्रात झाल्याचे नंतर समजले. त्यामुळे त्यांना मराठी भाषा चांगली अवगत होती. त्यांनी आपले संपूर्ण भाषण मराठीतच केले. त्यामुळे लोकांचा रोष थोडा मंदावला. लोकांनी त्यांचे बोलणे शांतपणे ऐकून घेतले. ते पुढे बोलू लागले,

'तुमचेच बांधव बेळगावला राहतात. आज पाण्याविना त्यांचे मोठे हाल होत आहेत. तहानेने व्याकूळ झालेल्यांना पाणी पाजणे हा खरा धर्म आहे.'

'ते सगळं खरं हाय साएब, पर आमच्या पोटापाण्याच काय?' एका कोपऱ्यातून दबकत; परंतु तेवढ्याच धाडसाने आवाज आला. सगळ्यांच्या नजरा तिकडे गेल्या. नलावड्याच्या हनम्याचा तो आवाज होता. पर गावात जाऊन चार पुस्तक शिकलेला हनम्या लोकांना चार शहाणपणाच्या गोष्टी सांगायचा. मुख्यमंत्र्यांच्या सभेत आज त्यानेच बोलायचं धाडसं केलं होतं; परंतु शेजारी पोलीस येऊन थांबलेला पाहून त्याची बोबडीच वळली.

'तुमची मागणी योग्यच आहे,' मुख्यमंत्री पुढे बोलू लागले.

'सरकारने गावाचे पुनर्वसन करण्याचा तर निर्णय घेतलाच आहे, शिवाय

शेती गमाविलेल्यांना नवीन शेती देण्यात येईल. धरणग्रस्त गाव म्हणून तुमच्या मुलांना सरकारी नोकरी मिळेल. नव्या गावात सगळ्या मूलभूत सुविधा मिळतील.'

मुख्यमंत्री बरेच काही बोलले. त्यांनी आश्वासनांची जणू बरसातच केली. लोक सुखावले नि माना डोलावू लागले.

मुख्यमंत्र्यांनी पुन्हा एकवार सर्वांना नमस्कार केला. ते लाल दिव्याच्या गाडीत बसले. गाडी लोकांच्या डोळ्यात धूळ उडवत निघून गेली.

लोकांनी मुख्यमंत्र्यांच्या आश्वासनावर विश्वास ठेवला. गावठाणाचे नव्या वसाहतीत स्थलांतर झाले आणि पुढे...

लोक अद्यापही त्यांच्या आश्वासन पूर्तीच्या प्रतीक्षेत आहेत.

## ३. राकसोबाचा कोप

नावात काय आहे? असे शेक्सपिअर म्हणतो. एका अर्थाने हे खरेही आहे. एखादी व्यक्ती, नावापेक्षा त्याच्या कर्तृत्वानेच अधिक ओळखली जाते; परंतु गावांच्या नावामागे काही इतिहास किंवा निश्चित कारण असतं, अशी माझी धारणा आहे. 'बेळवट्टी' गावच्या स्थापनेचा इतिहास किंवा असं नाव पडण्यामागचं समर्पक कारण मला कुणीच दिलेलं नाही. त्यामुळे मी बऱ्याच वेळा या नावाचा अर्थ शोधायचा प्रयत्न करतो.

बेळ + वट्टी! आमच्या प्रचलित ग्रामीण भाषेत 'बेळं' म्हणजे चिव्याच्या (त्याला मानगा किंवा लहान बांबू पण म्हणतात) काढलेल्या पातळ पट्ट्या. गावात विशेषत: हरिजन लोक या बेळांपासून बुट्या, सूपं ...... यांसारख्या वस्तू तयार करून विकत असत. चिव्यांची बेटंही जुन्या गावात बक्कळ होती. 'वट्टी' म्हणजे घराच्या समोरची खोली, व्हरांडा किंवा कठडा! प्राचीन काळी बेळांपासून तयार करावयाच्या वस्तूंचा व्यवसाय गावात मोठ्या प्रमाणात होत असेल का? त्यावरून तर गावाला 'बेळवट्टी' नाव पडलं नसेल? असा माझ्या मनात विचार येऊन जातो; परंतु अद्याप तरी त्याला कुणी दुजोरा दिलेला नाही.

असो! राकसकोप धरणात गाव जाणार म्हणून गावाचं स्थलांतर झालं ही वस्तुस्थिती. परंतु गाव सोडून का जावं लागलं याची एक आख्यायिका मात्र त्या

काळात सांगितली जात होती. (ही कपोलकल्पित की, वास्तविक हे तुम्हीच ठरवा.)

गावच्या दक्षिणेला बैलूर नावाचे गाव. त्याच्या वाड्याशेजारीच मार्कंडेय नदीचा उगम झाला आहे. पुढे बाकनूर, इनाम बडस गावांची हद्द पार करून मार्कंडेय नदी बेळवट्टी गावच्या सीमेत प्रवेश करते.

जुन्या गावाला नदीने जणू वेढाच दिला होता. गावच्या वेशीतच शेतवाडी. पावसाने कधी फसगत केली, तरी मार्कंडेय मातेच्या ओलाव्याने शेती नेहमीच बहरून येई. त्यामुळे गावाला धान्याचे आणि पाण्याचे कधीच दुर्भिक्ष्य भासले नाही. परगावाच्या लोकांना हेवा वाटावा अशीच गावची सुबत्ता होती.

बेळवट्टीचे लोक धार्मिक वृत्तीचे. गावच्या मध्यभागी लक्ष्मीदेवीचे मंदिर. 'हे'च लोकांचे आराध्य दैवत. लोक मोठ्या भक्तिभावे देवीची पूजा करीत. देवीसमोर आपलं गाऱ्हाणं मोकळेपणाने मांडीत.

'हे माय! ईडापीडा टळू दे; तुझी लेकरं गावात सुखासमाधानानं नि गुण्यागोविंदानं नांदू देत.'

देवीवर लोकांची अढळ श्रद्धा! ते रोज देवीची भक्तिभावे प्रार्थना करीत. रात्री मंदिरात भजनाचा कार्यक्रम होई. टाळ-मृदंगाच्या निनादाने आसमंत निनादून जाई.

'देवी तू आमुच्या गावाची देवता। तुजविन न कोणी लक्ष्मीदेवी ।।'

या नित्याच्या गीताने लक्ष्मीदेवीची आळवणी होत असे. थोरल्या गावड्याचा हार्मोनियम आणि मदल्या गाडेकराच्या तबल्याची लय जुळली की, बाळ देसाईच्या सुरेल भजनगायनाने प्रेक्षक मंत्रमुग्ध होत. त्या काळात बेळवट्टीच्या भजन-भारुडाचा आजूबाजूच्या गावात मोठा गवगवा होता. शेजारच्या गावात कुठे धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम झाला आणि बेळवट्टीच्या भजनी मंडळाला विडा मिळाला नाही, असे कधीच झाले नाही. संत मीराबाई, संत सखु, ज्ञानेश्वरमहाराज, गोरा कुंभार यांच्या जीवनावरील भारुडाचे कार्यक्रम त्या काळात बरेच गाजले.

लक्ष्मी मंदिरासमोरच एक जुनाट पिंपळाचा वृक्ष! त्याच्या सभोवती बांधलेला कठडा म्हणजे गावच्या कारभाराचे जणू व्यासपीठच. दिवसभर शेतात काबाडकष्ट करून आलेले शेतकरी संध्याकाळी विसावा घेण्यासाठी हमखासपणे पिंपळकट्ट्यावर बसलेले दिसायचे. सरपंच रामराव पाटील, उपसरपंच गोविंद गावडा, तातोबा,

धोंडिबा आदी मंडळी रोज सायंकाळी पिंपळकट्यावर बसलेली असायची. गावापासून ते देश पातळीपर्यंतच्या घडामोडीवर चर्चा घडायची. गावात कुठे काय घडले की मल्ल्या अचूक माहिती द्यावयाचा. गावचा 'खबऱ्या' म्हणूनच सगळे त्याला ओळखत.

'अण्णा, ऐकल्याशी ...? अमक्याच्या पोरानं आमूक भानगड केल्यानं.'

'गावड्याच्या बागेतली काजूची चोरी झालेय......'

'.... ह्यानं दारू पियोन बायकोस मारल्यानं, म्हणून ती म्हायेरास पळोन गेली.'

त्याच्याकडून इत्थंभूत माहिती मिळे. मग झाले, तक्रार येण्यापूर्वीच सरपंच रामराव पाटलांचे आरोपीना फर्मान निघे. पिंपळकट्ट्यावर पंचायत बसे अन् न्यायनिवाडा होत असे.

सर्वांना न्याय देण्यावर पंचांचा कटाक्ष असायचा. त्यामुळे त्यांना गावात चांगला मान होता. गावप्रमुखावर लोकांचा विश्वास होता. अशा गोष्टींमुळे चोऱ्यामाऱ्यांचे प्रकार क्वचितच घडत. एकीच्या बाबतीत बेळवट्टी गावची ख्याती होती.

'बेळवट्टी गावात यक्की लई मोट्टी गाऽ! अशी यक्की दुसऱ्या खुटल्याच गावात न्हाय!' अशी परगावच्या लोकांत चर्चा असे.

गावात शिक्षणाची तशी चांगली सोय नव्हती. गावच्या पूर्वेला शाळेची एक खोली. त्यामध्ये चौथीपर्यंतचे वर्ग. एक शिक्षक चार वर्गांना शिकवीत. पुढील शिक्षणासाठी शेजारच्या तुडये गावाला जावे लागे. तेथे सातवीपर्यंतचे शिक्षण घेऊन पाटलाचा रामू, गाडेकराचा तुकाराम आणि चांदिलकराचा विष्णू मराठी प्राथमिक शाळेत मास्तर झाले. त्यांची गावात चलती होती. गावच्या कामकाजात ते आघाडीवर असायचे. गावात कोणाचे लग्न असो वा पूजा – पौरोहित्याचा विडा त्यांना हमखास ठरलेला! भटा-ब्राह्मणांच्या मक्तेदारीला पुरोगामी आचरणाने दिलेला हा एकप्रकारे धक्काच होता. त्याकाळात बहिर्जी शिरोळकरांसारखे सत्यशोधक चळवळीतील कार्यकर्ते गावोगावी जाऊन पुरोगामी विचारसरणीचा प्रसार करीत. त्याचा काही प्रमाणात गावावर प्रभाव पडला होता.

सुख-समृद्धी काय असते हे जुन्या गावाने चांगलेच अनुभवले होते; परंतु अति सुखही जाचते असे म्हणतात. बेळवट्टीच्या बाबतीत नेमके तसेच घडले.

एक दिवस संध्याकाळची वेळ. रामू , गोम्या, गणपा पिंपळकट्ट्यावर चर्चा

करीत बसले होते. एक एक करत लोकांची गर्दी वाढली. धरणाचा विषय चर्चेला आला नि जानत्या सोमा गावड्याला बोलण्याची संधी मिळाली. एक जाणकार, अनुभवी माणूस म्हणून लोक त्यांचा सल्ला घेत. धरणाविषयी चाललेल्या चर्चेला त्यांनी पुराणकथेची जोड दिली. ते म्हणाले,

'पोरानूं , गावावर राकसोबाचा कोप झालाय. म्हणूनच आज गाव सोडून जातली येळ यलेय.'

हे ऐकून लोक आश्चर्यचकित झाले. आपापसात कुजबुजू लागले.

'अण्णा, हे कसं काय ....?' गोंद्याने पृच्छा केली.

'अरे, ठाऊक न्हाय का ...... राकसोबाच्या टेकडीवर राकस ऱ्हात व्हता ते!'

'व्हय, असं म्हणत्यात. मग...?'

'पूर्वापार या भागात राकसोबाचं राज्य व्हतं,' सोमू अण्णा सांगू लागला.

'लई पूर्वीची ही गोष्ट. काय झालं... राकसोबा टेकडीवर तप करूस बसला. पोटात ना आन ना पाणी! उनात भाजला, पावसात भिजला; तरी तोंडात एकच जप 'ओम नम: शिवाय!' त्याची ही अवस्था बघून भगवान शंकरास दया यली. भोलानाथच तो! राकसोबास 'तो' पावन झाला... '

'अण्णा फुडे काय झालं?' लोक उत्कंठेने विचारू लागले.

'नको तेच घडल. भोल्यानाथाकडनं त्यास शक्तीचं वरदान मिळालं. म्हणून त्यो मस्तवाल झाला. त्यास शक्तीची घमेंड चढली...! त्यो लोकांस्नी तरास देऊ लागला. कधी माणसं खा, तर कधी जनावर खा; ...... त्याचं सुरू झालं. सगळ्यांची घाबरगुंडी उडाली. कुणी घराभाईर पडोस तयार व्हईनात.'

सारेजण कुतूहलाने ऐकत होते. त्यांचे चेहरे भयभीत झाले होते.

'फुडे ......?' एकानं भीत-भीतच विचारलं.

'फुडे काय? ही वार्ता पांडवासनी कळली. फिरेतफिरेत ते या भागात यले. पांडव यल्यावर साऱ्यासनी धीर यला. त्यांनी त्यांच्याकडे तकरार केली. समद ऐकून भीमास यला राग! त्यो राकसोबाच्या टेकडीवर गेला नि वरडू लागला,

'राकसोबा, भाईर प ऽ ड ...!'

'कोण हायरे ऽऽ... ' म्हणून आरडेत राकसोबा गुहेतनं भाईर यला.

'तुझा काळ' असं म्हणून भीमानं शड्डूच ठोकली. त्याबरोबर राकसोबा काय गप्प बसताय. राकसच त्यो... गेला भीमावर धाऊन. दोघांची चांगलीच जुंपली.

पर भीम पडला वस्ताद. ठसाठसा लगावले ठोसे तसा वरडत जमिनीवर पडला नि कावराबावरा होऊन त्यानं धूम ठोकली. तवापासून गाव शांत झालं. लोक गुण्यागोविंदानं ऱ्हाऊ लागले.'

'पळून गेला, तर आतं त्याची भीती कशापायी अण्णा?' रामूनं प्रश्न केला.

'तसं न्हाय, त्यो परत यलाय म्हणत्यात. दर आमवशेला टेकडीवर आसताय म्हणी. माणसासनी त्यो दिसत न्हाय. त्या येळेस त्यास पळवून लावलं, म्हणून त्यानं गावावर कोप धरलाय. आतं त्योच आमास पळवून लावताय.'

'त्याचा कोप शांत करूस उपाय न्हाय अण्णा?' गोंद्यानं चौकशी केली.

'न्हाय पोरा, ती येळ निघून गेलीय. त्याच्या कोपापासनच टेकडीखालच्या गावास राकसकोप म्हणत्यात. त्यो ऱ्हायचा तितं; पर कोप धरला आमच्या गावावर' अण्णांनी उत्तर दिले.

ही आख्यायिका असली, तरी आपण प्रत्यक्ष पाहिल्याप्रमाणे सोमू अण्णा सांगत होता. अज्ञानी, अंधश्रद्धाळू लोक त्यांच्या बोलण्यावर माना डोलवत होते. माणूस अगतिक झाला की भाकड कथांवरही त्यांचा विश्वास बसतो. बेळवट्टीच्या लोकांच्या बाबतीत असंच काहीसं झालं.

राकसोबाच्या टेकडीवर काही ठिकाणी दगडात पायाचे ठसे व टेकडीच्या पूर्वेला कोणा एका आडदांड माणसाची बसलेली छाप अजूनही दिसते. ती खरी की मानवनिर्मित हा संशोधनाचा विषय; परंतु ही पावले नि छाप राकसोबाची असल्याचे लोक मानतात.

## ४. ना वास्तू ... ना शांती

नव्या वसाहतीत घरांची उभारणी वेगाने सुरू होती. प्रत्येकजण आपापल्या परीने घराचे बांधकाम करून घेत होता. दोन-चार वगळता सगळी मातीच्या भिंतीची घरे! सिमेंट काँक्रिटचे घर पहायलाही मिळत नव्हते. श्रीमंत लोकांनी विटा व सिमेंटचा वापर करून भिंती बांधल्या. पण सारी खापऱ्यांचीच घरं - श्रीमंतांची लाल तर गरिबांची काळ्या खापऱ्यांची!

आमचे घर रद्याच्या भिंतीचे नि काळ्या खापऱ्यांचे. म्हणजे आम्ही कोणत्या वर्गात मोडत होतो हे सांगण्याची गरज नाही. परंतु अशी छोटी-छोटी घरे बांधण्यासही लोकांना मायबाप आठवले. 'घर पहावं बांधून नि लगीन पहावं करून' या म्हणीची बहुतेकांना सत्यता पटली. जुन्या घरांची नुकसान भरपाई म्हणून शे-दोनशे रुपये मिळाले ते पायातच खर्च झाले. आता पुढे? जो-तो सरकारच्या नावाने बोटे मोडू लागला.

'ते मुख्यमंत्रीबी लई मोऽट्या मोऽट्या गोष्टी सांगून

गेलं – घर देतो... शात देतो... खुटलं काय...? सगळी फसवाफसवी!'

'फुडाऱ्यांनी त्यांच्यावर इस्वास ठेवला नि गावास तोंडघशी पाडलं!'

'त्यांचं काय जाताय! बाप जाद्याची इस्टेट हाय... त्यांची घर सजत्यात... तुजं–माजं काय करतलं बग!'

'आमी गावच सोडूस नको व्हतं ... म्हणजे सरकार आपोआप वटणीवर यईतं!'

'गावात पोलीस यल्ले बघितलेस का न्हाय, सरकाराफुडे लोकांचं काय चालणार?'

त्यांच्या बोलण्यात होता संताप, दुःख आणि पश्चात्तापही! पण त्याचा आता उपयोग नव्हता. सरकारनं खुलविलं, पुढाऱ्यांनी माना डोलावल्या व लोक गुमान झाले. त्यात सरकारचं फावलं. मार्कंडेय नदीवर धरण झालं नि त्यात बेळवट्टी गाव व गावची शेती गेली. लोक बेघर, भूमिहीन बनले.

लोकांना राहण्यासाठी जुन्या गावाबाहेर पत्र्याची हंगामी शेड उभारली होती. त्यात राहून ते नव्या वसाहतीत नवीन घरे बांधत होते. निम्म्या – अधिक लोकांची घरे बांधून पूर्ण झाली. त्यांनी वास्तुशांतीची लगबग सुरू केली. आमचंही कसंबसं तीन खोल्यांचं घर तयार झालं होतं. एक दिवस रात्री अण्णा आईला म्हणाले,

'फुडल्या सोमवारी वास्तुशांतीचा म्हूर्त हाय म्हणत्यात. गावकऱ्यांनी ह्योच म्हूर्त पकडलाय... '

'तुमी काय ठरवल्याशी ऽ?'

'गावाबरोबर गेल्लं बरं... पर आदीचं करज; त्यात आनी हे म्हंजे...'

'होम तेवढ जाळून ऱ्हाऊस ईल की... पूजेचं मागनं बगूस ईल.'

'असं कसं? घरात पॉर, म्हातारी... हाय, कपड्यालत्याचं बगूस नको?'

'अडत्याकडे काय मिळालं तर बगा, फुडच्या सुगीत घील मोडून...'

'करजात जगतलं नि करजात मरतलं; हेच आमा गरिबाच्या नशिबात...!'

'काय करणार? चाली–रिती कुणास मोडूस येत्यात?'

अंथरूणात पडूनच दोघांचं हे बोलणं ऐकलेल्या बायला (आजीला) राहावलं नाही. ती म्हणाली,

'खुटल्या चालीरिती लेका! आसंच करा, तसं नको म्हणून देवानं कुणास सांगोस न्हाय. हे सगळे आपल्या मनाचे खेळ हैत. पद्धत म्हणून जम्याल तस

करतलं!'

'लोकलाजेस तर करूस पयजे .......!' अण्णा म्हणाले.

'आपलं दु:ख दूर करूस लोक यण्णांत लेका! ते आमचं आमीच निस्तरूस पायजे. आपलं मन शांत तर घर शांत! त्यासाठी वास्तुशांतीच करूस पायजे असं न्हाय! पद्धत म्हणून जम्याल तस करा.'

जुन्या काळातली बाय, पण विचारानं पुढारली होती. संतांच्या विचारसरणीचा तिच्यावर प्रभाव होता. 'देव भक्तीचा भुकेला' असल्याचे सांगून देवाच्या नावाने नसती ढोंगं न करण्याचा ती सल्ला देई. वास्तुशांतीच्या बाबतीतही तिने असाच सल्ला दिला.

गावातील ते संमिश्र चित्र आजही माझ्या डोळ्यासमोर उभे आहे. एकीकडे आनंद, उल्हास; तर दुसरीकडे निराशा नि दु:ख! घरे बांधून पूर्ण झालेल्या लोकांनी वास्तुशांती व सत्यनारायण पूजेचा बेत आखला होता. कुणी साधेपणाने तर कुणी थाटामाटात! अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर गृहप्रवेश करून नव्या घरात नव्याने संसार सुरू करण्याची त्यांची लगबग सुरू होती.

दुसरीकडे घरांचे अर्धवट बांधकाम झालेले लोक, डोकीला हात लावून बसले होते. पावसापूर्वी घरं झाकायची त्यांना चिंता होती– त्यांच्या जीवनात कुठली आली वास्तुशांती!

***

उगवतीला सूर्यनारायणाचे आगमन झाले. सोनेरी किरणांनी गाव न्हाऊन गेला. सर्वत्र प्रसन्नतेची उधळण होऊ लागली. सनईच्या सुरांनी आसमंत भरून गेला. गावात सर्वांची एकच धांदल –शुभमुहूर्तावर गृहप्रवेश करून वास्तुशांती व पूजेचा कार्यक्रम आटोपता घ्यायची!

गावात सणाचे स्वरूप होते. घरे सजली होती. रंगरंगोटीने त्यांना नवा साज चढला होता. घरांसमोर सडासारवण करून त्यावर सुंदर रांगोळ्या रेखाटल्या होत्या. चौकटींवर बांधलेल्या तोरणांमुळे घरांना नव्या वधूचा साज आला होता. सनईच्या सुरांमुळे एक प्रकारे मांगल्याचा साक्षात्कार होत होता.

लाऊड स्पीकरवरील गाण्यांनी आसमंत दुमदुमत होता. गावात काही तरी वेगळे असल्याची त्यामुळे जाणीव होत होती. त्या काळात बड्या व्यक्तींच्या घरीच अशा कार्यक्रमांत स्पीकर वाजायचा. लग्न, वास्तुशांतीसारख्या कार्यक्रमात

स्पीकरचा वापर म्हणजे मोठेपणाचे लक्षण!

'स्पिकर लावून थाटात लगीन झालं,'

अशी अभिमानाने म्हणा वा गर्वाने.... लोक चर्चा करीत. गावात सरपंचांचे घर वगळता अन्य कुणाच्याच कार्यक्रमात स्पीकर नव्हता. त्यामुळे त्यांच्या कार्यक्रमाचे वेगळेपण स्पष्ट जाणवत होते.

सरपंच रामराव पाटलांचे घर कौलारू असले तरी, त्याचा डौल राजवाड्यासारखा! त्यांनीही वास्तुशांतीसाठी याच मुहूर्ताची निवड केली होती. त्यांच्या घराकडे लोकांची वर्दळ अधिक. सरपंच त्यांचे स्वागत करण्यात व बडदास्त राखण्यात मग्न झाले होते.

सरपंचांचा गोतावळाही मोठा! राधाकाकू सरपंचांच्या पत्नी. कार्यक्रमाच्या देखरेखीबरोबरच येणा-जाणाऱ्यांचे स्वागत करण्यात त्या गढून गेल्या होत्या.

'आईसाब, भटजी यल्यात जी. तुमास बोलावत्यात' घाईघाईने आलेल्या घरगड्याने निरोप दिला.

'अरे, मग जा. मालकासनी निरोप दे' राधाकाकूंनी सांगताच घरगडी निघून गेला.

सरपंच पाहुण्यांशी बोलण्यात रमून गेले होते. निरोप मिळताच ते माजघरात आले. भटजी तेथे घट व होम मांडण्याची तयारी करीत होते.

' महाराज, नमस्कार! येळ केल्याशी...,' रामरावानी त्यांचे स्वागत केले.

'अहो, तुमच्या गावात यायचं म्हणजे वेळ सांगून चालत नाही. त्यात ना बसची सोय ना इतर वाहनांची! सकाळी सहा वाजताच घरातून बाहेर पडलो होतो, बेळगुंदीपर्यंत बसने आलो. तेथून पुढे तुम्ही पाठविलेल्या बैलगाडीने आत्ता येऊन पोहोचलो. मी विशेष करून लांबचा विडा घेत नाही; परंतु तुम्हाला नाही म्हणता येत नाही, म्हणून आलो. आता उशीर नको, मुहूर्त जवळ आला. लगबगीने सामानाची तयारी करा,' अशा त्यांनी सूचना केल्या.

सकाळचे नऊ वाजले होते. गृहप्रवेशाचा मुहूर्त जवळ आला होता. भटजींच्या सूचनेवरून सुहासिनींसमवेत राधाकाकू विहिरीवर गेल्या. विहिरीची पूजा करून कलश भरून घेतला आणि त्या सवाद्य मिरवणुकीने घराकडे आल्या. चौकटीतच आरती ओवाळल्यानंतर साडेनऊच्या शुभमुहूर्तावर त्यांनी विधिपूर्वक गृहप्रवेश केला. त्यानंतर रिवाजानुसार गोमातेचा गृहप्रवेश! तिने उजव्या पावलाने उंबरठा ओलांडताच सर्वांच्या चेहऱ्यावर प्रसन्नता पसरली.

‘बरं झालं बाई, शुभशकून घडला!’ दुर्गामावशी म्हणाल्या.

‘अहो, गोमातेचा यशस्वी गृहप्रवेश हे यशस्वी संसाराचे शुभचिन्हच.’ भटजीनी त्यांच्या मताला दुजोरा दिला. त्यावर सगळेच आनंदले.

‘आता वेळ नको, होमाची तयारी करा. फलपुष्प, पंचकाष्ट, गोमूत्र, दूध, तूप, धूप, नारळ,... घ्या,’ भटजींनी सूचना केल्या.

संपूर्ण घरात सुगंधयुक्त धूर दरवळला. भटजींचा मंत्रोच्चार घुमू लागला. सरपंच नि राधाकाकू पूजेला बसले. भटजींच्या सूचनेनुसार सत्यनारायणाला फुले, गंध, हळद-कुंकू वाहू लागले. भटजींनी पूजेचे महत्त्व सांगणारी कथा ऐकविली. सत्यनारायणाची पूजा विधिपूर्वक पार पडली. सामूहिक आरतीनंतर सर्वांनी तीर्थ-प्रसादाचा लाभ घेतला. स्वादिष्ट भोजनाने तृप्त होऊन पाहुणे मंडळी परतली.

पोलीस पाटील, नाना दुकानदार, थोरला गावडा,...आदींची वास्तुशांतीही अशीच जोरात झाली.

***

बड्यांची वास्तुशांती थाटात झाली; परंतु छोट्यांचं...? वास्तूच जाग्यावर नव्हती तर शांती कसली! चौगुले गल्लीत घरांच्या अर्धवट भिंती उभ्या होत्या... छप्परांचा पत्ता नव्हता. आंबेडकर गल्लीत सगळीकडे पाया काढलेल्या मातीचे नि दगडांचे ढीग! कुणी रद्दा कालवीत होता; तर कुणी डोकीला हात लाऊन काढलेल्या पायाकडं नजर लावून बसला होता.

नलावड्याचा नाग्या भर उन्हात घाम गाळीत दगड-मातीने पाया भरीत होता. पलीकडेच काम करणारा गुरवाचा गोंद्या त्याला म्हणाला,

‘नाग्यादा, सरपंचाची... वास्तुशांती लई थाटात झाली म्हणत्यात.’

‘अरे, मोट्या लोकांचं मोट्ट! बापजाद्यांनी कमवून ठेवलंय... मारत्यात उड्या! तुज्या-माज्यासारख्या गरिबानं काय करतलं याचा इचार कर.’

‘न्हाय गा, ह्याच लोकांनी गावाची वाट लावल्यानी बघ. धरण बांधोस परवानगी देऊन साऱ्यासनी देशोधडीस लावल्यानी.’

त्यांचं हे बोलणं ऐकूण शेजारीच रद्याची भिंत घालणारा पांडू मोरय्या मध्येच म्हणाला,

‘त्यांचं काय जाताय? तुझ्या-माझ्या सारखा फाटका माणूस मरताय ह्यात. पावसाच्या आगूदर घरं तयार झाली न्हाईत तर सगळी म्हेणत वाया जाईल बघ.’

‘घरं पुरी करतली तर कशी गा? खिशात न्हाय दमडी नि आमी घालतोय

फुगडी!’

‘घरं बांधून देणारं ते सरकारबी दमलं बग.’

‘अरे, त्यासाठी सरपंच, पाटलानं परयत्न करूस नको? त्यांची घर सजली... पोट भरली; आमच्याकडे कशापायी बघतील?’

एक ना अनेक! प्रत्येक जण आपलं दु:ख, वेदना व्यक्त करीत होता. एकीकडे राव वास्तुशांतीचा उल्हास साजरा करीत होता, तर दुसरीकडे रंक दारिद्र्याने हताश झाला होता.

# ५. संताप

रोहिणी नक्षत्राचे आगमन झाले. अधूनमधून आकाशात काळ्या ढगांचा लपंडाव सुरू झाला. शेतीच्या मशागतीसाठी शेतकरी वळीव पावसाची प्रतीक्षा करू लागले. पावसाचे ढग आकाशात तरंगू लागताच, त्यांच्या मनात आशांकुर उमलला खरा; मात्र त्यामुळे काही लोकांच्या मनात चलबिचल सुरू झाली. दारिद्र्याच्या खाईत जीवन कंठणाऱ्यांना शेतीची नव्हे; तर अर्धवट स्थितीत असलेल्या घरांची चिंता होती. मृग नक्षत्र तोंडावर आले होते. मॉन्सूनला सुरवात झालीच तर...? मोठ्या कष्टाने उभारलेल्या मातीच्या बोडक्या भिंती जमीनदोस्त होतील, याचीच त्यांना धास्ती!

'बड्यांचा घर प्रवेश थाटात झाला, सत्यनारायणाची पूजाबी झाली!... आमची घरंच जाग्यावर न्हाईत तर प्रवेश खुटला नि पूजा कसली?'

असा प्रश्न ते स्वत:शीच करू लागले. त्याचे उत्तर मात्र त्यांना गवसत नव्हते. त्यामुळेच–

‘दरिद्री नारायणच मागे लागल्यावर सत्यनारायणाची पूजा कशी करणार?’

अशी निराशेची भावना ते व्यक्त करू लागले.

गावापेक्षाही भयानक परिस्थिती गावकुसाबाहेर जगणाऱ्या हरिजन बांधवांची! पोटाला चिमटा देऊन ते राहण्यासाठी निवारा उभारण्याच्या धडपडीत होते. दु:ख गिळून नवे संसार थाटण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू होता; परंतु पदरी निराशाच! भिक्या म्हाराच्या चेहऱ्यावर ही अस्वस्थता स्पष्ट जाणवत होती. जुने गाव सोडल्यावर सारा संसार उघड्यावर पडला. कशाबशा मातीच्या भिंती उभ्या केल्या. हातातला पैसा संपला नि सरकारच्या मदतीची तो प्रतीक्षा करू लागला; परंतु सरकारी मदत काही मिळाली नाही. कर्जासाठी सावकारांचे उंबरठे झिजविले; पण त्याचाही काहीच उपयोग झाला नाही.

‘सरकारानं भुलिवल्यानं नि सावकारानं फसिवल्यानं,... गरिबास ना कुणी वाली ना तारणहार! म्हारास तर न्हाईच न्हाय! आतं ऱ्हातलं खुटे नि करतलं काय?’

त्याच्या डोकीत विचारचक्र सुरू होतं.

‘वळवाचं कायबी सांगोस यण्णाय. उघड्या भिंतींवर उभ्या पावसाचा मारा झालाच तर...?’

भिक्याच्या मनात चिंतेचे ढग डोकावू लागले. जुन्या गावठाणातील झोपडीची चौकट तेवढीच उपयोगात आली होती. नुकसानभरपाई म्हणून मिळालेल्या दोनशे रुपयांची रक्कम दगड, मजुरीतच खर्ची पडली. आता पावसाळ्यापूर्वी बाकीचे काम पूर्ण करण्याची विवंचना त्याला सतावू लागली.

त्या रात्री त्याला झोप आली नाही. डोकीत विचारांचे काहूर माजले होते. भविष्याच्या चिंतेचे ढग थैमान घालीत होते.

‘पाऊस सुरू व्हायच्या आदी घरावर खापऱ्या चढल्या न्हाईत तर...?’

विचाराच्या गोंधळातच त्याच्या मनात एक कल्पना तरळली. तो पहाटेच उठला नि घाईघाईने रामराव पाटलाच्या मळ्यात गेला. तोडलेल्या उसाचा रवंदा गोळा करून भारा डोकीवर घेतला नि लगबगीने घराकडे परतला.

मातीच्या भिंतींवर रवंदा घालून पावसापासून तात्पुरते संरक्षण करण्याची त्याने शक्कल लढविली होती. पायाखाली बॅरल घेऊन बोडक्या भिंतींवर तो लगबगीने खंवदा पांघरू लागला. तात्पुरत्या निवाऱ्यासाठी शेजारीच बांधलेल्या झोपडीतून रखमीने हे पाहिले. नवऱ्याच्या कामाची लगबग पाहून तिला त्याची

कीव आणि तेवढाच रागही आला. नीट करण्यासाठी सुपात घेतलेले तांदळाचे दाणे तिने तिथेच टाकले नि गडबडीने बाहेर आली. कपाळावर आठ्या आणून तिटकाऱ्यानेच ती म्हणाली,

‘ आजी ऽ, येड्यागत हे काय चाललंय तुमच? फाटकं कापड डोचकीवर घेऊन आंग भिजायचं ऱ्हानार हाय व्हय?’

‘च्या ऽ आयला! तेबी घेतली ताकद न्हाय नि मोठी आंगी घालायचं काय बोलतीस? कसंतरी आब्रू झाकूस नको?...’

‘तर काय, असंच टाकणार...? पाऊस सुरू झाला म्हंजी...? आसक मुसाळ केरात! काय तर मारग काडूस नको?’

‘खापऱ्या इकत घेऊस पैसा काय तुझा बा देणार?’

‘माझ्या बाचं अडलंय घोड! त्यो काय म्हणून दील. तुमचा संसार...!’

‘तस न्हाय ग, समद म्हाईत असोनबी इचारतीस म्हटल्यावर बोलोच लागलं! छप्परासाठी वासे, कारविच्या काट्यां... समदं तयार हाय. खापऱ्यांची यवस्था तेवढी केली म्हंजे झालं.’

‘व्हय, खरं ही यवस्था कधी करणार? येळ निगोन गेल्यावर त्याचा काय उपेग? सरपंचाकडनं हाणा की दोनसे रूपडं मागून. मजुरीस जाऊन फेडूस ईल!’

‘तर काय, गप्प बसलोय व्हय? त्यांच्याकडेबी जाऊन यलो, ते बगुसबी तयार न्हाईत. मागे घेतलेलं पैसं दे, मग ईचार करू म्हणालं. नाना दुकानदार तर जवळ घेऊसबी तयार न्हाय. सरकारान गावातनं हाकललं, नि सिरमंतानं झिडकारलं! अशी आमची गत! गरिबास वाली हाय कोण? त्यात आमी पडलो म्हार---.’’

आता रखमीला काय बोलावे सुचेना. हनुवटीला हाताचा आधार देऊन ती झोपडीच्या चौकटीत गुमान बसली.

‘गरिबांच्या जीवनाची अशी फरपट ही व्हायचीच. म्हणून संसारातनं कुणी पळून जात न्हाय. परत्येकाच्या जीवनात तडजोड ही ऱ्हाणारच...!’ अशी मनाची समजूत काढून ती म्हणाली,

‘खुटे पैशाची सोय झालीच न्हाय, तर कारवीचा थाट करून त्यावर खंदाच घाला ऽ. गरीब म्हारास गवताची झोपडीच शोभून दिसतेय. मोठ्या घराचं सपानं कशापायी बघायचं.....?’

भिक्याला बायकोची कल्पना एकदम पटली.

'अडाणी असली तरी थोडं शानपाण हाय जवळ' असं वाटून तो डोकं खाजवीत म्हणाला,

'तुजबी बरोबर हाय. आणखी चारचौगासणी इचारतो, न्हायतर 'त्यो' शेवटचा उपाय हायच की!'

कारभारणीच्या सल्ला मानून तो कामाला लागला.

पलीकडच्या गल्लीत गोंद्या चौगुला, हनम्या नलावडा, व्यंकु नाकाडी ........ अनेकांची घरं अर्धवट स्थितीत उभी होती. कुणाच्या भिंती चौकटीपर्यंत चढल्या होत्या, तर कुणाच्या घरावर केवळ थाट तयार होता. काही जणांच्या घरांवर खापऱ्या चढल्या होत्या; परंतु त्यापुढची सगळीच कामं अडून होती. गावच्या सावकारांचे उंबरठे झिजवले, नातेवाइकांची मनधरणी झाली; परंतु कुणीच कुणाला प्रसन्न झाले नाही. श्रीमंतालाच धनिक धार्जिण असतो! अगदी तसेच झाले. जुन्या गावात लोकांची शेतीभाती होती, घरोघरी धनधान्याच्या राशी येत होत्या, तेव्हा सगळेच पाहुणेपणाची ओळख दाखवीत. आता धरणात सगळेच गमवावे लागल्यावर पाहुणेही दूर झाले. 'शितेच संपल्यावर भुते जमणार कशी...?'

***

हनम्याच्या घरासमोर लोक घोळका करून बसले होते. ते चर्चेत रमले होते; परंतु त्यांच्या चर्चेत समाजकारणाचे, राजकारणाचे, गावच्या विकासाचे विषय नव्हते. त्यांच्या दृष्टीने हे सगळे विषय सध्या फालतूच होते. त्यांच्या चर्चेत होती उद्याची चिंता! जुनी घरे कोसळली, उदरनिर्वाहाची शेती पाण्याखाली गेली. आता रहायचे कुठे नि खायचे काय? अन्न, वस्त्र, निवारा या जगण्यासाठीच्या मूलभूत गरजाच पूर्ण होणार नसतील तर त्यांच्या डोकीत दुसरा विषय येणार तरी कसा?

'काय गा, सरपंचाची वास्तुशांती लईऽऽ झोकात झाली, लई मोठमोठ्ठे पावणे यल्ले म्हणत्यात.......' हनम्यानेच विषय काढला.

'अरे ऽ, व्हणारच की. गावचा सरपंच हाय, जवळ पैसा हाय. कुणा जवळ शब्द टाकला, तर लाखानं देत्यात. मग पूजा झोकात करणार न्हाय तर काय?' गोंद्या म्हणाला.

'ते बी खरंच हाय रे. तुझ्या-माझ्यासारख्या फाटक्या माणसाजवळ कोण येणार नि आमास कोण देणार?'

'ते जाऊदे गा. आमची घरं कशी झाकतली ह्याचा आतं इचार करा,

मिरगाच्या आधी घरांवर खापऱ्या चडोस न्हात तर, केल्लबी गमाऊन बसतली येळ ईल.'

'ते मुख्यमंत्रीबी लई मोठमोठ्या गोष्टी बोलून गेलं. आम्ही त्यांच्या थापासनी भुललो नि माना डोलावल्या. आतं बसा त्यांच्या नावानं ठणाणा करीत!'

'अरे, मोठ्या लोकांच्या गोष्टीच तेवढ्या मोठ्या. सगळ्यानी त्यांच्यावर ईस्वास ठेवला नि सोन्यासारखं गाव-घर घालीवलं.''

'झाल्लं होऊन गेलं! हे समद बोलून आतं काय उपेग? इरोध करतल्या वक्ताला समद्यानी माना डोलावल्या. मुख्यमंत्री गावात यल्ले, त्या यळलाच इरोध करूस पायजे व्हता. मीय्या मिटिंगात इचारलं, तर सगळ्यानी माजच गुमान बसोस सांगितलं. त्या येळेसच नाक दाबलं आसतं, म्हंजे त्यांच तॉंड उगाडलं असतं. ती येळ गेल्यावर बोलोन काय उपेग?' हनम्यानं आपला संताप व्यक्त केला.

'पोरानू , ते सगळं खरं हाय, आतं उद्याचं काय याचा इचार करा. कायतरी उपाय काडतलं बोला,' म्हाताऱ्या संतूकाकानं सल्ला दिला.

गावात संतूकाकाला मान होता. लोक त्यांच्या शब्दाला किंमत देत. कायदा कशाशी खातात ते संतू काकाला माहिती नव्हतं; परंतु आपल्या अनुभवातून लोकांना चार उपदेशाच्या गोष्टी ते सांगत. कुणाच्या घरात भांडण झालं, कुणाची मारामारी झाली, तर संतूकाका तेथे हजर! आपल्या पद्धतीने ते न्यायनिवाडा करीत. कुणी पोलीस ठाण्यात गेलेलं त्यांना आवडत नसे. सामोपचाराने भांडणे मिटविण्यावर त्यांचा भर असायचा. सरकारच्या आश्वासनावरही त्यांनी असाच विश्वास ठेवला नि लोकांना सबुरीचा सल्ला दिला. आता सरकारनेच फसगत केली आणि लोक संतूकाकाला दोष देऊ लागले. त्यामुळेच हनम्याही आज रागाने बोलत होता.

'सबुरीनं घेतल्यानंच ही पाळी यली. हातची घरं गमाऊन, वाऱ्यावर पडतली येळ यली. आतं नुसतं इचार करून न्हाय चालायचं. सर्कार आडचणीत ईल असंच काय तरी करूस पायजे, तरच सरकारचे डोळे उगाडतील.'

'व्हय-व्हय असच कायतरी करूस पायजे' पोरांनी त्याला साथ दिली.

'काय तरी करूस पायजे म्हंजे काय करणार रे पोरांनू!' संतू काकाने विचारले. त्यावर हनम्या म्हणाला,

'धरणाचं कामच बंद पाडतलं, म्हंजे सरकार ईल पळेत!'

'अरे, असं भलतंच काय तरी करून गोत्यात यशीला! जरा इचारानं वागा.'

'आतं लई इचार झाला. इचार करूनच ही येळ यली!'

शब्दावरून शब्द वाढले. तरुण पोरं आंदोलनाची भाषा करू लागली. जाणत्या लोकांच्या कुंडलीत हे बसणारं नव्हतं.

'हल्लीच्या ह्या पोरांसनं सांगोन काय परिणाम व्हायचा न्हाय!' म्हणत संतू काकाने हळूच घरची वाट धरली. बाळापगौडा, निंगापदा, लक्षाण्णा त्यांच्या मागून गेले. पंख छाटलेल्या पक्ष्यांसारखी तरुणांची स्थिती झाली.

'आसं करूनच ह्यांनी गावास खड्ड्यात घातल्यानी!' असा संताप व्यक्त करीत पोरंही तेथून निघून गेली.

## ६. फसवणुक

पावसाळा तोंडावर आला; तशी साऱ्यांची एकच धांदल उडाली. कुणी घाई-गडबडीत शेतीची मशागत करू लागला, तर कुणी पेरणीच्या तयारीला लागला. परंतु अठरा विश्वे दारिद्र्यात जगणाऱ्यांना लागली वेगळीच चिंता - आपल्या घरांच्या उघड्या भिंतींवर निवारा घालण्याची!

'ऱ्हायला आसरा मिळाला तर पोटासाठी खुटेतरी हातपाय हलवता ईल,' म्हणत ते बोडक्या भिंतींकडे हताशपणे पहात बसले होते. तसा त्यांच्याजवळ दुसरा पर्यायही नव्हता. विचार करूनही मार्ग दिसत नव्हता. सरकारकडे याचना केली, सावकाराचे उंबरठे झिजविले; पर कुणीच पावन झाले नाही. राजकीय पुढारी येत, सहानुभूतीचे दोन शब्द बोलून निघून जात. परंतु कोरड्या सहानुभूतीने दु:खांचा परिहार झाला असता तर माणसाला चिंताच करावी लागली नसती.

लोक आपापसात कुजबुजत होते, गावच्या

पुढाऱ्यांच्या नावाने खडे फोडत होते; पर अन्यायाविरुद्ध बंड करण्याची हिंमत त्यांच्यात नव्हती. किंबहूना अज्ञानामुळे ' जे लिहिले संचिती, न चुके कल्पांती।।' म्हणत ते सारे गुमान अन्याय सहन करीत होते. शहरात राहून चार बुके शिकलेला हनम्या अधूनमधून लोकांना चेतवण्याचा प्रयत्न करायचा. परंतु गावचे पुढारी दटावून त्याचे तोंड बंद करायचे. एकदा चारचौघात बोलताना तो म्हणाला,

'मुख्यमंत्री आलं नि आसेचं गाजर दाखवून निघून गेलं. म्हणालं तुमीच आमच मायबाप! तुमची सेवा ह्योच आमचा धरम! तुमासनी घर देतो, शेतीबी दितो! पर धरणास इरोध करू नगसा...; त्यांनी आपलं काम साधलं नि आराम बसलंय बंगळुरात. आता तुमी बसा टाळ कुटीत दारात.'

हनम्याच्या बोलण्यावर सारे व्हय, व्हय म्हणत माना डोलवायचे. पर त्याला साथ देण्याचे कुणी धाडस करायचे नाहीत. तोच एक दिवस पहाटेच मादाराने गावात सादविले,

' लक्ष्मीच्या देवळात दहा वाजता मिटिंग हाय गा ऽ पो ऽ ऽ'

ताकीद ऐकताच लोकांत कुजबूज सुरू झाली. त्यांनी मादाराकडे चौकशी केली. पर त्याला काय माहीत? तो हुकमाचा ताबेदार. सरपंचांनी सांगितले नि त्याने सादविले. मात्र –

'कुणी फुडारी येणार हाईत म्हणी!' एवढी त्याने माहिती दिली.

'बैठक कशापायी... विषय काय...?' त्याला माहित नव्हते. त्यामुळे लोकांचे कुतूहल पुन्हा वाढले.

गावच्या मध्यभागी लक्ष्मी देवीचे मंदिर. गावच्या स्थलांतराच्या निर्णयानंतर सरकारी अनुदान आणि गावकऱ्यांचे श्रमदान यातून नव्या वसाहतीत मंदिर उभारण्यात आले. बैठक असो वा काही कार्यक्रम, लोक याच ठिकाणी जमा व्हायचे. आजही लोक मंदिराच्या व्हरांड्यात जमा झाले. जो–तो एकमेकाला विचारू लागला,

'काय गा, मीटिंग कशापायी?' याला प्रत्येकाचे उत्तर एकच,

'माज काय म्हाईत न्हाय बग. सारं काय सरपंचासच ठाऊक!'

एवढ्यात सरपंच रामराव पाटील मंदिरात दाखल झाले; तशी कुजबूज थांबली. त्यांच्या सोबत शेजारच्या बेळगुंदीचे बडे पुढारी संपतराव सातपुते आले होते. मध्यभागी ठेवलेल्या खुर्च्यांवर ते विराजमान झाले.

संपतराव तसे लोकांना नवीन नव्हते. भागाच्या सार्वजनिक कामात ते

आघाडीवर असायचे. राजकीय क्षेत्रातही त्यांचा बोलबाला होता; बेळवट्टीचे लोक मात्र राजकारणापासून नेहमीच नामानिराळे! ऊन –पावसाची कदर न करता शेतात राब राब राबणं एवढंच त्याना माहीत. राजकारण – समाजकारण कशाशी खातात याचा त्यांना थांगपत्ता नव्हता. त्यांच्या भाबडेपणाचा संपतरावांसारख्या पुढाऱ्यांनी फायदा उठविला; परंतु त्याचा जाब विचारण्याची हिंमत कुणाला झाली नाही.

संपतरावांचा कावेबाजपणा त्यांच्या बोलण्यातून आणि चेहऱ्यावरूनही स्पष्ट होई; परंतु तो समजण्या इतका बेरकीपणा बेळवट्टीच्या लोकांत नव्हता. पांढरपेशा लोकांवर विश्वास ठेवून त्यांच्या मागून धावत राहणे एवढेच त्यांना माहीत. अशा भोळेपणामुळेच पदरात काहीच पाडून न घेता गावठाण आणि सुपीक शेती त्यांना गमवावी लागली होती.

संपतराव आज काय सांगणार याविषयी लोकांत उत्कंठा होतीच. एवढ्यात सर्वांना शांत राहण्याचे आवाहन करून सरपंच म्हणाले,

'बंधूंनो, बेळवट्टी गाव आज मोठ्या संकटात हाय. लोकांसनी कामधंदा तर न्हाईच, शिवाय हातची शेती गेल्यापासनं पोटास गाठ मारून जगतली येळ यलेय. त्यात अनेकांची घरं अद्याप बांधून पूर्ण झाली न्हाईत. लोकांजवळ पैसा न्हाय, मग अर्धवट घरं पुरी कशी करतली हीच साऱ्यांपुढे चिंता! संपतरावांकडे आमी ही अडचण मांडली. म्हणून लोकासनं मदत मिळवून देण्यासाठी ते आज धाऊन यल्यात. या अडचणीतनं काही तरी मार्ग काडण्याची त्यांची योजना हाय. त्याचीच म्हाईती ते आज देणार हाईत.'

संपतरावांचे स्वागत करून ते खाली बसले.

'बुडत्याला काडीचा आधार' असेच लोकांचे झाले. संपतराव आता काय सांगणार, कुठून मदत मिळवून देणार...? याची त्यांना उत्कंठा लागली.

संपतराव उभा राहिले. आपल्या पीळदार मिशांवर त्यांनी रुबाबात हात फिरविला. डोकीवरची पगडी सरळ केली. त्यांचा डौलही तसा पुढारपणाला साजेसाच होता; परंतु त्यांच्या मनाचा अंत कुणाला लागायचा नाही. त्यांची बोलण्याची ढबही तशीच होती. लाघवी बोलणं पण त्यातही मोठी गूढता. लोकांना आपलंसं करण्याचं त्यांचं वाक्चातुर्य मोठं! आजही अशीच जादू त्यांनी लोकांवर टाकली आणि जणू त्यांना भुरळच घातली. बंडीच्या खिशात हात घालून एकवार लोकांवरून त्यानी नजर फिरवली. जणू त्यांच्या मनाचा

कानोसा घेत ते म्हणाले,

‘बेळवट्टी गावच्या ‘त्यागी’ बंधू– भगिनींनो –

बैठकीला कोणी भगिनी नव्हत्याच; परंतु नेहमीच्या सरावानुसार त्यांच्या तोंडून तसे शब्द आले असावेत. लोकांच्या लक्षात हा विनोद आला नाही. मात्र ‘त्यागी’ शब्दावर ते सुखावले नि त्यांनी टाळ्या वाजविल्या. त्यामुळे पुढाऱ्यानाही जोश आला अन् त्यांच्या शब्दातील जोर वाढला.

‘बेळगाव शहराची पिण्याच्या पाण्याची अडचण ध्यानी घेऊन राकसकोप धरणात तुम्ही घरादाराचा त्याग केलात; परंतु तुमच्या त्यागाचं मोल सरकारने दिलेलं नाही. त्यामुळेच आज भिकेकंगाल होऊन तुम्हाला वाऱ्यावर पडण्याची वेळ आली आहे. सरकारने जनतेची फसवणूक केली, तरी आम्ही तुम्हाला वाऱ्यावर पडू देणार नाही; परंतु यासाठी तुमची संघटित साथ हवी.’

पुन्हा टाळ्यांचा कडकडाट झाला. हनम्या मध्येच उभा राहून म्हणाला,

‘सायेब, वाट्टेल ते सहकार्य करायची आमची तयारी हाय; पर आमची बोडकी घर पावसाळ्यात कोसळणार न्हाईत एवढं करा.’

बाकीच्या लोकांनी ‘व्हय ऽ व्हय ऽ’ म्हणत माना डोलावल्या.

मासा गळाला लागल्याचे त्यानी बरोबर हेरले अन् शब्दांची फेक पुढे चालूच ठेवली. ते म्हणाले,

‘सरपंचांनी, तुमचं दुःख आमच्यासमोर मांडलं. सामाजिक बांधिलकीतून तुम्ही जुनी घरं सोडली. आता नवीन घरं बांधून पूर्ण करण्यास सहकार्य करणं सरकारचं नैतिक कर्तव्य आहे; परंतु ‘गरज सरो आणि वैद्य मरो’ असेच सरकारचे धोरण. त्यात आम्हा मराठी माणसांकडे कर्नाटक सरकार सापत्न भावनेने पहाते. त्याचा आम्ही निषेध करतो. तुमची अर्धवट स्थितीतील घरं पूर्ण होऊन पावसाळ्यापूर्वी तुम्हाला निवारा मिळावा यासाठी हौसिंग सोसायटीची योजना आखली आहे. सोसायटीच्या भागधारकांना कर्जस्वरूपात आर्थिक मदत, सिमेंट, कौले यांसारखे सहकार्य करण्यात येईल. गरजू लोकांनी सोसायटीचे भाग खरेदी करून योजनेचा लाभ घेतला पाहिजे.’

अडचणीत सापडलेल्यांना एक मोठा आधार मिळाल्यासारखे वाटले. लोकांनी सोसायटीचे भाग खरेदी करून कर्जासाठी अर्ज केले. कोणी सिमेंट घेतले, कोणी कौले घेतली, कोणी कर्ज स्वरूपात आर्थिक मदत घेऊन घरांची कामे पूर्ण करून घेतली.

***

लोकांची एक मोठी चिंता दूर झाली. त्यांना राहण्यास एकदाचा निवारा मिळाला. त्यामुळे लोक संपतरावांविषयी कृतज्ञता व्यक्त करू लागले; परंतु अद्यापही अनंत समस्या समोर होत्याच. त्यांना तोंड देत लोकांनी आपलं रहाटगाडगं कसंतरी चालविलं होतं. मोलमजुरी करून ते आपला उदरनिर्वाह चालवीत होते. अशीच काही वर्षे गेली आणि एक दिवस लोकांना बँकेच्या नोटिसा आल्या. हौसिंग सोसायटीमार्फत घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्याबाबत त्यांमध्ये सुनावण्यात आले होते. नोटिसा पाहून लोक चक्रावलेच. त्याला तसे कारणही होते. कर्ज न घेतलेल्याही कांही लोकांना नोटिसा आल्या होत्या. हजार-पाचहजार कर्ज घेतलेल्यांच्या नावावर दाम दुप्पट कर्ज पडले होते. यामागचे गौडबंगाल कोणालाच उलघडले नाही.

बेळवट्टीचे लोक सरळ मार्गी. लांडी-लबाडी त्याना माहीत नव्हती. बँकेच्या नोटिसा पाहून ते गोंधळले.

'काय गा, आतं काय करतलं? पैसे खुटनं भरतले?' देव्या म्हणाला.

'पैसे घेतले तर भरूस पायजेच गा, खरं पैसे न घेताबी माज नोटीस यलेय त्याचं काय?' तुक्या गावड्यानं खंत व्यक्त केली.

'मीय्या तर पाचच हजाराचं करज घेतंल व्हतं, तर पंदरा हजाराची नोटीस यलेय.' पांडू गुरव म्हणाला.

'गाजार दाकवून साऱ्यांची फसगत केल्यांनी गा.' हनम्यानं आपली शंका व्यक्त केली.

संपतराव सातपुतेनी मदत मिळवून दिली, आता तेच काही मार्ग काढतील असे लोकांना वाटले नि त्यांच्याकडे जाण्याचा निर्णय झाला.

लोक आले, त्या वेळी संपतराव आपल्या कार्यालयात होते. बेळवटकर आल्याची सूचना देऊनही त्यांनी विशेष दखल घेतली नाही. लोक तास-दोन तास बाहेर ताटकळत बसले; परंतु त्यांना वेळेत भेटण्याचं सौजन्य त्यांनी दाखविलं नाही. लोकांच्या मनात शंकेची पाल चुकचुकली. ते अस्वस्थ झाले. कुठेतरी पाणी मुरत असल्याचा त्याना संशय आला. ते आता एकमेकाला दोष देऊ लागले. त्यांच्या बोलण्यातील आवाज वाढला, तेव्हा कुठे पुढारी बाहेर आले. लोकांच्या येण्याचं कारण जाणून घेण्यापूर्वीच त्यांचा चेहरा काळवंडला होता; परंतु मनातील अस्वस्थता दाबून त्यांनी नमस्कार केला. चेहऱ्यावर उसने अवसान

आणून ते म्हणाले,

'मंडळी, का येणं केलंत?'

'त्याचं कारण तुम्हास चांगलच म्हाईत हाय.' हनम्या रागानेच म्हणाला.

'असं, कोड्यात बोलला तर कसं कळणार?'

'सगळ ठावं हाय तुमास....साळसूदपणाचा आव आणू नकाशी'

'म्या, किती कर्ज घेतलं नि नोटीस कितीची यली?'

'अरे, मीय्या कर्जच घेऊस न्हाय ....., तरी नोटीस....?'

लोकांनी एक ना अनेक प्रश्नांचा भडिमार केला. पुढारी पुरते गोंधळले. त्यांना सगळ्या भानगडी माहीत होत्या किंबहुना त्या करण्यामागे त्यांचाही हात असावा. तेवढ्याच कावेबाजपणाने लोकांना शांत करण्याचा प्रयत्न करीत ते म्हणाले,

'अरे, तुमची अडचण ध्यानात घेऊन मी कर्जे मिळवून दिली. त्यामुळे तुमची घरे बांधून पूर्ण झाली आणि आता मलाच उलट विचारताय? हा कृतघ्नपणा आहे.'

लोक संतापले होते. लोकांनी प्रश्नांचा भडिमार चालूच ठेवला. त्यामुळे एकच गोंधळ उडाला. पुढारी आता चिडले होते.

'मला काय विचारता....? काय विचारायचं ते बँकेत विचारा,' एवढेच बोलून ते ताडकन आत गेले, ते पुन्हा बाहेर आलेच नाहीत. आपली फसवणूक झाल्याची लोकांना आता जाणीव झाली.

'यांची पोटं भरत्यात, पर आमचा जीव जातोय' अशी वेदना व्यक्त करीत म्हातारा जानकू गावडा जमनीवर हात टेकत उठला. तशी आरडाओरड करीत लोकही उठले व राग व्यक्त करीत माघारी परतले.

संपतराव तत्कालीन लोकप्रतिनिधींचे समर्थक. त्यामुळे लोकप्रतिनिधींनीही लोकांच्या तक्रारीची विशेष दखल घेतली नाही. शेवटी लोकांनी माजी आमदारांकडे धाव घेतली. त्यांच्या नेतृत्वाखाली बँकेच्या अध्यक्षांकडे शिष्टमंडळ नेण्यात आले; परंतु विशेष उपयोग झाला नाही. कर्जफेडीला मुदतवाढ मिळाली एवढेच!

काही लोकांच्या नावावर बनावट कर्ज दाखवून त्यांची फसवणूक करण्यात आली होती. भोळ्या- भाबड्या लोकांनी या अन्यायाविरुद्ध न्यायालयात जाण्याचे साहस केले नाही. कोर्टाचे उंबरठे झिजविण्यापेक्षा जमेल तशी कर्जाची परतफेड करण्याचेच त्यांनी पसंत केले. पुढे मोल-मजुरी करून परतफेड करीपर्यंत त्यांची पाचावर धारण बसली.

# ७. भूक

गेल्या तीन वर्षांत प्रथमच मोठा पाऊस झाला. श्रावण महिन्याला प्रारंभ झाला, तरी पावसाची रिपरिप सारखी सुरूच होती. नद्या-नाले तुडुंब भरून वाहत होते. पिके तरारून आली होती. मात्र भांगलणीस हंगाम न मिळाल्याने शेतांत रानाने जोर धरला होता. भांगलण झाली नाही, तर फलधारणा चांगली होणार नाही, याची लोकांना धास्ती. त्यामुळे भर पावसातही भांगलणीच्या कामाला वेग आला होता.

रस्ता चिखलाने माखलेला. सर्वत्र निसरड झालेली. त्यातूनही अंग सावरीत शेतकरी, मजूर महिला घाईघाईने शेताकडे निघालेल्या. घरची कामे संपवून कामावर जायला वेळ झाल्याने रखमी गोरबाआडून भाकरीचे तुकडे घशात कोंबत चालली होती.

'शटवीन आमचं नशीब काय लिवलंय देवास ठाऊक! समाधानानं चार तुकडेबी पोटात घालूस मिळनांत...,'

असं काहीसं ती पुटपुटत होती. सोबत जाणाऱ्या

बायांचीही अशीच धांदल उडाली होती. रखमी कामात चलाख, तशीच बोलण्यातही पटाईत. तिच्या तोंडाचा पट्टा सारखा चालूच असायचा. आजही तिची अशीच बडबड सुरू होती. पण त्या बोलण्यात तिच्या मनातली तडफड, खंत, वेदना स्पष्ट जाणवत होती. मनातली व्यथा व्यक्त करताना सोबतच्या बायांना ती म्हणाली,

'पाच रुपड्यांसाठी दीसबर राबंराब राबतलं .....जीव मेटाकुटीस यत्ताय बाई. वर आणकी त्या मेल्या सावकाराची सारखी री ऽ ऽ चालूच ..... 'आज, कामच हूस न्हाय, पैसा पायजे नि काम नको.....' सारखं पाठीवर असताय. पाच मिनिटाची इश्रांतीबी घेऊस देण्णाय मेला......'

'कुणी हौसेखातर मजुरीस जान्नाय पोरी. पोटाची टीचभर खळगी भरूसाठी सगळं गुमान सहन करूच लागताय' रमाकाकूनं तिची समजूत काढली.

'तेबी खरंच हाय, काकू. परवा दोन दीस काम मिळोस न्हाय, तर घरची चूल पेटोस न्हाय. शिळं-पाकं खाऊन अर्ध्या पोटावर झोपतली येळ यली. पोरांची उपाशी तोंडं बगूस व्हईनात. म्हणूनच ही मेली मजुरी करतली येळ यलेय.'

'सावकारास हे सगळं म्हाईत हाय, म्हणूनच मजुरी वाढवून देऊस तयार न्हाय.'

'काय करणार , आडला नाराईन...........'

'जुन्या गावात, आसे दीस न्हवते. परत्येकाच्या घरात भात, नाचण्याच्या राशी! धया-दुधाचा तर तोटाच न्हवता. आज आमच्या सुखी संसारास कुणाची नजर लागली कुणास ठाऊक....?''

बोलण्याच्या तालात त्या लगबगीने रस्ता कापत होत्या. त्यांच्या बोलण्यात संसाराचे सगळे विषय होते. त्यात भुकेचा विषय प्रामुख्याने होता. धरणात जमीन-जुमला गमावून भिकेकंगाल झाल्याची खंत होती. पोटासाठी रानोमाळ भटकण्याची वेळ आल्याचे दु:ख होते.

बिजगर्णीच्या सावकाराच्या शेतावर त्या निघाल्या होत्या. कुणी प्लास्टिकच्या खोळीत, तर कुणी गोरबाच्या निवाऱ्यात अंग झाकलं होतं. पायाखालच्या निसरडीतून सांभाळून चालण्याची त्यांची कसरत सुरू होती. भांगलणीची खुरपी कुणी हातात घेतली होती, तर कुणी कमरेत लटकवलेली होती. सावकाराच्या शेतातील भांगलण आज त्यांना आटोपती घ्यायची होती नि उद्या...., नव्या कामाच्या शोधार्थ बाहेर पडायचे होते.

***

'पोटासाठी दाही दिशा' फिरण्याशिवाय लोकाना गत्यंतर नव्हते. पुरुष मंडळीसुद्धा काम-धंद्याच्या शोधार्थ गावाबाहेर पडली. तरुण पोरांनी बेळगाव, कोल्हापूर गाठले. धरणग्रस्तांना गाव-घर मिळाले; परंतु जवळ उदरनिर्वाहाचे साधन नव्हते. सुपीक पानथळ जमीन पाण्याखाली गेली. काही मोजक्याच लोकांची माळ, खडकाळ जमीन शिल्लक राहिली; परंतु 'असल्या जमिनीत काय पिकविणार... दगाड?' असा प्रश्न ते उपस्थित करीत आणि ते खरेही होते.

पावसाळ्याचे दिवस म्हणजे लोकांचा कसरतीचा काळ! पदरात असलेल्या माळ जमिनीत लोक रताळी, नाचणा, सावा यांसारखी पिके आळीपाळीने घेत. बहुसंख्य लोकांच्या नशिबी तेही नव्हते. सुगीत घरात आलेले धान्य कसेबसे पावसाळ्यापर्यंत पुरत असे. जून महिना सुरू झाला म्हणजे धान्याची खरी उणीव भासायची. मजुरीच्या मोबदल्यात सावकाराच्या घरांतून साव्याची अडीच शेरी आणून त्याच्या सुक्या तुकड्यावर पोटाची आग शमवावी लागे. गणेश चतुर्थीनंतर बऱ्याच लोकांना हेही मिळत नसे. रताळ्याच्या मुळ्या उकडून त्यावर उदरनिर्वाह चालवावा लागे.

त्यामुळे या काळात आजारी पडणाऱ्या लोकांचे प्रमाणही अधिक. डॉक्टरी उपचारासाठी जवळ पैसा नसल्याने बहुतेकांना झाडपाल्याच्या औषधावरच निभावून न्यावे लागे. घाडपान, मांत्रिक उपचार, गंडादोरा असले प्रकारही बरेच असत. त्यातून बरे वाटले तर ईश्वराची धन्यता मानावयाची, नाहीतर देवाचा कोप झाल्याचे मानून मनाचे सांत्वन करावयाचे.

राजाला दिवाळी माहीतच नसते; परंतु गरिबाच्या जीवनात अशा सणांना मोठे महत्त्व असते. कर्जाचे ओझे डोकीवर झाले तरी ते सणाची गोडी वाढवितात. नव्या गावात आल्यानंतर मात्र बेळवटकराना सणासुदीचा आनंदसुद्धा धड उपभोगता आला नाही.

गावच्या पुनर्वसनाचे ते पहिलेच वर्ष. नागपंचमी, गणेश चतुर्थी आणि त्यानंतरचा दसऱ्याचा सण कसाबसा पार पडला; परंतु पुढची दिवाळी बहुतेकांच्या जीवनात अंधारच घेऊन आली.

'दिवाळीचा सण मोठा, नाही आनंदाला तोटा' ही म्हण गावकऱ्यांच्या बाबतीत निरर्थक ठरली. जगण्यासाठी आवश्यक असलेलं पोटाचं इंधन घरात नव्हतं, मग दिवाळीच्या पणती पेटणार कशा? गावात अद्याप वीज आली नव्हती.

दिवाळीच्या काळ्याकुट्ट अमावस्येला भेदून गाव उजळून टाकणाऱ्या पणती कुठेच लागल्या नव्हत्या.

इतरांप्रमाणे आमच्या घरातही आज अंधारच होता. दिवाळीच्या सणाचा उत्साह नव्हता. चुलीत पेटणाऱ्या लाकडांच्या प्रकाशात आई चुलीसमोरच बसून होती. चुलीवरच्या गाडग्यात रताळी रटरटत होती. दिवाळीचे गोडधोड पदार्थ तर सोडाच, साधी भात-भाकरीही तयार करण्याची परिस्थिती राहिली नव्हती. आईने माळ्यावरच्या डेऱ्यात चाचपून पाहिले; परंतु तांदळाचे चार दाणेही शिल्लक नव्हते. घरातील साव्याचं पीठ रात्रीच संपलं होतं. ती हताश होऊन पुन्हा चुलीशेजारी आली नि अण्णांना हाक मारून म्हणाली,

'अजीऽ, सणावाराचं असं काय बसल्याशी...? नाना दुकानदाराकडनं अर्धा किलो रवा, अर्धा किलो साकार नि पावशेर तिळेल तरी हाणा ऽ ......?'

'च्यायला, दुकानदार काय फुकट देताय व्हय? खिशात न्हाय दमडी नि घाल म्हंतेय फुगडी...'

'मग कायतरी करूस नको? घरात एक पॉर हाय, ते काय दुसऱ्याचं ताँड बघीत बसोदे ऽ...'

हाच विचार करीत अण्णा कठड्यावर बसले होते. मी समोरच गोट्या खेळत होतो. आईचं बोलणं ऐकूण मी खेळ बंद केला नि अण्णांच्या गळ्याला मिठी मारत म्हणालो,

'अण्णा, आज दिवाळी हाय....? सोनू म्हणत व्हता, त्याच्या आईनं लाडू, न्हीवऱ्या खूप केल्यात. आमीबी करतल्या?'

'संसाराचं निघालंय दिवाळं नि दिवाळी कशी साजरी करणार!' असा त्यांच्या मनात विचार चालू असावा. माझ्या प्रश्नाला उत्तर द्यायचे टाळत त्यांनी नुसतीच मान डोलाविली.

'सोनूच्या बाबांनी आरतीत घालूस यऽवढे पैसे देल्यात म्हणी. तुमीबी देणार?'

हातवारे करीत मी विचारलेल्या या प्रश्नाने अण्णा बुचकळ्यात पडले. काय उत्तर द्यावे त्यांना कळेना. त्यांचे मन अचानक भूतकाळात डोकावले. जुन्या गावातील दिवाळीच्या सणाचे ते आनंदाचे नि उत्साहाचे चित्र त्याच्या नजरेसमोर उभा राहिले.

जुन्या घरातही काकांनी वेगवेगळ्या चुली मांडल्या होत्या; परंतु दिवाळी दिवशी सर्वजण एकत्र यायचे. थोरल्या काकूंची थोरली लेक (माझी चुलत

बहीण) सर्वांना आरती करायची. तिचे आरतीचे ताट पैशांनी भरून जायचे. त्यानंतर काकूने केलेल्या गोडधोड पदार्थांचा मिटक्या मारत स्वाद घ्यायचा. चेष्टामस्करीत वेळ केव्हा निघून जाई, पत्ताच लागायचा नाही. घर भरल्यासारखं दिसायचं आणि आज? जीवनाचं वाळवंट झालं.... रखरखत्या जीवनात कुठेच ओॲसिस दिसला नाही. त्यामुळे त्यांचा चेहरा काळवंडला. माझ्या हाकेने ते भानावर आले. आपल्या दारिद्र्याचीच त्यांना आता लाज वाटू लागली.

'देवानं पॉट देल्यानाय, तसं हात बी....! असं बाय सांगतेय. असं बसोन चालणार न्हाय. काय तरी करूस पायजे.'

असा विचार करून ते उठले नि थेट नानाच्या दुकानात गेले. नानाचं पोरगं दुकानात व्यापार करीत होतं.

'बाबू , अर्धा किलो रवा, पावशेर तिळेल नि अर्धा किलो साकार दे.' अण्णांनी बाजार सांगितला.

'अण्णा, आधीच सांगतो, उदारी मिळणार न्हाय.' बाब्यानं स्पष्ट केलं.

'अरे, असं काय करतोस; भांगलणीस येऊन उदारी फेडीन तुझी.'

'ते कायबी सांगो नकोस, आज सणासुदीस कुणासच उदारी देणार न्हाय. मागची पंधरा रुपयं उदारी अजून पडलेय तुज्याकडे.'

नाना दुकानदाराचा बाब्या मोठा बिलंदर. वयानं तसा चिमुरडाच; परंतु सर्वांशी रोखठोक बोलायचा. कुणाची भीड ठेवायचा नाही. कुणाला उधारी द्यायची नसली, म्हणजे नाना त्याला दुकानात बसवायचा. आज दिवाळीच्या सणाला लोक उधारी माल मागाय येणार हे नानाला पक्क माहीत होतं. म्हणूनच त्याने बाब्याला दुकानात बसविलं. अण्णांनी गयावाया केली; परंतु पठ्ठ्या उधारी द्यायला कबूल झाला नाही. अण्णा थोबाडात मारल्यागत गुमान घरी परतले.

'च्यायला, मारवाड्याची जात बरी, पर नाना दुकानदार नको.... उदारी दील व्हय.....?' अण्णा आई शेजारी बसत म्हणाले. ती काहीच बोलली नाही.

'जरा थांबा, थोडं जाऊन येती....' म्हणून ती घराबाहेर पडली नि सरळ सावकाराच्या घरात गेली.

मरगाळ्याची जीवनी, गुरवाची भरमी, नलावड्याची लक्षी नि म्हाराची काशी आपापल्या टोपल्या घेऊन आधीच हजर होत्या. त्यात आता आईची भर पडली. साऱ्यांचेच चेहरे उदास होते. ऐन दिवाळी दिवशी दुसऱ्यासमोर हात पसरायची वेळ आल्याची त्यांच्या मनात खंत होती; भुकेला लाज नसते म्हणतात, हेच

खरे!

काही वेळानं सावकारीनबाई बाहेर आल्या. गड्यानं आनलेल्या बुट्टीतील नाचण्याची दोन-दोन मापटी त्यांनी प्रत्येकीच्या टोपलीत टाकली नि साऱ्यांना उद्यापासून कामावर येण्याची ताकीद केली. आईजवळ येताच त्या थबकल्या.

'शांता, का यलीस....?' त्यानी आदबीनंच विचारणा केली. आई आजवर कुणाच्या दारात हात पसरत गेली नव्हती. किंबहुना इतरांनाच तिनं दानधर्म केला होता. धरणांत शेतीभाती गेली नि तिला आता दुसऱ्यासमोर हात पसरायची वेळ आली. सावकारीन बाईंच्या प्रश्नाने ती थोडी गोंधळलीच. काय बोलावं तिला सुचेना; परंतु ताकाला जाऊन मोगा लपविण्यात अर्थ नव्हता.

'आईसाब, थोडं दाणं पायजे व्हतं. भांगलणीस येऊन फेडीनजीऽ' मान खाली घालूनच आई उत्तरली.

आईच्या टोपलीत अडीच शेर नाचणे ओतून सावकारीणबाई आत निघून गेल्या. खजिल मनानेच आई घरी परतली.

दिवाळी आली नि धरणग्रस्तांच्या जीवनात प्रकाश न आणताच निघून गेली...

# ८. कुमरी

मे महिना नुकताच सुरू झाला होता. सूर्यनारायण धरणीवर आग ओकीत होता. उन्हाच्या झळा सर्वांग भाजून काढीत होत्या. अंगातून घामाच्या धारांचा ओघ सुरू होता. त्यात भर मध्यान्हीची वेळ; परंतु त्याची पर्वा न करता अण्णा (बाबा) नि आई तोडलेल्या झीळींची काटक एकत्र करून त्यांना आग लावीत होते. 'साऱ्या संसाराचं वाळवंट झालं, त्यात एक दिवस कुठेतरी ओयासिस निर्माण होईल' या एकाच आशेने जीवाची कदर न करता जंगलातल्या ओसाड जमीनित ते घाम गाळीत होते. नदीकाठची सुपीक जमीन गेली नि कुमरीचा खडकाळ तुकडा पदरात पडला. 'बुडत्याला काडीचा आधार' समजून ते कामाला लागले.

पलीकडच्या पट्टीत काशाची पोरं, त्याच्यापुढे राणू गावड्याचे कुटुंब,... गावातील जवळजवळ सगळेच लोक उन्हाची पर्वा न करता आपापल्या वाटणीत काम करीत होते. तोडलेल्या झीळ्यांना लावलेल्या आगीमुळे

धुराचे लोट आकाशाला गवसणी घालीत होते. रखरखतं ऊन, त्यात आगीच्या झळांमुळे जिवाची ल्हाईल्हाई होत होती. पण त्याची कुणालाच पर्वा नव्हती. असून चालणार तरी कशी? जमीन-जुमला धरणात गेला नि उपाशी पोटी जगण्याची वेळ आली. मग जे पदरी पडलं; त्यात हातपाय हालवून पोटाची आग भागविण्यापलीकडे त्यांना दुसरा पर्याय नव्हता.

काशाने डोकींवरचं टॉवेल सोडलं नि तोंडावरचा घाम पुशीत तो मेरेवरच्या झाडाच्या सावलीत जाऊन विसावला.

'बाळाराम ये, वाईच इसावा घे पोरा. अशा रखरखत्या उनात किती राबशील?' तत्तरणीतील पाणी घटाघटा घशात ढोसत, त्याने अण्णाला हाक मारली. अण्णा 'हुश ऽऽ' करीत काशाशेजारी येऊन बसला. कपाळावरून निथळणाऱ्या घामाच्या धारा खांद्यावरच्या टॉवेलने पुसीत तो म्हणाला,

'काशादा, हे काय खरं न्हाय बग. सोन्यासारखी जमीन गेली नि डोंगरातल्या या खडकात येऊन पडतली येळ यली. '

'काय करणार ऽ? पदरात पडलं नि पवित्र घडलं' काशा म्हणाला.

'आमचे लोकबी खरे न्हात काशादा. फुडाऱ्यांनी सांगितलं नि हे त्यांच्या मागणं मेंढरागत गेले.'

'म्हणून तर ही येळ यली! धरण बांधतानाच नाक दाबलं असतं, म्हंजे सरकारच त्वांड उघाडल आसतं.'

'डोंगरातल्या या खडकात काय पिकीवतल गाऽ?'

'अरे, हे बी खऱ्यातलं न्हाय म्हणत्यात. अजून सरकारान या जागेस मंजुरीच देऊस न्हाय! आमदारांनं सांगितल्यान् म्हणून पंचांनी कुमरीच्या वाटण्या पाडून देल्यानात. कसल्याली जमीन कण्ण सोडतली येळ ईल, सांगोस यन्नाय.'

दोघंही मनातली भीती व्यक्त करीत होते; दु:ख बोलून मनं हालकी करण्याचा प्रयत्न करीत होते. शेजारी काम करणाऱ्या आईचं कामापेक्षा त्यांच्या बोलण्याकडेच अधिक लक्ष होतं.

'सरकारानं पुना कुमरी काढून घेतल्या तर? केल्ले कष्टबी वाया जातील!,' तिने मनातली शंका व्यक्त केली.

'काय करणार? ताब्यात हाय तवर राबतलं झालं......' काशा म्हणाला.

एवढ्यात त्याच्या पोरांनी दुपारची भाकरी खायला हाक मारली, तसा तो निघून गेला.

'देवा, तूच आता आमचा तारणहार!' म्हणत अण्णा परत कामाला लागला.

***

धरणात जमीनजुमला गमविलेले लोक भूमिहीन झाले होते. शेजारच्या गावात मोलमजुरी करण्यापलीकडे त्यांना उपजीविकेचे दुसरे साधन नव्हते. त्यामुळे हातपाय हलवायला कुमरीचा आधार मिळाल्यासारखे त्यांना झाले. हाडाची काडं करून ते या डोंगराळ जमिनीत राबू लागले.

बेळवट्टीप्रमाणेच इनाम बडसची जमीन राकसकोप धरणात गेली होती. यासाठी पर्यायी जमीन देण्याची दोन्ही गावांची सरकारकडे मागणी होती. मागणी करताच त्याची पूर्तता झाली तर ते सरकार कसले! यासाठी आंदोलन उभारावे तर लोकांत जागृतीचा नि नेतृत्वाचा अभाव. त्यात कर्नाटकी पोलिसांच्या बडग्याची लोकांना मोठीच धास्ती!

सीमाप्रश्नी झालेल्या आंदोलनात पोलीस गोळीबारात पाच जण हुतात्मे झाल्याचं लोक ऐकून होते. शिवाय काही प्रकरणांत पोलिसांचा ससेमिरा लोकांनी अनुभवला होता. त्यामुळे लोक पोलीस म्हणजे नको म्हणायचे. मग पर्यायी शेतीसाठी आंदोलन करायचं धाडस कोण करणार?

तरीही गावातील काही तरुण पोरांनी धाडस करायचं ठरविलं. बेळवट्टीच्या दक्षिणेला खानापूर तालुक्याच्या हद्दीत वन खात्याने जंगल तोडप केलं होतं. या जमिनीवर अतिक्रमण करण्याचा विचार त्यांच्या मनात आला नि त्यांनी गावप्रमुखाकडे तसा आग्रह धरला. परंतु असलं धाडस सरपंचांच्या कुंडलीत बसणारं नव्हतं.

'पोरांनू, हे येरागबाळ्याचं काम न्हवी, तुरुंगात खडी फोडूस धाडतील ...!'

असं सांगून त्यांनी पोरांना पिटाळायचा प्रयत्न केला. परंतु पोरं आता ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हती.

'गावातल्या जाणत्यासनं मान देऊचा म्हणून आजवर गप्प बसतली येळ यली. ह्यांचं ऐकोनूच गाव-घर, जमीन-जुमला सोडतली पाळी यली, गाव भिकेस लागला. आतं इरोध केल्याशिवाय भागणार न्हाय. मागोन देणार नसतील तर हिसकावून घेऊस पायजे.'

एक तरुण म्हणाला. बाकीच्यांनी 'व्हय व्हय' म्हणून साथ दिली.

'सरपंच, तुमासनी यत्तल अस्याल तर यवा, आमी कुमरी ताब्यात घेणारच,' त्यांनी स्पष्ट बजावलं.

सरपंच गोंधळात पडले. काय कराव त्यांना सुचेना. पोरांची साथ सोडली तर गावात किंमत राहणार नाही, हे त्यांना माहीत होतं. चंचीतला चिमूटभर तंबाखू त्यांनी हातावर घेतला नि त्याला चुना लावून फक्की तोंडात टाकली. थोडा वेळ विचार करून ते म्हणाले,

'पोरानूं, अशी घाई नको. सारा इचार करून पाऊल टाकूस पायजे. आदी आमदार सायबांबरोबर या बाबतीत चर्चा करतो. त्यानंतर काय करतलं ते ठरऊ.'

इतके दिवस आपण थांबलो, आनखी काही दिवस प्रतीक्षा करायला काय हरकत आहे; असा विचार तरुणांनी केला. सरपंचांना चार दिवसांची मुदत देऊन ते निघून गेले.

या वेळी परशुरामभाऊ नंदिहळ्ळी उचगाव मतदारसंघाचे आमदार होते. धरणग्रस्त बेळवट्टी गावच्या समस्यांची त्यांना चांगली जाण होती. म्हैसूर विधानसभेत या समस्या त्यांनी अनेक वेळा मांडल्या होत्या. बेळवट्टी, बडसच्या धरणग्रस्तांना पर्यायी जमीन देण्याची त्यांनी सरकारकडे मागणी केली होती. परंतु मराठी बहुभाषिक सीमा भागाविषयी सरकारच्या मनात आधीच आकस. त्यात बेळवट्टी शंभर टक्के मराठी भाषिक व महाराष्ट्राच्या सीमेवरचा गाव! मुख्यमंत्र्यांनी गावाला दिलेले आश्वासन सरकार पार विसरले.

सरपंच रामराव पाटील गावकऱ्यांचं गाऱ्हाणं घेऊन आमदारांकडे गेले. त्यांनी गावचं गाऱ्हाणं त्यांच्यासमोर मांडलं. सरपंचांना दिलासा देऊन आमदार म्हणाले,

'पाटील, गावच्या पोरांची मागणी रास्त आहे. ते आपला हक्क मागताहेत. तो त्यांना मिळालाच पाहिजे. मागूनही देत नसतील तर तो हिसकावूनच घेतला पाहिजे.'

'सायेब हे समदं खरं; पर हे कसं शक्य हाय?' सरपंच म्हणाले.

'त्यात कठीण काय? सरकारने आमची जमीन धरणात गमविली; आता मोबदला म्हणून आम्ही त्यांची जमीन मागतोय. अतिक्रमणाचा पहिला टप्पा म्हणून गावातील साऱ्या बैलजोड्यांच्या साह्याने कुमरीच्या जमिनीची एक दिवस नांगरट करा,' आमदारांनी सल्ला दिला.

'पर ........... सायेब ....... फारेस्ट खात्याचे लोक आडवूस यले तर?' सरपंचांनी मनातील भीती व्यक्त केली.

'त्यात घाबरण्यासारखं काय आहे पाटील? फार तर अटक होईल. न्याय मिळविण्यासाठी तीही तयारी ठेवलीच पाहिजे. तुम्हाला भीती वाटत असेल तर

मी स्वत: नांगरट करायला येईन.' आमदारांनी धीर दिला.

त्यांचं बोलणं निर्भीड आणि कृती धाडशी. जनतेच्या समस्या सोडविताना कोणा अधिकाऱ्याची ते भीड बाळगत नसत. त्यांच्या बोलण्यानं सरपंच शरमले. पण त्यांना काहीसा धीर आला. ते म्हणाले,

'तसं न्हाय सायेब; तुमच्या कानावर गोष्ट घातली बरी म्हणून ......'

'ठिक आहे, मग लागा कामाला, मी तुमच्याबरोबर आहे.' आमदारांनी दिलासा देताच सरपंच उमेदीने परतले. गावची बैठक बोलावून त्यांनी आमदारांचा निरोप दिला. तरुणांच्या अंगात नवा उत्साह संचारला. मोरब हद्दीतील कुमरीवर अतिक्रमण करून जमीन ताब्यात घेण्याचा एकमुखी निर्णय झाला. अतिक्रमणाची तारीखही निश्चित झाली.

इनाम बडस गावाला ही बातमी समजली. त्याबरोबर त्यांनाही जाग आली. त्यांचीही जमीन धरणात गेली होती. यासाठी अर्ध्या कुमरीवर त्यांनी आपला दावा केला. सरपंचांची भेट घेऊन त्यांनी आपली मागणी मांडली. बेळवट्टीची तरुण पोरं बडसकरांची मागणी मानायला तयार नव्हती. बेळवट्टीप्रमाणे बडस गावाचाही त्याग होता. त्यांनाही पर्यायी जागा मिळण्यास दुमत होण्याचं कारण नव्हतं. पण बेळवटकरांनी सांगितलेल्या जमिनीवर त्यांनी दावा करू नये एवढीच त्यांची मागणी होती. तरुणांचा म्होरक्या लक्षा उठला नि त्यांने सरपंचांना स्पष्ट बजावलं,

'सरपंच, आमी मागणी केल्ली जमीन बडस गावास देतली न्हाय. सरकारकडे त्यांनी दुसऱ्या जागेची मागणी करूस आमचा इरोध न्हाय.'

'व्हय, व्हय. हे बरोबर हाय' म्हणत बाकीच्या गावकऱ्यांनी त्याला साथ दिली. सरपंच पुन्हा पेचात सापडले. दोन्ही गावची ग्रामपंचायत एकच. त्यामुळे त्यांना दोन्ही गावच्या हिताचा विचार करणे क्रमप्राप्त होते. गावकऱ्यांचे विचार ऐकून ते म्हणाले,

'तुमच्या मागणीस माजा इरोध न्हाय. तरीबी साऱ्यांनी थोडा इचार करूस पायजे. कुमरीची जमीन सरकारनं मंजूर केल्ली न्हाई. आमदारांच्या सांगण्यावरनं अतिक्रमण करतलं ठरलंय. त्यात नवी अडचण येणार न्हाय ह्याची काळजी घेऊस पायजे.'

दोन्ही गावांतील मतभेद वाढले. आरोप-प्रत्यारोप होऊ लागले. एकदा तर प्रकरण हातघाईवर गेलं. आमदारांच्या कानावर ही गोष्ट गेली. दोन्ही गावच्या

प्रमुखांना त्यांनी बोलावून घेतलं. त्यांचं म्हणणं ऐकून घेऊन ते म्हणाले,

‘दोन्ही गावांचा त्याग मोठा आहे. तुमच्या त्यागाचं मोल मिळालच पाहिजे. परंतु मागणी पदरात पाडून घ्यायची ही पद्धत नाही. यातून कुणाचंच हित होणार नाही. मला नको, तुला नको ..... घाल कुत्र्याला; अशी गत होईल. यासाठी दोन्ही गावांनी समझोत्याने मार्ग काढला पाहिजे. जे आहे ते सध्या पदरात पाडून घेतलं पाहिजे. साऱ्यांनी संघटितपणे लढा दिल्यास सरकारवरही दबाव येईल.

‘साहेब, ह्यातनं आतं तुमीच मार्ग दाखवा. आम्ही तुमच्या शब्दाभाईर न्हाय. पोरांची समजूत काडूस तुमीच गावास भेट देल्यासी तर बर व्हईल.’ सरपंच म्हणाले. बाकीच्यांनी माना डोलावून सहमती दर्शविली.

***

प्राथमिक शाळेत दोन्ही गावचे लोक जमा झाले. आमदारांची उपस्थिती हा आकर्षणाचा केंद्रबिंदू! दोन्ही गावच्या भांडणात ते काय तोडगा काढणार याविषयी साऱ्यांनाच कुतूहल. बेळवट्टीचे तरुण चिडले होते. आपल्या मागणीत इनाम बडसच्या लोकांची लुडबूड त्यांना पसंत नव्हती. तणावपूर्ण शांततेतही त्यांची कुजबूज सुरूच होती. आमदारांनी परिस्थिती जाणली नि साऱ्यांना शांत होण्याचा सल्ला दिला. जनतेच्या कलेने जाऊन त्यांची मनं जिंकण्याचे त्यांच्यामध्ये कौशल्य होते. लोकांच्या समस्या, सुख-दु:खं त्यांनी जवळून पाहिली होती. ती सोडविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्नही केले होते. राजकारणापेक्षा समाजकारणात त्यांना अधिक रस; त्यामुळे जनतेचा त्यांच्यावर विश्वास होता. कुमरीच्या समस्येवर ते काय मार्ग काढणार याचे साऱ्यांनाच औत्सुक्य होते. ते बोलू लागताच कुजबूज बंद झाली नि बैठकीत शांतता पसरली. ते म्हणाले,

‘बेळवट्टी, बडसच्या त्यागी बंधूनो -

स्वत: उपाशी राहून दुसऱ्याची भूक भागवितो, स्वत: तहानेने व्याकूळ असताना दुसऱ्याची तहान भागवितो... तोच खरा त्यागी. बेळवट्टी-बडसच्या जनतेने या दोन्ही गोष्टी केल्या आहेत. स्वत:च्या घरादाराचा नि उपजीविकेचे एकमेव साधन असलेल्या शेतीचा तुम्ही त्याग केला नसता, तर बेळगावच्या जनतेला पाण्याविना तडफडावे लागले असते, त्यांचे उद्योग-धंदे बंद पडले असते. तुमच्या त्यागाचं मोल मोठं आहे. ते कुणाला विसरता येणार नाही. परंतु जनतेचं पालकत्व स्वीकारलेल्या मायबाप सरकारला याची जाणीव नाही, ही खेदाची बाब. बेळवट्टीला भेट देऊन गावच्या सर्वांगीण विकासाची ग्वाही देणाऱ्या

मुख्यमंत्र्यांना त्याचा विसर पडावा ही त्याहून मोठी दुःखाची गोष्ट आहे.

कानडी गावच्या बाबतीत हे घडले असते तर सरकार त्यांच्या मदतीला केव्हाच धावून गेले असते. सरकारच्या या अन्यायी प्रवृत्तीमुळेच माय महाराष्ट्रात जाण्यासाठी आम्ही धडपडतो आहोत. परंतु जोवर आम्ही कर्नाटकात आहोत तोवर आमचे पालकत्व त्यांच्याकडेच आहे, याची सरकारने जाणीव ठेवली पाहिजे. यावर आता एकच उपाय .... आणि तो म्हणजे संघटित लढा. सरकारच्या अन्यायाविरुद्ध लढा द्यावयाचा झाल्यास आपापसात लढून चालणार नाही.'

भाषणाचा लोकांवर प्रभाव पडला. त्यांचे भाषण ते मन लावून ऐकू लागले.

'व्हय, व्हय; सायबांचं बरोबर हाय' म्हणून माना डोलावू लागले. आमदार पुढे म्हणाले,

'बेळवट्टी आणि बडस गावं वेगळी नाहीत. मिळतंय ते पदरी पाडून घ्या. आनखी हवे असल्यास नंतर भांडा. नाहीतर लोण्याच्या गोळ्यासाठी भांडणाऱ्या मांजरांसारखी आपली गत होईल...'

आमदारांच्या बोलण्याचा योग्य असाच परिणाम झाला. रागानं चेकाळणारी पोरं शांत झाली. आपापसातील भांडणामुळे सरकारचाच फायदा होईल नि आपणास हात हालवत बसावे लागेल ही गोष्ट त्यांना पटली. दोन्ही गावांतील मतभेदाची दरी बुजली. पंच एकत्र आले नि त्यांनी कुमरीची वाटणी करून घेतली. दुधावरची तहान ताकावर निभावली असे मानून जंगलातल्या खडकाळ जागेत लोक घाम गाळू लागले. तरीही फॉरेस्ट खात्याच्या अधिकाऱ्यांचा ससेमिरा अधूनमधून चालूच राहिला. पण जनतेच्या ऐक्यापुढे त्यांची डाळ शिजली नाही.

# ९. पाणी...पाणी...

'नळावरचे भांडण' हा शहरातील नित्याचाच विषय तसा 'विहिरीवरचे भांडण' हा बेळवट्टी गावच्या बाबतीत रोजचाच दिनक्रम बनला. घागरभर पाण्यासाठी बऱ्याच वेळा भांडण विकोपाला जाई नि 'पाणी नको पण भांडण आवर' म्हणण्याची पाळी येई. हातचे देऊन पळत्याच्या मागे लागण्याची वेळ गावावर आली होती.

एकदा असेच झाले. नलावड्याची काशी आणि चौगुल्याची आण्णी यांनी विहिरीवर भांडणाचा कहरच केला. एकाच घडगड्याच्या बाजूने तीन-चार बाया एकाच वेळी विहीरीत घागरी सोडीत. एकदा असे झाले, काशीने विहिरीत सोडलेल्या घागरीवर आण्णीची घागर जाऊन आदळली नि भांडणाला सुरवात झाली. काशीने हातातली दोरी सोडली नि आण्णीच्या झिंज्याच पकडल्या. मग आण्णीला काय सांगायला पाहिजे. दोघींची झोंबाझोंबी झाली. त्या एकमेकींचा चारचौघांत उद्धार करू लागल्या.

‘म्हणून तर .... घोडी होऊन आजून घरात पडलीस’ काशीने शिवी हासडली.

‘अगं... जा , पडली तर माझ्या घरात. तुझ्या घरात जेवाय मागत न्हाय. लगीन होऊनबी तुझ काय नाचाप हाय, ते समद्या गावास म्हाईत हाय’ आण्णीने तिचे रहस्य उघडे केले.

पाण्याचा मूळ विषय बाजूलाच राहिला. दोघीही एकमेकींचे उणेदुणे काढू लागल्या. त्यामुळे ऐकणाऱ्यांचेही चांगलेच मनोरंजन झाले. एवढ्यात दोघींच्याही घरची मंडळी तिथे येऊन दाखल झाली. तोंडाला तोंड लागले नि प्रकरण हातघाईवर आले. भांडण सोडवून घेताना लोकांची पुरेवाट झाली. घागरीवर घागर आदळली हे भांडणाचे निमित्त मात्र होते. खरे कारण होते पाणी! साधी तहान भागविण्यासाठी पाणी मिळत नसल्याने भांडणाच्या स्वरूपात व्यक्त झालेला लोकांच्या मनातील तो संताप होता.

पोटासाठी खेडोपाडी फिरण्याबरोबरच पाण्यासाठी वणवण भटकण्याची लोकांवर वेळ आली. एप्रिल-मे महिन्यात तर त्यांचे हाल पाहावत नसत. खायला अन्न नाही आणि प्यायला पाणी नाही, अशी धरणग्रस्तांची केविलवाणी अवस्था!

बेळगाव शहराची पिण्याच्या पाण्याची सोय झाली; पण त्याची किंमत बेळवट्टी गावाला मोजावी लागली, घरादाराचा त्याग करावा लागला. त्यांची आर्त हाक ना बेळगावकरांना ऐकू गेली, ना सरकारला!

लोक पाण्यासाठी तडफडू लागले. माणसांना पाणी नाही तर जनावरांना कुठून द्यायचे. लोकांनी आपली जनावरे मिळेल त्या किमतीला विकली. दुभती जनावरे विकल्याने लोकांचे आर्थिक उत्पन्न बुडाले. रोजची आंघोळ आठवड्यावर गेली. कुणी ‘स्नान झाले का?’ म्हणून विचारले तर ‘ आंघोळीची गोळी खाल्ली!’ म्हणून लोक विनोदाने सांगू लागले. पावण्यापैकांना ‘गावात पाणी नाही, येऊ नका’ म्हणून लोकांनी निरोप धाडले. तरुण पोरांची लग्न जमविणं मुष्कील बनलं.

‘बेळवट्टीचं स्थळ...! न्हायरे बाबा त्या गावात पोरगी देणार. गावात ना पाणी, ना पोटास अन्न! म्हाईत असून पोरीस संकटात कशापायी लोटा?’

शेजारच्या गावातील लोकांचं हे बोलणं!

***

गावच्या मध्यभागी लक्ष्मीदेवीच्या मंदिरासमोर एक मोठी सार्वजनिक विहीर होती. (आज ही विहीर बुजविण्यात आली आहे.) पिण्याच्या पाण्याचे हेच

एकमेव साधन! विहिरीच्या चारी बाजूला चार घडघडे होते. विहिरीवर बायांची पाण्यासाठी झुंबड उडे. पहिली दोन वर्षे पाण्याची टंचाई भासली नाही; परंतु पुढे गावची लोकसंख्या वाढत गेली, पावसाचे प्रमाणही कमी झाले आणि लोकांना पाणी टंचाईला सामोरे जाण्याची वेळ आली. सार्वजनिक विहीर उन्हाळ्यात कोरडी पडू लागली. तसे गावात पाण्याचे दुर्भिक्ष्य वाढले.

गावात दोन खासगी विहिरी होत्या. स्वाभाविकपणे तेथे लोकांची गर्दी वाढू लागली. मग या विहिरीच्या मालकांची मिजास काय विचारता! पाण्यासाठी लोकांना वेठीस धरण्याचे प्रकार सुरू झाले. एकदा चौगुल्याची रमी चांदू सावकाराच्या शेतात कामाला गेली नाही; म्हणून दुसऱ्या दिवशी सावकाराने तिला आपल्या विहिरीवर येण्यास मज्जाव केला.

'शेतात कामास यणार नसशील, तर आमच्या हिरीवर पाण्यास येऊ नको.'

सावकाराने बजावताच ती रिकाम्या घागरी हालवीत माघारी गेली.

दुसऱ्या विहिरीच्या मालकाची तऱ्हाही काही वेगळी नव्हती. तो गावचा 'नाना' पण सगळ्याच बाबतीत ना ऽ... ना ऽ... बोलायचा. पाण्यासाठी येणाऱ्या बायांना तर वाट्टेल तशा शिव्या हासडायचा. त्यामुळे 'भीक नको पण कुत्रा आवर' म्हणायची वेळ आली होती. पुढे-पुढे तर त्याने विहिरीच्या घडघड्यांना कुलूप लावण्यास सुरवात केली नि लोकांना पाण्यासाठी दाही दिशा फिरण्याची वेळ आली.

'बघत्यास लाज की करत्यास...?' अशी गावठी म्हण आहे. केल्याशिवाय गत्यंतर नसेल तर लाज बाळगून चालायचे कसे? बेळवट्टी ग्रामस्थांच्या बाबतीत अगदी तसेच झाले. गावातील पाण्याचे सगळे मार्ग बंद झाल्यावर लोकांनी गावाबाहेरील शेतवाडीत असलेल्या विहिरीकडे मोर्चा वळविला. रात्रीपासूनच तेथे नंबर लावून थांबावे लागे. कामधंदा सोडून लोकांना पाण्यासाठी अधिक वेळ द्यावा लागू लागला. त्यामुळे त्यांची झोपही उडाली. काही दिवसांनंतर या विहिरीच्या मालकाचाही भाव वधारला. शेतीला पाणी पुरत नसल्याचा कांगावा करून त्यानेही लोकांच्या तोंडचे पाणीच पळविले.

'तहानलेल्यास पाणी नि भुकेलेल्यास घास कधी न्हाई म्हणू न्हवे' असे माझी आजी सांगायची. पण येथे सगळच इपरीत! भाकरीचा तुकडा तर सोडाच, घोटभर पाण्यासाठीही लोकांना गयावया करावी लागे. सगळेच लोकांच्या अगतिकतेचा फायदा घेत होते.

'सरकारनं हाकललं नि सावकारानं लाथाडलं' अशी लोकांची गत झाली.

'आतं जातलं खुटे ........ खातलं नि पितलं काय गा?' असा लोक प्रश्न उपस्थित करू लागले. परंतु या प्रश्नाचं समर्पक उत्तर देणारा कुणी दाताच नव्हता.

जगायचं तर हवा, अन्न, पाणी या तीन मूलभूत गोष्टी माणसाला हव्याच! हवेवर कुणाला मालकी गाजवता येत नव्हती; म्हणून ती लोकांना मोफत मिळत होती. नाहीतर तीही मिळविणं अवघड झालं असतं. रानावनात मिळेल ती कंदमुळं खाऊन लोक भूक भागवीत होते. पण पाणी? ..... सारा वांदा येथेच होता.

आता कुठेच काही मार्ग सापडत नाही म्हटल्यावर लोकांनी धरणातील पाण्याकडे मोर्चा वळविला. दीड-दोन मैलाचे अंतर! पण तहान भागवायची तर हे कष्टही सोसावे लागणारच! ज्यांच्याकडे बैलगाडीची सोय ते बॅरल भरून गाडीतून आणू लागले. इतरांची दैना पहायलाच नको. डोकीवरून पाण्याच्या घागरी आणताना बाया-बापड्यांच्या पायाला उन्हाचे चटके तर बसायचेच; शिवाय शरीरातून वाहणाऱ्या घामाच्या धारामुळे शरीरातील उरले-सुरले पाणीही निघून जायचे.

पाणीप्रश्नाची सीमाप्रश्नासारखीच गत झाली होती. त्यावर काही तोडगा निघेल यावर लोकांचा विश्वास राहिलेला नव्हता. राजकीय पुढारी गावाला भेट देत, गावकऱ्यांच्या त्यागाचं कौतुक करीत नि राजकीय स्वार्थ साधून निघून जात. सारीच कोरडी आश्वासने! प्रामाणिक तळमळ कुणाचीच नव्हती.

गावाने निवडणुकीत साथ दिली नाही म्हणून निवडून आलेले मराठी प्रतिनिधी दाद देत नव्हते नि मराठी गाव म्हणून कानडी सरकार साथ देत नव्हते.

'गावच्या त्यागाचं कौतुक करून लोकांची तहान भागत न्हाय सायेब' लोकांनी एकदा आमदारांना टोमणा मारला. त्यावर ते नुसते हसले आणि मान डोलावून निघून गेले. पुनर्वसनानंतर तब्बल पंधरा वर्षे लोक तहानेने व्याकूळ होते.

# १०. शाळा

गावचं पुनर्वसन झालं, त्याच वर्षी मी पहिलीच्या वर्गात दाखल झालो. परंतु शाळेची इमारतच जाग्यावर नव्हती, तर शाळा चालवायची कुठं हाच मोठा प्रश्न मास्तरांच्या समोर होता. त्यामुळे पहिले आठ दिवस याच गोंधळात गेले. आजही मला तो प्रसंग आठवतो...

चांदिलकर गुरुजी नानाच्या दुकानासमोरील बाकावर गुमान बसून होते. त्यांच्या शेजारी दोन-चार पोरं रेंगाळत होती; तर काही समोरच्याच रस्त्यावर दंगामस्ती करीत होती. बाकीची उनाडक्या करत गावभर भटकत होती. पण कोणत्याच गोष्टीकडे मास्तरांचे लक्ष नव्हते. नेहमीच चेष्टा, मस्करीत रमणाऱ्या मास्तरांच्या चेहऱ्यावर आज उदासीनता जाणवत होती. दोन महिन्यांच्या उन्हाळी सुटीनंतर नव्या शैक्षणिक वर्षाला सुरवात झाली. नव्या गावातील नव्या वर्षातला शाळेचा तो पहिलाच दिवस; परंतु शाळेची इमारतच तयार नव्हती, मग पोरं बसणार

तरी कुठे?

नव्या वसाहतीत गाव सजला. जो-तो आपापल्या नव्या संसाराची उभारणी करण्यात गुंतलेला, मग शाळेच्या इमारतीचं सोयरसुतक कोणाला? मास्तर... बिचारे ते तरी काय करणार! त्यांच्याही मनाला आज हीच एक चिंता सतावीत होती.

दुकानातील गिऱ्हाईकांची गर्दी कमी झाली, तसा नाना म्हणाला,

'काय म्हणत्याशी मास्तर, काय ठरलं...?'

'कशाबद्दल?'

'शाळा खुटे भरीवणार?'

'नाना हे तुम्ही मला विचारता? अहो, शाळा चालविण्यासाठी जागा मिळवून देणं हे तुम्हा गावकऱ्यांचं काम,' मास्तरांनी उत्तर दिलं.

'ते खरं हाय; पर सरकारनं आदीच ह्याचा इचार करूस नको?' नानाच्या या बोलण्यावर मास्तर कांहीसे अबोल झाले.

नाना तसा हजरजबाबी. कोणी अधिकारी असोत वा लोकप्रतिनिधी..... गावात आल्यावर नानाच्या दुकानाला भेट दिल्याशिवाय ते वापस जायचे नाहीत. नाना त्यांचा तसा पाहुणचारही करायचा. त्यामुळे वरपर्यंत त्यांची ओळख होती. गावच्या प्रमुख मंडळींचीही नानाच्या दुकानात ऊठ-बस असायची. त्यामुळे नानाच्या शब्दाला गावात वजन होते. त्यांच्या प्रश्नावर विचार करून मास्तर काहीसे अदबीनेच म्हणाले,

'शिक्षणाधिकाऱ्यांना मी तसं कळवलंय. त्यांच्याच उत्तराची वाट पाहतोय. परंतु तोवर गावकऱ्यांनीच पर्यायी जागेची व्यवस्था करायला हवी.'

'तेबी खरंच हाय मास्तर. ह्यात आमच्याच पोरांचं नुकसान हाय. गावच्या पंचांनी ह्याचा इचार करूस पायजे.'

मास्तर यावर काहीच बोलले नाहीत. कुणाला दोष देऊन फुकटचा रोष कशाला ओढवून घ्या, असा विचार त्यांच्या मनात आला. ग्रामपंचायतीचे सरपंच तरी काय... त्यांना थोडी अक्षर ओळख होती एवढेच! गावच्या पोरांच्या शिक्षणाशी त्यांचं काहीच देणं-घेणं नव्हतं. गावावर पूर्वापार सावकारांचा पगडा! परंपरेनुसार मानाचे पद मिळाले म्हणजे ते मिरवायला मोकळे! आपली जबाबदारी, कर्तव्य... याचा त्यांना थांगपत्ताच नव्हता. असला, तरी तो लोकांना दाखवून द्यायचा नव्हता. कामापेक्षा आपल्या पदाला धक्का पोहोचणार नाही, याचीच

त्यांना काळजी! गावात ना कार्यकर्त्याला किंमत, ना लोकशाहीची जोपासना! अशा परिस्थितीत गावच्या पंचांना दोष देण्याचे धाडस मास्तर तरी कसे करणार? त्यामुळेच नानाच्या बोलण्यावर मास्तर गप्प झाले.

शिक्षणाने समाजात परिवर्तन होते, असे थोरा–मोठ्यांचे विचार! ते खरंही आहे. परंतु हे परिवर्तनच गावच्या ठेकेदारांना नको होतं. तसं झालं तर आपणास कोण किंमत देणार? याची त्यांना अधिक धास्ती. त्यामुळे 'हाय तेच बर हाय' म्हणणारेच अधिक! मग शाळेच्या इमारतीची काळजी कोण घेणार? शाळेच्या तीन खोल्यांसाठी शासकीय अनुदान मंजूर झाले होते. परंतु बांधकाम करून घेण्याची तसदी कुणीच घेतली नाही. किंबहुना त्याच्याशी आपलं कर्तव्य नसल्याचीच साऱ्यांची भावना!

मास्तरांच्या निरुत्तरावर नानाही गुमान राहिले. तेवढ्यात समोरून सरपंच येताना पाहून ते म्हणाले,

'ते बघा, सरपंचबी यलेच. त्यासनंच इचारा.'

सरपंच आले नि मास्तरांच्या शेजारीच बाकावर बसले. त्यांचा स्वभाव काहीसा मिस्कील. कोणतीच गोष्ट ते कधी गांभीर्याने घेत नसत. सुटीनंतर प्रथमच मास्तरांना गावात पाहून तेवढ्याच मिस्कीलपणे ते म्हणाले,

'काय म्हणत्याशी मास्त ऽ र ...... बरं हाय न्हवी?'

'वाईट आहे म्हणून कसे चालेल. त्यापेक्षा बरे आहे म्हटलेलेच बरे!' मास्तर काहीसे खोचक बोलले.

'असं कोड्यात काय बोलत्याशी मास्तर, काय हाय ते स्पष्ट बोला की!'

'अहो, उन्हाळी सुटी संपली. नव्या शैक्षणिक वर्षातील आज शाळेचा पहिला दिवस.'

'व्हय, मग...?'

'अहो, असं काय विचारता? अजून इमारतच जाग्यावर नाही, तर शाळा कुठे भरवायची?'

'मास्तर, सुटीत मजा मारल्याशी नि आतं इचारत्याशी; शाळा खुटे भरतली म्हणून? सुटीत थोडा परयत्न करशीला का न्हाय......?'

नेहमीच्या थट्टा–मस्करीत सरपंच बोलून गेले; परंतु त्यांचं हे बोलणं मास्तरांना चांगलंच झोंबलं. त्यांच्या या उलट प्रश्नाने मास्तर काहीसे गोंधळले. हा माणूस आपली जबाबदारी दुसऱ्यावर घालू पाहतोय याची त्यांना जाणीव झाली. परंतु

गावच्या सरपंचांना उलट बोलणं बरं नाही असं वाटून ते म्हणाले,

'तसं मी शिक्षणाधिकारी व तालुका समितीलाही कळवलंय.'

'कळवून कामं कधी झाल्ली हैत मास्तर? सांगितल्याबरोबर केलं तर ते सायेब कसले...? सारखं त्यांच्या मागे लागोस पायजे.'

'सरपंच साहेब, आम्ही पडलो सरकारी नोकर. साहेबांकडे जास्त काही बोलता येत नाही.'

'तेबी बरोबरच हाय म्हणा! फुडे काय करतलं बोला...!'

'शाळेची इमारत तयार होईपर्यंत वर्ग बसविण्यासाठी पर्यायी जागेची व्यवस्था करा.'

'त्यात काय मोट्टं! साऱ्यांनी बक्कळ मोट्टी घरं बांदल्यानांत. उद्याच ग्राम पंचायतीच्या मिटिंगात चर्चा करून यवस्था करतो बघा!'

सरपंचांच्या आश्वासनानं मास्तरांना दिलासा मिळाला.

***

कुणा एका समाजसेवी शिक्षकानं जुन्या गावात शाळा सुरू करून ती जिल्हा शिक्षण समितीला जोडली होती. पुढे सर्वच खासगी शाळा सरकारने आपल्या ताब्यात घेतल्या नि त्यांच्या व्यवस्थापनाची जबाबदारी सरकारवर आली.

बेळवट्टी गावात एक शिक्षकी शाळा. चार वर्गांची २०-२५ मुले एकाच खोलीत बसायची. १९६१ मध्ये गावचे स्थलांतर झाले नि त्याच वर्षी शाळेत आणखी एका शिक्षकाची नियुक्ती झाली.

मास्तरांच्या विनंतीवरून शाळेसाठी सरपंचांनी पर्यायी जागेची व्यवस्था केली. पहिली आणि दुसरीचे दोन वर्ग थोरल्या नलावड्यांच्या आणि तिसरी व चौथीचे दोन वर्ग होसूरकरांच्या कठड्यावर भरू लागले.

आठवड्याभराच्या अस्थिरतेनंतरचा तो शाळेचा पहिला दिवस होता. नलावड्यांच्या घरासमोरील आंब्याच्या झाडालाच लाकडी फळा लटकविण्यात आला होता. समोर विद्यार्थी बसले होते. सरपंचांसमवेत मास्तर आले तसा त्यांचा गोंधळ शांत झाला. टाळ्या वाजवून त्यांनी उभयतांचे स्वागत केले. त्याबरोबर मास्तर म्हणाले,

'मुलांनो, नव्या गावातील शाळेचा आज पहिला दिवस. शाळेची इमारत अजून उभी रहावयाची आहे. परंतु तोवर शाळा बंद ठेवून चालत नाही. सरपंच साहेबांनी पर्यायी जागेची व्यवस्था करून गैरसोय दूर केली आहे, त्याबद्दल

आम्ही त्यांचे आभारी आहोत. त्यांच्याच सहकार्याने शाळेची इमारत लवकर तयार होईल, अशी अपेक्षा बाळगूया. आता सरस्वती पूजन करून त्यांनी शुभारंभ करावा, अशी मी त्यांना विनंती करतो.'

मास्तरांनी सरस्वती पूजनाची विनंती केली; परंतु या खुल्या शाळेत सरस्वती देवीचा फोटोच नव्हता.

'मास्तर, निसर्गदेवता हीच आमा शेतकऱ्यांची सरस्वती माता! तीच आमास सार काय शिकवते नि देते बी! फोटोची गरजच काय?'

सरपंच नकळत बोलून गेले नि ते खरेही होते. शेतकऱ्यांची पोरं शाळेत नाही; तर निसर्गाच्या सान्निध्यातच सारं काही शिकतात. तीच त्यांची गुरू माऊली. पशु-पक्षी, राना-वनातील झाडं-झुडपं, नद्या-सरोवर यांच्याकडून ते बराच बोध घेतात. एखाद्या पदवीधरालाही हे ज्ञान अवगत होणार नाही.

सरपंचांनी झाडाला लटकविलेल्या फळ्याची पूजा करून काम आटोपते घेतले. शेजारची मोठी मुले विद्यार्थ्यांमागे उभा राहून हा अनोखा कार्यक्रम कौतुकाने पाहत होती. मास्तरांनी मुलांना उद्देशून बोलण्याची सरपंचांना विनंती केली.

'मास्तर, आमास भाषण-बिषण येत न्हाय,' सरपंच म्हणाले, 'गप्पा मारा म्हटला तर दीसभर मारीन.'

साऱ्यांनीच त्यांना बोलण्याचा आग्रह धरला. त्यावर पोरांकडे वळून ते म्हणाले,

'पोरांनू, आज शाळा आमच्या गावात यली, हे लई बेस झालं. आमच्या काळात तुडयाशिवाय पर्याय न्हवता. तिथे जाऊन एक-दोन पुस्तके आमी शिकलो. साऱ्यांनाच ते शक्य न्हाई. आज काळ बदललाय. जो शिक्याल तो वाच्याल, अशी परिस्थिती हाय. स्वातंत्र्यात आज परत्येक गावात शिक्षणाची सोय होऊ लागलीय. आमच्या गावचं पुनर्वसन झालंय. आमची शेती-भाती धरणात गेली. त्यामुळं आमच्या पोरांनी शिकल्याशिवाय दुसरा मार्ग न्हाय.

शाळेची इमारत लवकर बांधतला आमी परयत्न करतो. शिका .... मो ऽ ट्टे व्हा!'

आपल्या ग्रामीण भाषेत त्यांनी पोरांना चांगला उपदेश केला. पोरांनी टाळ्या वाजवून त्याला दाद दिली.

अजून पावसाला सुरवात झाली नव्हती. त्यामुळे घरातील कोंडवाड्यापेक्षा झाडाखालच्या मोकळ्या हवेतच चिमुकल्यांना शिकविणे मास्तरांनी अधिक

पसंत केले. पहिली व दुसरीचा वर्ग तुडयाच्या चांदिलकर गुरुजींकडे तिसरी, चौथीचा वर्ग बळवंत मास्तरांकडे होता.

**‘‘ पाखरांची शाळा भरे पिंपळावरती ।**
**चिमण्यांची पोरे–बाळे गोंगाट करती ।।’’**

हे गीत पहिलीच्या मुलांना मास्तर आवडीने शिकवीत. शाळा पिंपळाच्या झाडाखाली नसली, तरी आंब्याच्या झाडाखाली सुरू होती. वर चिमण्यांचा गोंगाट नि खाली चिमण्या पोरांचा गोंधळ! यामुळे या गाण्याला एक प्रकारे वास्तव प्राप्त झाले होते. गाणे आमच्याही आवडीचे बनले. मधल्या सुटीत उड्या मारत आम्ही हे गाणे मोठ्या आवडीने गात होतो.

पावसाला सुरवात झाली नि शाळा घराच्या कठड्यावर स्थलांतरित झाली. पहिलीच्या बाजूलाच दुसरीची मुले बसायची. मास्तर दोन्ही वर्गांना आळीपाळीने शिकवीत. गुरुजी दुसरीच्या वर्गाला शिकवू लागले की पहिलीच्या वर्गाची जबाबदारी ते माझ्यावर सोपवीत. कधी मुलांकडून पाढे म्हणून घे, कधी वाचन, तर कधी शुद्धलेखन लिहून घे..... असे चालायचे.

**‘‘एक, दोन, तीन, चार । जिकडे तिकडे हिरवेगार ।।**
**पाच, सहा, सात, आठ । तळे भरले काठोकाठ ।।**
**नऊ, दहा, अकरा, बारा । मंद मंद सुटला वारा ।।**
**तेरा, चौदा, पंधरा, सोळा । कमळे डुलती तुम्ही डोला**
**सतरा, अठरा, एकोणीस, वीस । वाऱ्यावरनं आलं पीस ।।**
**पीस आहे मोराचं, मोराचं । रान पिकलं बोरांचं, बोरांचं ।।**
**ओंजळ भरली बोरांनी, बोरांनी । गंमत केली पोरांनी, पोरांनी ।।**

परिस्थितीला अनुरूप असे हे सामूहिक संख्या गीत मास्तरांनी आम्हाला शिकविले होते. मास्तर वर्गावर नसले म्हणजे आम्ही हे गीत मोठ्या आवडीने गात असू. रिमझिम पावसात भिजत, नाचत हे गीत गाण्यात मोठी मौज वाटायची. एकदा शालेय गट संमेलनात या गीताला बक्षीसही मिळाले.

खुल्या अंगणातून शाळा कठड्यावर आली नि शिकण्यातील आमचा उत्साहच ओसरला. कठडा म्हणजे एक प्रकारे कोंडवाडाच होता. कठड्याच्या समोरच गुरांच्यासाठी शेड उभारले होते. त्यामुळे वर्गात सर्वत्र अंधार पसरायचा. त्यातच जनावरांच्या मलमूत्राचा वास. त्यामुळे आम्ही नाक धरूनच वर्गात बसत असू. कठड्याच्या एका कोपऱ्यात कोंबड्यांचा घूड होता. घरमालकाची कोंबडी

कधी कोपऱ्यात, तर कधी भिंतीतल्या देवळीत अंडे घालायची. एक दिवस अंडे गायब झाले नि पोरांवर चोरीचा आळ आला. त्यांच्याच घरात शाळा असल्याने मास्तरांना काही बोलता आले नाही. अंड्याची किंमत म्हणून त्यांनी चार आणे दिले. घरच्या मंडळीत अधूनमधून काही कुरबूर झाली, की पोरं अभ्यास सोडून हीच करमणूक पाहत. बऱ्याच वेळा असेच चालायचे. त्यामुळे पोरांच्या अभ्यासाचाही खेळखंडोबा व्हायचा. नव्या वसाहतीतील पहिले शैक्षणिक वर्ष असेच गेले.

***

नव्या गावच्या आरेखनात गावच्या मध्यभागीच शाळेसाठी जागा राखून ठेवण्यात आली होती. पावसाळा संपला नि त्याच जागी शाळेच्या बांधकामाला सुरवात झाली. परंतु 'सरकारी काम नि आलो जरा थांब.' असेच झाले. तीन खोल्यांची कौलारू इमारत उभी करण्यात एक वर्ष निघून गेले. अखेर नव्या इमारतीत शाळा सुरू झाली. परंतु पुन्हा नवा पेच ....... तीन खोल्या, चार वर्ग नि दोन शिक्षक! सरकारची ही शिक्षणाविषयी एक प्रकारे अनास्थाच!

एक दिवस काय झाले, बळवंत मास्तर रजेवर गेले नि चांदिलकर मास्तर ऑफिसच्या कामासाठी बेळगावला गेले. केंद्र शाळेला कळवूनही कुणी पर्यायी शिक्षक आलेच नाहीत. मग पोरांना काय सांगायला पाहिजे! ती उनाडक्या करीत गावभर फिरू लागली. गुंडोपंतांच्या गुंड्याने तर अफलातून एक शक्कल लढविली. रामू, गोमू, गंपू, चंपूला बोलावून तो म्हणाला,

'दोपार झाली तरी गुरुजींचा पत्ता न्हाय. आतं यत्तील असं वाटत न्हाय. गावड्याच्या बागेत जाऊन बक्कळ काजू काडूवा. नाना दुकानदाराचा बाब्या किलोस दोन रुपये देताय. व्हत्तील तवडे पैसे सगळ्यांनी वाटून घेतले.'

गुंड्या नेहमीच अशी कायतरी शकल लढवायचा. कुणाच्या परसात काजू, आंबे किंवा पिकायला आलेले केळीचे घड टिकायचे नाहीत. आज तर पोरांना नामी संधी मिळाली होती. शाळेत मास्तर नव्हते नि घरातून माणसं नव्हती. त्यात गावड्याची बाग गावाशेजारीच होती.

गुंड्याची आयडिया मला मात्र आवडली नाही. भीत भीतच मी म्हणालो, 'न्हाय रे बाबा, माज जमणार न्हाय, आमच्या अण्णास कळलं तर चमडीच लोळवील.'

त्याबरोबर गुंड्याने माझी गळपटीच धरली व म्हणाला,

'च्या आईस, घाबरतेस कशास? ह्याचा कुणास थांगपत्ताबी लागणार न्हाय.'

'खरं, गावड्याची म्हातारी बागेत ऱ्हातेय न्हवी....?'

'अरे, त्या म्हातारीस दिसताय खुटे? ती ह्या टोकास ऱ्हाली तर, आमी त्या टोकाच्या काजू काडून पसार व्हतलं!'

गुंड्यापुढे कुणाचं काही चालायचं नाही. आपल्या विरुद्ध बोलणाऱ्याच्या तो पेकाटात हाणायचा. त्यामुळे सारे त... त... प... प... करीत त्याच्याबरोबर निघून गेले. त्यातूनही मी मात्र मागच्या मागे हळूच कोर काढली.

दुपारची दोनची वेळ असावी. गावड्याची म्हातारी एका झाडाखाली बसून मुरट्याच्या काजू काढीत होती. जवळपास दुसरं कोणीच नव्हतं. गुंड्या नि त्याचे साथीदार लपत-छपत बागेच्या दुसऱ्या टोकाला गेले. झाडांवर चढून त्यांनी काजूने खिसे भरले. खाली उतरून पसार होणार तोच, म्हातारीची भाकरी घेऊन आलेल्या गावड्याच्या बायकोने त्यांना पाहिले.

'अरे कारट्यानू......' म्हणून ओरडत ती त्यांच्याकडे धावली. तोच त्यांनी तेथून धूम ठोकली.

झाले गावड्याने पंचायत बोलाविली नि त्यांना दंड केला. असे प्रकार अधून-मधून घडायचे. मग मुलांच्या घरचे लोक मास्तरांचा उद्धार करायचे!

# ११ पोरांचं नाटक

शाळेत सातवीचा वर्ग सुरू झाला, त्या वर्षी मी चौथीच्या वर्गात शिकत होतो. शाळेला पूर्वप्राथमिक शाळेचा मिळालेला दर्जा म्हणजे गावच्या शैक्षणिक प्रगतीचे एक पाऊल होते. त्यामुळे गरीब विद्यार्थ्यांना किमान सातवीपर्यंत शिकण्याची संधी मिळणार होती. यापूर्वी पाचवीच्या पुढे शिकलेली मुले गावात क्वचितच आढळायची. सावित्रीच्या लेकींना तर रांधा, वाढा, उष्टी काढा या पलीकडे शिक्षण काय असते माहीतच नव्हते. काही श्रीमंतांची मुले शेजारच्या तुडयाला जाऊन सातवी पास झाली नि मास्तर बनली. मास्तरची सरकारी नोकरी मिळाल्याने गावात त्यांची चलती होती.

'मास्तर, आमुक... नि तमुक... कामाच काय करायचं?' म्हणून तथाकथित पुढारी त्यांचा सल्ला घेत. त्यामुळे गावात त्यांची कॉलर ताठ असायची.

तसा सहावीचा वर्गही एका वर्षापूर्वीच सुरू झाला होता; परंतु शाळेत ना शैक्षणिक साहित्य, ना पुरेशी

इमारत! सात वर्ग, तीन खोल्या नि तीन मास्तर ..........! तीन आकडा तसा अशुभ मानला जातो; परंतु या त्रिमूर्तींनी शाळा मात्र झकास चालविली होती. दोघा शिक्षकांकडे प्रत्येकी दोन वर्ग व एका शिक्षकांकडे तीन वर्ग होते. सारेच विषय ते मोठ्या आवडीने शिकवीत. मुलांना सतत अभ्यासात ठेवण्याची त्यांची कला कौतुकास्पद होती. एका वर्गाला अभ्यास देऊन ते दुसऱ्या वर्गाकडे वळायचे. बऱ्याच वेळा वर्गातील हुशार मुले हंगामी शिक्षक व्हायची. मला ही बिनपगारी मास्तरची संधी तशी रोजच मिळायची. त्यामुळे मुलांमध्ये माझा भाव वाढला होता. मी मुलांकडून पाढे म्हणवून घेऊ लागलो की लवारचा गुंड्या गुरगुरायचा. मी त्याला प्रश्न विचारला की, आपले बटबटे डोळे पुन्हा मोठे करून ओठ चावत माझ्याकडे रागाने पाहायचा. गुरुजींकडे याबाबत तक्रार केली की मग शेपूट खाली घातल्यागत गुमान बसायचा. पण शाळा सुटल्यावर बऱ्याच वेळा त्याचा वचपाही काढायचा. माझी संगत मात्र त्याने कधीच सोडली नाही.

शाळेसाठी लागणारे शैक्षणिक साहित्य देणगीच्या स्वरूपात मिळवावे असा शिक्षण खात्याचा एक अलिखित संकेत. तुडयाचे चांदिलकर गुरुजी यासाठी सतत धडपडायचे. कधी गावच्या पोलीस पाटलास सांग, कधी सरपंचांस विनवणी कर, तर कधी गावच्या सावकारास आर्जव कर; असे त्यांचे सारखे चालू असे. पण त्यात त्यांना फारसे यश यायचे नाही. फुकट फौजदारकीची पुढाऱ्यांना सवय! हात सैल करून ते कधी कुणाला मदत करायचे नाहीत. कुणाला काही द्यायची वेळ आलीच, तर त्याची किंमत वसूल केल्याशिवाय ते सोडायचे नाहीत. हजार सबबी पुढे करून सर्वांना गोल करण्यात त्यांचा हातखंडा! एकदा गुरुरजींनी गावातील प्रमुख लोकांची बैठक बोलाविली. त्यांच्यासमोर शाळेच्या अडचणी मांडून त्या सोडविण्यासाठी त्यांचे सहकार्य मिळवायचे असा त्यांचा उद्देश!

'मास्तरांनी मीटिंग बलीवलेय' म्हणत सरपंच, पोलीस पाटील, जानता गावडा, नलावड्याचा हनम्या, नाना दुकानदार, पांडू मास्तर,... आदींनी हजेरी लावली. बैठकीत काहीच झाले नाही, तरी 'मास्तरांनी दिलेल्या गरम-गरम चहाचे घुटके घेत चार फुशारकीच्या बतावण्या मारता येतील' हा त्यांचा उदात्त हेतू! इकडच्या-तिकडच्या गप्पा झाल्यावर मास्तरांनीच विषय काढला. ते म्हणाले,

'मंडळी, शाळेच्या विकासाच्या दृष्टीने आपल्याशी चर्चा करण्याच्या उद्देशाने ही बैठक बोलाविली आहे. शाळेत आपलीच पोरं शिकतात. त्यांचं शिक्षण

चांगलं व्हावं, ती मोठी व्हावीत, चांगल्या पदावर जावीत... यासाठी साऱ्यांनीच प्रयत्न करायला हवेत...'

'मास्तर तुम्ही चांगलं शिकीवल्याशी तर पोरं चांगली व्हतीलच की!' त्यांना मध्येच अडवीत जानता गावडा म्हणाला. त्याला शिक्षण कशाशी खातात माहीत नव्हते; पण बोलणे मात्र एखाद्या बॅलिस्टरचे!

'अहो, आम्ही शिकवितोच ना? पण आम्हाला शिकविताना काय अडचणी येतात? काय हवे, नको... याकडे तुमचेही लक्ष हवे.'

'गुरुजी, त्यासाठी सरकार हाय की! त्यांच्याकडे तुम्ही या गोष्टी मांडूस पायजे.'

'ते आम्ही करतोच ना? पण आम्ही पडलो सरकारी नोकर. आम्हाला हक्कानं सगळ्या गोष्टींसाठी भांडता येत नाही. शाळेचं गाऱ्हाणं सरकारकडे गावकऱ्यांनी मांडलं पाहिजे. शिवाय सगळ्याच गोष्टी सरकार कशा पूर्ण करणार? त्यासाठी पालकांनी, गावकऱ्यांनीही यथाशक्ती हातभार लावला पाहिजे. ते सर्वांचे नैतिक कर्तव्य आहे.' मास्तर म्हणाले.

शाळेची प्रगती करण्याच्या दृष्टीने मास्तरांची ही विनंती योग्यच होती. परंतु हे ऐकून पुढारपण मिरविणारी मंडळी गुमान झाली. कोणीच बोलायला पुढे आले नाही. त्यांच्या हातून काही व्हायचे नाही हे हनम्या जाणून होता. म्हणून बऱ्याच वेळा तो त्यांची टरऽ ऽ उडवायचा! रोखठोक स्वभावामुळे कुणी त्याच्या नादाला लागत नसत. मास्तरांना साथ देत व साऱ्यांचे शब्दांनीच चिमटे घेत तो म्हणाला,

'सरपंच, पाटील,... आतं बोला. शाळेत आपलीच पोरं शिकत्यात. त्यांच्या शिक्षणासाठी हातभार लावणं सगळ्यांचच कर्तव्य हाय. आसं गुमान ऱ्हाऊन कस चालणार? बोला... '

पुढाऱ्यांचा फुकटचा बडेजाव त्याला चांगलाच माहीत होता. त्यांची मिजास जिरवायची संधी तो सोडायचा नाही. त्याचा स्वभाव काहीसा फटकळ, पण सडेतोड! त्यामुळे त्याच्या तोंडाला लागायचं धाडस ही मंडळी करीत नसतं. आजही त्याने सरपंच, पोलीस पाटलांना असाच कात्रीत पकडण्याचा प्रयत्न केला. तेव्हा ते नुसते एकमेकांकडे पाहू लागले. आता गुमान राहून भागणार नसल्याचे जाणून सरपंच म्हणाले,

'तसं न्हाय रे पोरा, पर...'

'पर काय? बोला सरपंच!' मध्येच त्यांना अडवत हनम्या म्हणाला.

'साऱ्या गावकऱ्यांची मीटिंग घेऊन...'

'गावकऱ्यांचं मागनं बगूस ईल, तुमी काय करणार बोला?'

सरपंचांची री ऽ ऽ ओढीत, एकमेकाला सांभाळून घेत पोलीस पाटील म्हणाले,

'असं तडकाफडकी कस बोलोस ईल, हनम्या..., साऱ्या गोष्टींचा जरा इचार करूस पायजे. शाळा आपलीच हाय, पोरंबी आपलीच शिकत्यात. काय तरी करूस ईल. खरं... '

त्यांच्या धरसोड व वेळ मारून नेणाऱ्या बोलण्यावर हनम्या काहीसं वेडावून तर काहीसं उपहासाने म्हणाला,

'करूस ईऽ ल...! करा ऽ... करा ऽ!'

यावर कुणीच कांही प्रत्युत्तर दिले नाही. मास्तरांनी केलेल्या चहाचे साऱ्यांनी घुटके घेतले नि सटकायची संधी पाहू लागले. एक एक करीत बरीच मंडळी निघून गेलीसुद्धा! काही कोचांड काढून सरपंच, पोलीस पाटलांनीही वाट धरली. हनम्या मात्र मागे राहिला. गावासाठी, शाळेसाठी काही करायची त्याची मनापासून तळमळ! पण परिस्थिती साथ देत नव्हती. गावात ज्याच्या जवळ जमीन-जुमला, त्याला मान नि मानाचे पद! आजची आरक्षण व्यवस्था त्या काळात नव्हती. त्यामुळे वर्षानुवर्षे ही मंडळी गावच्या महत्त्वाच्या पदावर चिकटून बसलेली. पंच, सरपंच पदावर आपला पिढीजात अधिकार असल्याचे ते मानीत. कर्तव्य काय असते त्यांना माहीत नव्हते. पिढ्यान् पिढ्या असेच चालत होते.

***

हनम्याची अधून-मधून शाळेत मास्तरांबरोबर ऊठबस असे. तुडयाला मामाच्या गावात राहून तो चौथीपर्यंत शिकला होता. पुढे परिस्थिती आड आली नि तो तेथेच अडकला. आपल्यासारखी गत गावच्या पोरांची होऊ नये, असे त्याला मनापासून वाटे. सारी मंडळी निघून गेल्यावर मास्तरांना तो म्हणाला,

'गुरुजी, गावात शाळा न्हवती म्हणून आमची ही गत झाली. आतं शाळा यलेय, पोरं चार पुस्तक शिकली तर कोणी बॅलिस्टर व्हईल, कोणी डाक्टर व्हईल... पण ह्यांच्या डोचकीत हे जाणार न्हाय. फुकटच्या फुशारकीत ह्यांचा मोठेपणा!'

'अरे, यासाठीच आमची धडपड आहे. शाळेची प्रगती झाली, तर मुलांचीही प्रगती होईल. मुलं शिकली तर गाव सुधारेल.' मास्तर म्हणाले.

'गुरुजी, ह्यांच्या भरवशावर जो ऱ्हायला; त्यांचा खेळ संपला! गावचे फुडारी लई बेरकी. ते कुणास गावणार न्हात. ह्यांची नाटक बघून कंटाळा यलाय.' हनम्यानं स्पष्ट केलं.

चांदिलकर मास्तर मोठे कल्पक. सतत त्यांच्या डोकीत काही तरी नवे विचार आकार घेत. हनम्याच्या 'नाटक' शब्दाने त्यांच्या डोकीत लख्ख प्रकाश पडला. त्यांना मुळातच संगीताची, नाटकांची मोठी आवड! गावातल्या काही नाटकांतून त्यांनी कामेही केली होती. ते एकदम म्हणाले,

'हनम्या, आता ठरलं! शाळेच्या पोरांचंच नाटक बसवायचं नि त्यातून मिळालेल्या देणगीतून शाळेची प्रगती करायची!'

चांदिलकर मास्तरांनी मनांत काही घेतलं की ते त्याच्या मागं लागायचे. आता त्यांना नाटकाचं वेड लागलं. चार-पाच नाटकांची पुस्तकं त्यांनी मिळविली नि बाकीच्या शिक्षकांना दाखवून एका नाटकाची निवडही पक्की केली. 'तुरुंगाची यात्रा'- शिवकालीन ऐतिहासिक नाटक!

शिवरायांनी स्वराज्य उभारणीच्या मोहिमेत साऱ्यांना सामावून घेतलं. त्यांच्यामध्ये विश्वास निर्माण केला. म्हणून तर जिवाला जीव देणारी माणसं ते उभी करू शकले. महाराजांच्या शब्दाखातर तुरुंगाची हसत-हसत यात्रा करणारे, स्वराजासाठी प्राणाची बाजी लावणारे सरदार निर्माण झाले. शेतकरी, कामगार,... बहुजन समाज कसा महाराजांच्या पाठिशी खंबीरपणे उभा राहिला; हाच या नाटकाचा आशय!

शाळेसाठी देणगी मिळविण्याबरोबरच शिवकार्याचा दाखला देऊन, गावच्या विकास कामासाठी साऱ्यांना प्रेरित करण्याचा गुरुजींचा हे नाटक निवडण्यामागे उद्देश असावा. गुरुजींनी विद्यार्थ्यांची पात्रता चाचणी घेतली नि कुणाला कोणते पात्र द्यायचे हे निश्चित केले. माझी पाठांतरशक्ती चांगली, पण गायनकला अवगत नव्हती. शिवाय काही शब्द बोबडे यायचे. त्यामुळे मला एका शेतकऱ्याचे पात्र मिळाले. पात्रापेक्षाही नाटकातील सहभाग मला महत्त्वाचा वाटला. शिवरायांचे सरदार हंबीरराव मोहिते हे या नाटकातील मुख्य नायकाचे पात्र. नलावड्याचा भुजंग नाटकातला हंबीरराव झाला. मोगलांशी हातमिळवणी करून स्वराज्याशी गद्दारी करणाऱ्या मानाजीराव मानेचे पात्र नारायणला मिळाले.

नागोजी मास्तर शेजारच्या गावात नोकरीला होते. त्यांना संगीताची आवड, शिवाय ते चांगले हार्मोनियम वादकही होते. नाट्यगीते बसविण्यासाठी गुरुजींनी

त्यांची मदत घेतली.

नाटकाच्या सरवासाठी आता रात्री जागू लागल्या. त्या काळात रेडिओ हे एकच करमणुकीचे साधन. दूरदर्शनची लोकांना ओळखही नव्हती. त्यामुळे गावात नाटकांना गर्दी व्हायची. 'पोरं नाटक शिकत्यात' म्हणून घरची मंडळी मोठ्या अवडीने रात्री नाटकाची तालीम पाहण्यासाठी यायची, आपापल्या पोरांची तोंडभरून कौतुक करायची. नाटक रंगमंचावर येण्यापूर्वीच गावात बोलबाला सुरू झाला. लहान-थोर मंडळी नाटकाच्या दिवसाची मोठ्या उत्कंठेने प्रतीक्षा करू लागले.

आता नाटक म्हणजे स्टेज आलंच! गावच्या मंडळीची स्टेज उभारण्याची कला औरच! आठ दिवस आधीच स्टेज उभारणीच्या कामाला प्रारंभ झाला. भात भरडण्याची लाकडी जाती खाली घालून त्यावर फळ्या बांधण्यात आल्या. स्टेज तयार झाले. चार कोपऱ्यांना वासे उभारून त्यावर बांबूच्या काठ्यांचे छत तयार झाले. ऐतिहासिक नाटकाला लागणाऱ्या पडद्यांची नि पात्रांच्या पोशाखाची मास्तरांनी आधीच ऑर्डर दिली होती.

गावात अद्याप विजेचे दिवे आले नव्हते. त्यामुळे खास जनरेटरची व्यवस्था करण्यात आली होती. पडदे बांधून स्टेज सजले. जनरेटरच्या दिव्यांच्या झगमगाटाने परिसर उजळून निघाला. चिमुरड्या पोरांनी स्टेजसमोर पोती पसरून घरच्या मंडळींसाठी जागा आधीच अडवून ठेवल्या होत्या. प्रकाशाच्या झगमगाटात इकडून तिकडे उड्या मारण्यात त्यांना मौज वाटायची. चिमणीच्या लुकलुकत्या दिव्यापलीकडे विजेचे दिवे कधीच न पाहिलेल्या पोरांना जनरेटरच्या दिव्यांचे कौतुक वाटणे स्वाभाविक होते. त्यातच लाऊड स्पीकरवरील गाण्याने त्यांचा आनंद द्विगुणित झाला होता.

मध्येच एखादा अतिउत्साही कार्यकर्ता स्टेजवर जाऊन माईकमधून पुकारीत होता,

'नाटकाला लवकरच सुरवात होणार आहे. सर्वांनी स्टेजसमोर येऊन बसण्याची कृपा करावी.'

स्टेजच्या शेजारीच शाळेच्या एका खोलीत पात्रांना रंगविण्याचे नि सजविण्याचे काम सुरू होते. नाटकाच्या पोशाखात, स्वत:ला आरशात न्याहाळण्यात आगळीच मौज वाटत होती.

मोठ्या माणसांनी केलेली नाटके आम्ही पाहिली होती. रात्रभर जागून त्यांचा

आनंद लुटला होता. आज प्रत्यक्ष नाटक सादर करण्याची आम्हाला संधी मिळत होती. मनात एक प्रकारचा अनोखा आनंद आणि अव्यक्त धडधड सुरू होती.

सरपंचांनी श्रीफळ वाढवून नाटकाचे उद्‌घाटन केले. जनरेटरच्या दिव्यांचा प्रकाश मखमली पडद्यावर झेपावला. पात्रांच्या पायांच्या हालचाली रंगमंच व पडद्याच्या फटीतून दिसू लागल्या. हार्मोनियमचे स्वर आणि तबल्याची लय जुळली नि उदाधुपाच्या सुगंधी वातावरणात नांदीच्या सुरांनी साऱ्यांचा वेध घेतला.

**''पंचतुंड नररुंडमालधर । पार्वतीश आधी नमितो ।।**

**विघ्नवर्गनग भग्न कराया । विघ्नेश्वर गणपती मग तो ।।''**

नांदी संपली. नांदीच्या स्वरांनी बेधुंद झालेल्या प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटासह वन्समोअर दिला. खेड्यातील नाटकातून नाट्यगीतांना वन्समोअर मिळविणं मोठं प्रशंसेच लक्षण. ते मिळविणारा गायक नाट्यगीत पुन्हा गातांना छाती फुगवूनच गातो. सुरवात चांगली झाली. मात्र नाटक सादरीकरणात काही विनोदी घटना घडल्या. त्यामुळेही प्रेक्षकांच्या मनोरंजनात भरच पडली.

नाटकाच्या पहिल्या अंकातील पहिला प्रवेश. येथे मोगलांच्या अन्यायी राजवटीमुळे त्रस्त झालेले शेतकरी आपल्या वेदना व्यक्त करतात असा प्रसंग. तोतऱ्या शेतकऱ्याच्या भुमिकेत शंकरने रंगमंचावर प्रवेश केला. त्याच बोलणं मुळातच तोतरं, त्यामुळे त्याला हे पात्र शोभून दिसत होतं.

'ब... ब... बेट्यांचं न... न... नशीब... ल... ल... लई मोट्टं दिसतंय!'

त्याच्या पहिल्याच बोलण्याला प्रेक्षकांनी टाळ्या वाजवून दाद दिली. मात्र त्याला पुढचं भाषण आठवेना. त्यामुळे गोंधळून तो मागे-पुढे पाहू लागला. त्याला ऐकू जाव म्हणून पडद्यामागून प्रॉम्प्टिंग करणारी व्यक्ती मोठमोठ्याने सांगू लागली, तो आवाज लाऊडस्पीकरमधून प्रेक्षकांपर्यंत गेला. परंतु गोंधळलेल्या शंकराला काहीच सुचेना. त्यामुळे प्रेक्षकांत हशा पिकला.

दुसऱ्या शेतकऱ्याचे पात्र केलेल्या एका विद्यार्थ्याचा रंगमंचावर धावत येताना पंचाच सुटला. त्याबरोबर ...

'अरे पंचा सुटल, प ऽ ळ!' असं प्रेक्षकांतून कुणीतरी ओरडलं. त्याबरोबर लोक पोट धरून हसू लागले.

शिवाजी महाराजांचा एक मावळा गनिम आलेले पाहून 'जय भवानी' अशी

गर्जना करीत तलवार उपसून त्यांच्यावर तुटून पडतो, असा नाटकातला एक प्रसंग. पुस्तकात त्याच्या भाषणापूर्वी कंसात 'तलवार उपसून' असे लिहिले होते. मावळ्याच्या भूमिकेतील पात्राने कंसातील शब्दासह 'कंसात तलवार उपसून जय भवानी' असे ओरडत मोगलांच्या सैनिकांवर चाल केली. जाणकार प्रेक्षकांच्या लक्षात हा विनोद आला नि ते हसू लागले.

नाटकातील दुसऱ्या एका प्रसंगात एक सैनिक लढाईत घायाळ होऊन खाली पडतो; परंतु नाटकात त्या सैनिकाचे पात्र केलेला विद्यार्थी प्रत्यक्षात खाली पडण्यास तयार होत नाही. पडद्याआडून प्रॉम्टिंग करणारी व्यक्ती त्याला सारखी खाली पड, खाली पड म्हणून सांगत होती. तरीही या पठ्ठ्याने 'माझं अडलंय खेटर' असं म्हणून खाली पडण्यास नकार दिला. त्यामुळे प्रेक्षक पोट धरून हसू लागले. शेवटी संयोजकांना पडदा खाली सोडून हा प्रसंग संपल्याचे दाखवावे लागले.

असे काही किस्से घडले खास; परंतु प्रेक्षकांनी पोरांचं कौतुकच अधिक केलं. एकंदर नाटक 'पोरांनी केलं नि वाऱ्यानं गेलं' असं झालं नाही.

खेड्यातील नाटकातून शेवटचा नि तेवढाच महत्त्वाचा भाग असतो तो बक्षिसे जाहीर करण्याचा. राष्ट्रगीतानंतर बक्षिसे देण्यासाठी लोकांनी स्टेजवर एकच गर्दी केली.

'बाबू पाटलाने शिवाजीचे पात्र चांगले केल्याबद्दल त्याच्या गोव्याच्या मामाकडून एक शर्टपीस बक्षीस...'

'आमच्या मामाने बक्षीस दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे,...' इत्यादी, इत्यादी!

बक्षिसं देणाऱ्यांची नि घेणाऱ्यांची स्टेजवर एकच गर्दी झाली. नाट्य मंडळास रोख सामूहिक बक्षिसेही बरीच मिळाली नि गुरुजींचा नाटक सादरीकरणाचा उद्देश सफल झाला.

## १२. कावळ्यांचा हल्ला

उन्हाच्या तापाने जिवाची लाही-लाही होत होती. सर्वांगातून घामाच्या धारा ओघळत होत्या. जवळपास कुठेच झाडांचा मागमूस नव्हता. त्यात धुळीने माखलेला, बोडका रस्ता; अनवाणी चालणाऱ्यांच्या पायाचे चटके घ्यायचा. अशा सुनसान दुपारी रस्त्याने जाणार तरी कोण? पण चंदन मास्तर अशाच अवेळी बाहेर पडले. सोबत कुणीच नव्हते. रस्त्यावर लोकांची वर्दळही नगण्यच. बेळगुंदीपर्यंत चालत जाऊन साडेबाराची बेळगाव बस पकडायची त्यांना घाई होती. एस. टी. एकदाची चुकली म्हणजे पुन्हा अडीचपर्यंत ताटकळत बसावे लागणार. याच जाणिवेने उन्हाची कदर न करता मास्तर लगबगीने पावले टाकू लागले.

सेवेत रुजू झाल्यानंतर तब्बल सहा महिन्यांनी मास्तर आपल्या गावी जात होते. बऱ्याच दिवसांच्या विरहानंतर आई-वडिलांना भेटण्याची ओढ तर मनात होतीच; शिवाय सेवेतील बऱ्या-वाईट अनुभवांची शिदोरीही

त्यांच्यासमोर खुली करायची त्याना उत्कंठा लागली होती. अनेक गोड आठवणींची मनातल्या मनात उजळणी करत मास्तर आपल्याच तंद्रीत निघाले होते. त्यामुळेच उन्हाच्या झळांची तीव्रता त्यांना जाणवली नाही.

डी. एड्.चे प्रशिक्षण पूर्ण झाले नि चंदन मास्तरांची बेळवट्टी प्राथमिक शाळेत नियुक्ती झाली. तीन शिक्षकी शाळेत आणखी एका शिक्षकाची भर पडली. सुटाबुटातले नवे तरुण मास्तर पोरांना खूप आवडायचे. जुन्या तिन्ही शिक्षकांनी सातवी पास झाल्यानंतर शिक्षकी पेशा पत्करला होता. त्यामुळे वरच्या वर्गांना इंग्रजी शिकविण्याची जबाबदारी चंदन मास्तरांवर आली. पाचवी ते सातवीपर्यंतच्या वर्गांना इंग्रजी विषय होता; परंतु हा विषय शिकविणारे मास्तरच शाळेत नव्हते. चंदनमास्तरांच्या नेमणुकीने ही अडचण दूर झाली. शिकविताना मास्तर काहीसे 'एस्-नो, एस-नो' करीत. पोरांना त्या वेळी त्याचा अर्थबोध व्हायचा नाही; परंतु काही तरी नवीन शिकत असल्याची जाणीव व्हायची. त्यामुळे इंग्रजीच्या शिक्षकांविषयी विद्यार्थ्यांत ओढ निर्माण झाली.

हळूहळू मास्तर विद्यार्थ्यांत मिसळू लागले. शिकवणीच्या निमित्ताने मुलांना सुटीतही शाळेत बोलावू लागले. त्यातून मुलांशी जवळीक वाढली. रात्रीच्या वेळी मुले मास्तरांबरोबर शाळेतच झोपू लागली. अभ्यासाबरोबरच गमती-जमती होत. रविवारचा सुटीचा दिवस तर मुलांसमवेत फिरण्यात व मौज-मजा करण्यात जाऊ लागला; कधी राकसकोप डॅमवर तर कधी पाटलाच्या बागेत! गावच्या लोकांतही चंदन मास्तरांविषयी सहानुभूती वाढली; परंतु मास्तर थोडे नव्या विचारांचे. गावातील लोकांच्या अंधश्रद्धांवर ते टीका करीत. भूतबाधा, अंगात देवी येण्याचे प्रकार, गंडादोरा अशा गोष्टींची ते टर उडवत. गावात मात्र असले अनेक प्रकार होते. त्यामुळे मास्तरांचे नवे विचार लोकांना पटायचे नाहीत.

'मास्तर, चार बुकं शिकले लोक तुमी. त्यातलं आमास कायबी समजोच न्हाय. पर  वाडवडलांपासून चालत यल्ले रिवाजबी खोटे म्हणूस यणार न्हाय. तुमचे इचार तुमच्याकडे; रिवाज मोडून आमास देवाचा कोप करून घेतला न्हाय.'

म्हातारी जानकी मास्तरांना चार समजावणुकीच्या गोष्टी सांगे. त्यावर 'तुमचा धर्म तुमच्याकडे' म्हणत मास्तर हसण्यावारी नेत.

याच आठवणींच्या तंद्रीत मास्तरांनी वाटेतील बिजगर्णी गाव मागे टाकले.

वाट जवळ करावी म्हणून मुख्य रस्ता सोडून मधली पायवाट धरली. सूर्य डोकींवर आला होता. उन्हाची तीव्रता वाढली होती. तप्त सूर्यकिरण धरतीवर थयथयत होते. मास्तरांनी सभोवार नजर टाकली. सर्वत्र भकास स्थिती होती. जवळपास कुणीच नव्हते. मात्र दूरवर बेळगुंदीच्या सीमेशेजारी एक जोडपे झीळीतील काटके तोडत असलेले दिसले. मास्तरांनी घड्याळात पाहिले. दुपारचे बारा वाजले होते. हातातील छत्री पसरून त्यांनी डोकींवर धरली नि पावलांची गती वाढविली. गोड विचारांची तंद्री अद्याप डोकींत होतीच. केवळ नोकरीसाठी गावघर सोडून एवढ्या दूरवर यावयाचे, आई-वडिलांची सहा-सहा महिने भेट नाही. घरी पोहोचताच पगार आईच्या हातात द्यावयाचा, किती खूश होईल ती! तिने आपल्या लेकरा विषयी कितीतरी अपेक्षा बाळगल्या आहेत! विविध कल्पनांच्या मनोराज्यात ते चालले होते.

अचानक ढगाआड सूर्य लपला. धरतीवर दाट छाया पसरली. तोच आकाश कोसळल्यासारखे झाले. मास्तरांच्या छत्रीवर थाड-थाड आवाज झाला. मास्तर घाबरले नि त्यांनी गोंधळून वर पाहिले. पुन्हा तसाच आवाज. छत्रीला छिद्रे पडलेली दिसली. छत्रीच्या एक-दोन काठ्याही मोडल्या. घाबरून हातातली छत्री त्यांनी सोडून दिली. काय घडते आहे, समजण्यापूर्वीच कावळ्यांची एक मोठी झुंड त्यांच्यावर चाल करून आली. मास्तरांनी पळायचा प्रयत्न केला; पण कावळ्यांनी पाठलाग सोडला नाही. एकामागून एक कावळा त्यांच्यावर हल्ला करू लागला. त्यांच्या चोचीच्या माऱ्याने मास्तर रक्तबंबाळ झाले नि खाली कोसळले. शेजारी काटक्या गोळा करणाऱ्या जोडप्याने हे पाहिले व हातात काठ्या घेऊन ते धावत आले.

त्यांनी कावळ्यांना हुसकावून लावले. मास्तर बेशुद्ध झाले होते. त्या जोडप्याने त्यांना उठवून बसविले. पिण्यासाठी आणलेले पाणी त्यांच्या तोंडावर मारल्यानंतर त्यांचे डोळे किलकिले झाले. ते पुरते घाबरले होते. काय घडले त्यांना कांही समजत नव्हते. कावळ्यांनी हल्ला केला, एवढेच ते सांगू शकले. कावळ्यांच्या चोचीच्या माऱ्याने त्यांच्या हाता-पायावर व डोकींवर जखमा झाल्या होत्या. त्या जोडप्याने मास्तराना बेळगुंदीपर्यंत नेऊन बेळगाव गाडीत बसविले.

'देवासारखे धावून आलात, नाहीतर आज माझी धडगत नव्हती,' असे बोलून मास्तरांनी त्यांचे आभार मानले.

ही बातमी गावात वाऱ्यासारखी पसरली.

‘चंदनमास्तरास कावळ्यांनी बोचल्यांनी .....कावळ्यानी बोचल्यांनी!’

जो-तो बोलू लागला. मग जानकी मावशीला काय सांगायला पाहिजे.

‘अरे, मास्तर लई मोट्या मोट्या गोष्टी बोले. भूत न्हाय, देव न्हाय म्हणून सांगे. आतं बग म्हणूच. केल्ल, बोललं फळ मिळालं का न्हाय. बेळगुंदीच्या सीमेवर हे घडलंय. कावळ्याच्या रूपात भूतानंच घेरलं अस्याल मास्तरास. ’

त्या जिथं-तिथं बोलू लागल्या. गावातल्या पुजाऱ्याचीसुद्धा मास्तर टिंगल करायचे. त्यालाही आता बोलायला आयती संधी मिळाली.

‘आमच्या वाडवडलांपासून ह्या गोष्टी चालेत यल्यात. देवकाऱ्याच ऐको नकाशी, अंगारा लाऊ नकाशी म्हणून मास्तर सांगे; आतं सांग म्हणूच लोकासनी.......’

घडलेल्या घटनेबद्दल सहानुभूती दखवायचं बाजूलाच, उलट अंधश्रद्धाळू लोक त्यांची अशी टिंगल करू लागले.

पारंपरिक रूढी, पद्धतींचा लोकांवर जबरदस्त पगडा पडलेला! अशा गोष्टीविरुद्ध कुणी कांही बोलले, तर लोक त्याला मूर्खात काढीत.

‘चार पुस्तकं शिकलं म्हणून शानपण यन्नाय. आमच्या आज्जा- पंज्यापासून हे चालत यलय. त्यात तुमची अक्कल पाघळू नकाशी.’

असं बोलून लोक त्याला पिटाळून लावीत. त्यात बिचाऱ्या चंदन मास्तरांचं काय चालणार? कावळ्यांचा हल्ला का झाला कोण जाणे! परंतु ते परिस्थितीची शिकार बनले. या घटनेनंतर मात्र मास्तर मवाळ बनले. (किंबहुना त्यांचाही अशा गोष्टींवर विश्वास बसू लागला.) वाईट चालीरिती, अंधश्रद्धा यांच्या जाळ्यातून लोकांना बाहेर काढण्यास कोणी ॲनिसचा कार्यकर्ता त्या काळात गावात जाऊन पोहोचलेला नव्हता. तसा त्याचा काही उपयोगही झाला नसता.

लोकांवर अंधश्रद्धेचा जबरदस्त पगडा पडलेला. देवाचा कोप झाल्याने रोग होतात अशीच विज्ञानयुगातही त्यांची भावना. गावात एकही चांगला डॉक्टर नव्हता. झाडपाल्याची औषधं देणारा गावडा हाच साऱ्यांचा फॅमिली डॉक्टर. मोठा आजार झाला म्हणजे बेळगुंदी किंवा बेळगाव गाठावे लागे. त्यात वाहतुकीची गैरसोय. आजाऱ्याला बैलगाडीतून नेईपर्यंत वाटेतच बरे-वाईट घडण्याचा धोका.

त्यामुळे लोक डॉक्टरी उपचारापेक्षा गंडा-दोरा, करणीवरच भर देत. एकदा सोनूचं पोरगं अशाच एका आजारात मेलं. ‘भाऊबंदांच्या करणीमुळं पोरगं दगावल्याचं’ रहस्य म्हणे कुठल्या देवानं सांगितलं नि नव्या महाभारताला सुरवात

झाली. त्याची बायका-पोरं, मुलगं मेल्याचं दु:ख विसरली नि भाऊबंदांचा उद्धार करू लागली. त्यातून प्रकरण बरच वाढलं. दोन्ही कुटुंबांच्या घरांसमोर लिंबू ,गुलाल, नारळ आदी 'करणी'चे पदार्थ पडू लागले. एकदातर हे प्रकरण हमरीतुमरीवर व बायकांच्या झोंबाझोंबीवर गेलं.

अज्ञान आणि अंधश्रद्धा यातून खेड्यांत असले प्रकार नेहमीच घडत असतात. त्याविरुद्ध उपदेश करणाराच मूर्ख ठरतो. बेळवट्टी गावही याला अपवाद नव्हता. गावातला देवदास असाच काहीसा चमत्कार करून लोकांना झुलवी. परगावचे लोकही आपले विविध प्रश्न घेऊन त्याच्याकडे येत. त्यातून त्याची चांगलीच चंगळ होई; परंतु त्यामुळे लोक मात्र देशोधडीला लागले.

रविवार देवदासाच्या अंगात येण्याचा दिवस. त्या दिवशी पहाटेपासूनच तो देव्हाऱ्यासमोर मांडलेल्या बैठकीवर बसे. देवाला उदबत्ती दाखवून हात जोडताच त्याच्या अंगात देवीचा (की देवाचा) संचार होई. त्याचे विचित्र हातवारे सुरू होत. डोळे गरगर फिरू लागत नि एकवार सर्वांवर त्याची दृष्टी जाताच हात जोडून सर्वांच्या नजरा खाली जात. देवाच्या नावानं चांगभलं होत असे. मग एक-एक जण त्याच्यासमोर उभा राही व आपला प्रश्न त्याच्या समोर ठेवी.

'बालका ते माज म्हाईत हाय... मावळतीची पिडा तुझ्या पाटीस लागलेय..... माझा ह्यो अंगारा नि लिंबूचा उतारा उबुतीकडे ठेव...तुझी पीडा दूर व्हईल. पुढच्यावारी येऊन देवाचं मागणं पुरं कर.'

देवदास डोळे मिटून सांगे. त्याने दिलेला लिंबू -अंगारा घेऊन, त्याच्यासमोर नतमस्तक होऊन लोक कृतार्थ भावनेने निघून जात. त्या दिवशी दिवसभर असा प्रकार चालायचा. गावातीलच नव्हे, तर आजुबाजूच्या खेड्यांतील लोकांचीही देवदासाच्या घरी गर्दी होई.

देवदास लोकांना झुलवत होता, डोलवत होता. काही सुशिक्षितांना त्याचं नाटक कळायचं; परंतु त्याचं बिंग बाहेर काढण्याचं धाडस कुणामध्येच नव्हतं किंबहुना त्याविरुद्ध बोलणाऱ्यालाच लोक मूर्खात काढीत. चंदन मास्तरांसारखीच आपलीही एक दिवस अवस्था होईल, याची सर्वांना भीती! लोक अंधश्रद्धेच्या जोखडात अडकले ते कायमचेच.

# १३. बस यली रेऽऽ

राम्या, गोम्या, बाळक्या, परस्या..... समदी पोरं आज आनंदात होती. त्यांचे पाय घरात टिकत नव्हते. पहाटेपासूनच गावच्या वेशीकडे त्यांची नजर लागून राहिली होती. काहीशी घरघर ऐकू आली की ते वेशीत धावत जायचे नि 'न्हायरे अजून यऊस न्हाय,' म्हणत नाराजीनंच परत यायचे.

गावच्या वेशीत रस्त्याच्या दुतर्फा केळी लावल्या होत्या. त्यांच्यामध्ये फडफडणारा 'सुस्वागतम'चा कापडी फलक सर्वांचे स्वागत करीत होता. भगव्या पताका सर्वांचे लक्ष वेधून घेत होत्या. गावात आज काही तरी वेगळं असल्याची त्यामुळे जाणीव व्हायची; मात्र सर्वांच्याच मनात कसली तरी रुखररुख होती. गावात सणासुदीचा थाट होता; परंतु त्यावर उदासीनतेची छाया जाणवत होती.

कुणी बडी मंडळी यावयाची झाली म्हणजे गावच्या वेशीत अशी सजावट केलेली असे. गावची पंचमंडळी,

मास्तर नि शाळेची पोरं हातात हार नि पोरी आरती घेऊन असायच्या. वेशीत पाहुण्यांचे आगमन होताच आरती ओवाळून गावातून त्यांची मिरवणूक निघे. कुणी राजकीय नेते आले, तर मग विचारायलाच नको! विशेषत: त्या काळात महाराष्ट्र एकीकरण समितीच्या नेत्यांचा गावात मोठा भाव होता. त्यांचे आगमन होताच जयघोषाने गाव दुमदुमून जाई . गावचा हा शिरस्ता पाहून नेतेमंडळीही खूष होत नि आश्वासनांची बरसात करीत. त्यावर विश्वास ठेवून लोक गावच्या विकासाची प्रतीक्षा करीत.

शिरस्त्याप्रमाणे पाहुण्यांच्या स्वागतासाठी आजही गावची वेस सजली होती; परंतु स्वागत करायला तेथे कुणीच नव्हते. एकलकोंडा फलक रस्त्याने येणाऱ्यांचे उदासवाणे स्वागत करीत होता. उत्कंठेने प्रतीक्षा करणाऱ्या पोरांनाही त्यामुळे कसेसेच वाटले. एवढ्यात कसला तरी घरघर आवाज झाला, तशी पोरं खेळायची थांबली नि पुन्हा रस्त्याकडे नजर लावून पाहू लागली. एक ट्रक रस्त्याने धूळ उडवीत येत होता. पोरांचा हिरमोड झाला. तसा राम्या म्हणाला,

'काय रे ऽ , नऊ वाजता गावात बस यणार म्हणून गुरुजींनी सांगितलं. अजून कुणीच कस यऊस न्हात. सरपंच, गुरुजी...... सगळे गेले खुटे?'

'व्हय रे गड्या, आज सगळंच कसं इपरीत दिसताय. काय तरी घोटाळा हाय बग.' सोम्या म्हणाला.

'कार्यक्रम हाय म्हणून यशीत केळी, पताकाबी लावल्यानात!'

'व्हयरे ऽ ... खरं, कोणच कसं यऊस न्हाय?''

एवढ्यात जातं घरघरल्यासारखा आवाज झाला. पोरांनी दचकून रस्त्याच्या दिशेनं पाहिलं. तांबड्या रंगाची बस धुळीचे लोट उडवीत गावच्या दिशेने येत होती. बस जवळ येताच तिनं 'पों ऽ , पों ऽ ऽ' आवाज केला. तशी पोरं रस्त्यावरून बाजूला सरकली नि टाळ्या वाजवत उड्या मारू लागली. 'बस' हा शब्द पोरांना केवळ ऐकून माहीत होता, तिचं प्रत्यक्ष दर्शन घडल्यावर त्यांना दिव्यानंद झाला!

'बस यली रे ऽ ऽ .... बस यली ....'

म्हणत पोरांनी समद्यांना हाळी मारली; परंतु चिमुरडी पोरं वगळता कुणीच बाहेर आले नाहीत. बायका-पुरुष घरांच्या दरवाजाआडूनच बघत होते. बस आली तशीच धूळ उडवीत पुढे निघून गेली. तसं पोरं ओरडली,

'बस गेली रे ऽ , बस गे ऽ ली....'

लोकांनी बसचं स्वागत केलं नाही. गावात बस आल्याचा आनंद मनातच दाबून ठेवला. बस इनाम बडसाला निघून गेल्यावर हनम्या, गणप्या, मन्या हळूहळू घरातून बाहेर आले.

'कायबी झालं तरी आज बस फुडे सोडतली न्हाय म्हणून लोकासनी लई सांगितलो; खरं ऐकताय कोण?' हनम्यानं मनातला क्रोध व्यक्त केला.

'आमदारानं तरी असं करूस नको व्हतं. आजचा दीस हीतनच बस सोडूस पायजे व्हती,' गणप्या बोलला.

'कायबी म्हण गड्या! बडसाचे लोक लई बेरकी. ते 'ह्यास'नं गावणारच न्हाईत. बघा की, आमच्या लोकांनी पंधरा दीस धावपळ केली, आमदाराच्या घराच्या पायऱ्या झिजीवल्या, डेपो मॅनेजरकडे गयावया करून आजपासून बस सुरू करून घेतली नि झालं काय...? रातोरात लंबी दाढी! बेळवट्टीची बस बडसास गेली. स्वागताचा समदा खर्चबी वाया गेला.'

'आमदारास हे समजोस पायजे व्हतं. दोन्ही गाव त्यासनं सारखीच.'

'अरे , खुटला आमदार नि खुटलं काय..... खाऊस मिळालं की सगळे सारखेच!'

लक्ष्मीदेवीच्या मंदिरासमोर एक-एक करत लोकांचा घोळका वाढला. चर्चेला ऊत आला. लोक मनातला संताप व्यक्त करू लागले. रंगाचा बेरंग होऊ नये म्हणून सरपंच आणि काही जाणत्या मंडळींनी तेथून पाय काढला.

शहरापासून दूर राहणाऱ्या लोकांच्या दृष्टीनं गावात बस येणं हा तेवढाच आनंदाचा आणि कौतुकाचाही विषय होता. गावात बस येणार असल्याचे ऐकून ते आनंदी झाले होते. दगड-धोंड्यांतून बैलगाडीचे धक्के खात जाणाऱ्या पोरांना बसचा प्रवास तसा नवखा आणि एक आगळा अनुभव देणाराच ठरणार होता. कुणी म्हणे,

'मीय्या बसीत बसोन बेळगुंदीच्या हायस्कूलास जाणार!' कुणी म्हणे,

'आमचा बाबा बसमधनं माज बेळगावास न्हेणार!' परंतु बस बेळवट्टीऐवजी पुढे बडसाला गेली नि लोक 'आ' वासून पाहातच राहिले.

बस बेळवट्टी गावातूनच जाणार असल्याने तशी कांही गैरसोय होणार नव्हती; परंतु लोकांना आपला मानभंग झाल्यासारखे वाटले नि ते संताप व्यक्त करू लागले. बसच्या स्वागताची लोकांनी केलेली तयारी तशीच राहिली. ठरल्याप्रमाणं लोक बसच्या स्वागतासाठी गावच्या वेशीत गेले नाहीत. वेशीत लावलेल्या

केळी व पताकांनी बसचे मूकपणे थंडे स्वागत केले. पोरांना याची कल्पना नव्हती; म्हणून बसचा आवाज ऐकताच ती धावत–पळत रस्त्याकडे आली होती.

***

गावचे पुनर्वसन तसे आडमार्गावरच झाले होते. शहरात जाणारा धड रस्ता नाही, तर बस कशी सुरू होणार? उन्हाळ्यात रस्त्यावरून धुळीचे लोट उठायचे नि पावसाळ्यात गुडघाभर चिखल व्हायचा. बिजगर्णी व बडसाशेजारील नाल्यांना पूर आला म्हणजे शेजारच्या खेड्यांचाही संपर्क तुटायचा. अशा वेळी नदी पार करून जाण्यासाठी लाकडाच्या ‘आडी’शिवाय दुसरा पर्याय नसे. एकदा गावड्याचं पोरगं आडीवरनं पाय घसरून नदीत पडलं नि दैव बलवत्तर म्हणूनच ते वाचलं. आजारी लोकांची तर पावसाळ्यात मोठी कुचंबणा व्हायची. डॉक्टरांचा अभाव, औषधांची आबाळ नि वाहतूकींची गैरसोय यामुळे बऱ्याच जणाना पावसाळ्यात प्राण गमवावे लागले होते. कित्येक दिवस असेच गेले. गावात एस.टी. बस सुरू करण्यासाठी प्रयत्न करण्याचा विचार कधी कुणाच्या मनाला शिवलाही नाही. सरकारलाही या धरणग्रस्त गावाची कधी कींव आली नाही. जनतेविषयी कळवळा वाटला, तर ते सरकार कसले!

एक दिवस बोलता–बोलता हनम्याच म्हणाला,

‘सरपंच, गावात कुणी यत्तलं तर ना रस्ता ना बस! किती दीस हे असंच चालायच? ''

‘अरे, ग्रामपंचायतीत ठराव करून लई येळा कलेक्टरांकडे पाठविलाय. आमदार सायबासनीबी सांगितलंय. कुणी दादच घेऊस तयार न्हात.’

‘सांगोन नि ठराव करून कामं व्हन्नात सरपंच! पॉर रडल्याशिवाय आई दूध पाजीत न्हाय. तिथे हे आमदार नि सरकार काय दाद देणार? आमदारास मतं पायजे, कामं करूस नको.... याचा जाब ईचारा.’

‘पोरानू , आतं तुमीच असल्या गोष्टी करूस पायजे. पायजेतर आमीबी तुमच्याबरोबर यतो. चला आमदारासनी इनंती करू.''

‘इनंती न्हाय हाक्क मागतला. काम कर न्हाय तर फुडच्या निवडणुकीत ये म्हणूचं...’

नि दुसऱ्याच दिवशी आमदारांकडे जायचा निर्णय झाला. या काळात तालुका महाराष्ट्र एकीकरण समितीत दोन गट पडले होते. बेळवट्टी गावानं माजी आमदारांना

साथ दिली म्हणून नवे आमदार गावाकडं लक्ष द्यायला तयार नव्हते. लोकांनी विनंती केली तेव्हा ते ‘पाहतो ’ एवढेच बोलले; परंतु लोकांनी सातत्याने पाठपुरावा केला तेव्हा रस्त्याचा प्रश्न मार्गी लागला. पुढे बस सोडायची तारीखही निश्चित झाली. लोकांनी बसच्या स्वागताची जोरदार तयारी केली. पण...

आदल्या रात्रीच आमदारांची सरपंचांच्या नावे चिठ्ठी आली.

‘बसगाडी इनाम बडसपर्यंत सोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सर्वांनी त्या ठिकाणी कार्यक्रमाला उपस्थित रहावे.’

लोकांच्या आनंदावर विरजण पडले. लोक संतापले. हनम्या म्हणाला,

‘आमदारानं शेवटी आपले दात दाखिवल्यानुच. गाडी गावातनं फुडे सोडतली न्हाय.’

‘ठरल्यापरमाणं निदान आज तरी बसचं गावात उद्घाटन हूस पायजे व्हतं. उद्या गाडी फुडे न्हेऊस आमचा इरोध न्हवता,’ सोम्या म्हणाला.

‘अरे, रस्त्यावरच खड्डे काडा. बघुवा गाडी फुडे कशी जातेय.’

‘व्हय, व्हय. तसंच करा.’

प्रत्येकजण आपापले मत मांडू लागला. सरपंच विचारी होते. परिस्थिती बिघडू द्यायची नाही अस ठरवून ते म्हणाले,

‘तुमचंबी बरोबर हाय. खरं, दर यळेस कामासाठी आमदाराकडेच जाऊस पायजे. उद्या काय आगळीक झाली तर ते जवळ करणार न्हाईत. म्हणून साऱ्यांनी थोडं सबुरीनं घेतलं बरं.’

सरपंचांचं म्हणणं साऱ्यांना पटलं. ते आपापल्या घरात गुमान राहिले. बडसकरानी बसचं थाटात स्वागत केलं. बस गावातून ‘पों ऽ पों ऽ’ करीत ये-जा करू लागली. काही दिवसानंतर लोक राग विसरून बसमध्ये बसू लागले.

# १४. हायस्कूल

'काही तरी वेगळं कर,' असा नेहमीच गुरुवर्यांचा उपदेश. 'वेगळं' म्हणजे नेमके काय? याचं कोडं मात्र मला कित्येक दिवस सुटत नव्हतं. त्यांच्या सोबत सभा, संमेलनातून भाग घेणं, भाषणं करणं, लोकांत मिसळून विविध विषयांवर चर्चा करणं या गोष्टी घडत होत्या. पण त्यांना अभिप्रेत असलेलं 'वेगळं' काही गवसत नव्हतं.

बेळगुंदी हायस्कूलमध्ये शिकत असताना मुख्याध्यापक या नात्याने गुरुवर्य परशुरामभाऊ नंदिहळ्ळी यांची ओळख झाली. गुरू – शिष्याच्या नात्यानं आमची जवळीक वाढली. पुढे दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर शहापूरच्या विद्यार्थी वसतिगृहात त्यांनी मला बोलावून घेतलं. समाजात आदराचं स्थान असलेला एक माजी आमदार आणि एका मोठ्या संस्थेचा संस्थापक आपल्या सहवासात राहण्यास संधी देतो, यासारखं भाग्य आणखी दुसरं कोणतं!

मॅट्रिकनंतर पुढे काय? या भेडसावणाऱ्या प्रश्नाचं

गुरुवर्यांनी आपल्या कृतीतून मला उत्तर दिलं होतं. तिथे राहूनच महाविद्यालयीन शिक्षण मी पूर्ण केलं नि पुढे बी. एड. ची पदवीही संपादन केली. त्यानंतर 'पुढे काय?' हा प्रश्नच त्यांनी निर्माण होऊ दिला नाही. बी. एड्.चा निकाल जाहीर होण्यापूर्वीच कंग्राळी (बुद्रुक) हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून रुजू झालो.

'शिक्षकाचे कार्य शाळेपुरते मर्यादित न राहता, ते व्यापक बनले पाहिजे. हाडामांसाचा गोळा असलेल्या विद्यार्थ्यांच्या जीवनाला आदर्श रूप प्राप्त करून दिले पाहिजे; आणि हेच महत्त्वाचे कार्य शिक्षक करीत असतो. अशा आदर्श विद्यार्थ्यांमुळे उद्याचा आदर्श समाज घडत असतो. यासाठी शिक्षकांनी केवळ मास्तरकी न करता कार्यकर्ता होऊन समाजाच्या प्रगतीसाठी जे करता येईल ते केलं पाहिजे,' असा गुरुवर्य सातत्याने उपदेश करीत. याच सामाजिक बांधिलकीतून त्यांनी विश्वभारत सेवा समिती नावाच्या शैक्षणिक संस्थेची स्थापना केली. खेडोपाडी माध्यमिक शाळा सुरू करून शिक्षणापासून वंचित झालेल्या दीन, दलित व ग्रामीण जनतेला त्यांनी शिक्षणाची कवाडं खुली केली.

कुणी नंदिहळ्ळी यांचा लाडका शिष्य; तर कुणी मानसपुत्र म्हणून माझ्याकडे पाहात. मलाही त्याचा अभिमान वाटे. त्यांच्यामुळे समाजात ओळख वाढत होती, मान मिळत होता. गुरुवर्यांनी माझ्याकडे शिक्षक म्हणून कधीच पाहिलं नाही. एक कार्यकर्ता म्हणूनच मी समाजापुढे यावं असं त्यांना वाटे .

मी शिक्षक झालो; परंतु गुरुवर्यांना अभिप्रेत असलेल 'वेगळं' कधी करणार हा विचार मनाला सतत सतावत होता. त्या 'वेगळ्या'ला मन शोधीत होतं. गुरुवर्य मला सांगत,

'मी तुझ्या वयाचा असताना संस्था काढली.'

त्यांच्या बोलण्याचा रोख समजत होता; पण उत्तर गवसत नव्हते.

उन्हाळ्याच्या सुटीत काही दिवस गावी आलो; तोच एके दिवशी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक व ग्रामपंचायतीचे उपसरपंच भेटावयास आले. इकडच्या-तिकडच्या गप्पा झाल्यावर मुख्याध्यापकांनीच विषय काढला.

'सर, गावात हायस्कूल काढलं तर...?'

त्यांच्या प्रश्नाने मी काहीसा गोंधळलो; पण मनाला वाटले, 'विचार चांगला आहे.' विश्वभारत सेवा समितीचे गावात हायस्कूल व्हावे, असा त्यांचा विचार होता. बेळवट्टी परिसरातील मुलांच्या सोईच्या दृष्टीने मला ही योजना पटली नि आवडलीही. 'काही वेगळं कर' म्हणून सांगण्यामागे गुरुवर्यांना असेच काही

अभिप्रेत असेल का?' माझ्या मनात विचार तरळून गेला. परंतु गुरुवर्यांशी या विषयावर चर्चा केल्याशिवाय निर्णय देणं शक्य नव्हतं.

'पाहतो, गुरुवर्यांशी चर्चा करून सांगतो' मी म्हणालो.

त्यावर ही मंडळी निघून गेली; परंतु त्यांनी मांडलेली योजना माझ्या डोकींत घर करून बसली. रात्रभर हा विचार मनातून गेलाच नाही. गावची शैक्षणिक दुरवस्था डोळ्यांसमोर उभी राहिली. पदवीधर तर सोडाच, मॅट्रिक झालेली सुद्धा हाताच्या बोटावर मोजता येतील एवढीच मुले गावात होती. सातवीच्या पुढे एकाही मुलीने शिक्षण घेतलेले नव्हते. बेळगुंदीपर्यंत सोळा किलोमीटरची पायपीट करून आम्ही काही जणांनी माध्यमिक शिक्षण घेतले. ते साऱ्यांना, त्यातही मुलीना मुळीच शक्य नव्हते. गुरुवर्य नेहमीच म्हणायचे,

'शाळा म्हणजे समाजाने समाजाच्या विकासासाठी सुरू केलेले संस्कार केंद्र!'

असं संस्कार केंद्र गावात सुरू करून गावच्या विकासात आपणही खारीचा वाटा का उचलू नये? शिवाय गुरुवर्यांना हवं असलेलं काही तरी वेगळं केल्याचं समाधानही मिळेल, मनात विचार येऊन गेला.

***

गुरुवर्यांच्या भेटीसाठी दिवसभर लोकांची रीघ लागलेली असायची – कुणी वैयक्तिक प्रश्न घेऊन, कुणी सामाजिक तर कुणी राजकीय! त्यामुळे त्यांच्याशी कांही बोलायचे म्हटले तर संध्याकाळशिवाय संधीच मिळत नसे. अशाच एका संध्याकाळी ते एकांतात बसलेले पाहून कचेरीत गेलो. ते वाचन करीत होते. त्यामुळे समोर घुटमळत उभा राहिलो. माझ्या मनात चाललेला गोंधळ ओळखून तेच म्हणाले,

'काही बोलायचे आहे का?'

'हो ऽ सर'

'मग बोल ना?'

'बेळवट्टीचे लोक गावात संस्थेचे हायस्कूल सुरू करायचे म्हणतात.' मी कचरतच म्हणालो नि त्यांच्या उत्तराची प्रतीक्षा करू लागलो. ते थोडा वेळ काहीच बोलले नाहीत. त्यांच्या उत्तराची उत्कंठा लागली.

एखादा विचार मनात आला; तरी तो कृतीत आणून यशस्वी करणं कठीण असतं.' त्यात सरकार आणि समाजाचीही अनास्था! ....... सारेच कांही

अवघड! त्या काळात पाच वर्षे शाळा विनाअनुदानित चालवावी लागे. त्यानंतरही सरकार वेळेत अनुदान मंजूर करीलच याची खात्री नव्हती. अशा परिस्थितीत गुरुवर्य शाळा सुरू करण्यास अनुमती देतील? मनात शंकेची पाल चुकचुकत होती. त्यांचे मार्गदर्शन नि आशीर्वादातच मोठी शक्ती होती. अनेक अशक्य गोष्टी त्यांनी शक्य करून दाखविल्याचे आम्ही पाहत होतो. यासाठीच त्यांच्या होकाराची मला प्रतीक्षा होती.

'हायस्कूलसाठी मुलांची आवश्यक संख्या मिळू शकेल?' त्यांनी बऱ्याच वेळानंतर प्रतिप्रश्न केला. मला थोडे हायसे वाटले. मी लागलीच म्हणालो,

'हो ऽ ....., शेजारी इनाम बडस, बाकनूर, शिवाय खानापूर तालुक्यातील काही गावे आहेतच.'

'....... ठिक आहे, मग कामाला लाग. मात्र यात तुझी कसोटी लागणार आहे, हे ध्यानात ठेव.'

गुरुवर्यांची इच्छा म्हणजे आम्ही आदेश मानायचो. मी परत गावी गेलो. सरपंचांसह गावातील प्रमुख मंडळींशी चर्चा केली. कुणाचा विरोध होण्याचे कारणच नव्हते.

'यातलं आमास कायबी कळायचं न्हाय. गावच्या पोरांचं भलं व्हणार अस्याल तर शाळा काडूस काय हरकत हाय? ' बहुतेकांचं हेच उत्तर.

परंतु 'स्वत:ला करवत नाही नि दुसऱ्याने केलेले पहावत नाही,' अशी काही मंडळी प्रत्येक गावात असतातच. गावात युवक संघाची स्थापना करून सार्वजनिक कार्यात मी पुढाकार घेत होतो; तेव्हापासून काही मंडळी माझ्यावर टवकारून होती. पुढारपण ही आपली मक्तेदारी मानणारे पडद्यामागून विरोध करीत होते.

'आजकालचं हे पोरगं लई शेफारलंय' म्हणून हेटाळणी करीत होते; माझ्या कानावर ही गोष्ट होतीच. अशा मनोवृत्तीच्या लोकांकडे लक्ष दिल्यास आपल्या हातून काहीच होणार नाही हे मी जाणून होतो. शिवाय आम्ही कोणती वाईट गोष्ट करणार नव्हतो. गावच्या पोरांचा, गावचाच यात फायदा होता.

गुरुवर्यांचा होकार हीच आमची शक्ती. अडचणीत ती आम्हाला अनामिक ऊर्जा, प्रेरणा देई. मनाचा निर्धार केला नि कामाला लागलो.

१९८३ चे ते वर्ष! एक जूनला प्रारंभोत्सवासह हायस्कूल सुरू करण्याचे नियोजन केले. कार्यक्रमाला कुणी बडी मंडळी येणार नव्हती. बेळवट्टी, इनाम बडस व बाकनूरमधील प्रमुख मंडळींना निमंत्रित केले. लक्ष्मी मंदिरात सारी

मंडळी उपस्थित झाली. गावात हायस्कूल सुरू होणार याचा बहुतेकांना आनंद झाला होता. सरपंच, उपसरपंच हेच कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे. उद्‌घाटनाच्या थाटामाटापेक्षाही प्रत्यक्ष कार्य आम्हाला महत्त्वाचे होते. त्यामुळे कार्यक्रम साधेपणानेच करण्याचे योजिले होते. सरपंच आणि उपसरपंचांच्या हस्ते सरस्वती पूजन आणि हायस्कूलचे उद्‌घाटन झाले.

प्रास्ताविकातच मी हायस्कूल सुरू करण्यामागचा उद्देश स्पष्ट केला होता. प्रारंभीची पाच वर्षे शाळा विनाअनुदानित तत्त्वावर चालवायची होती. शिक्षक, शाळेसाठी इमारत नि इमारतीसाठी जागा, शैक्षणिक साहित्य... नाना प्रश्न समोर होते. त्यांना तोंड देत उद्दिष्टपूर्ती करावयाची होती.

गावात हायस्कूल सुरू होणार या कल्पनेनेच लोक भारावून गेले. उदार मनाने त्यांनी देणग्याही जाहीर केल्या. त्या मिळाल्या असत्या. तर त्या वेळीच शाळेची सुसज्ज इमारत उभी राहिली असती. पण .......

'देणग्या जाहीर करण्यासाठी असतात; देण्यासाठी नसतात' असं कुणी तरी गमतीनं म्हणालं नि नेमकं तसंच घडलं. परंतु लोकांच्या आर्थिक मदतीपेक्षा त्यांच्या सदिच्छा नि सहकार्य आम्हाला महत्त्वाचं होतं.

आठवीचा वर्ग लक्ष्मीदेवीच्या मंदिरात सुरू झाला. लक्ष्मीदेवीने सरस्वतीदेवीला आपल्या ठायी स्थान दिले. दोन्ही देवता एकत्र नांदल्या, तर प्रगतीचा मार्ग सुलभ होतो म्हणतात. आता त्याचीच आम्हाला प्रतीक्षा होती. मार्ग खडतर होता; तरीही वाटचाल सुरू झाली.

चांगल्या कार्यात अडथळे आणणारेही कमी नसतात. शाळा सर्वांसाठी होती; त्याचे सोयरसुतक नसलेले लोक आपल्या मुलांना बेळगुंदी, बेळगावला पाठवू लागले. सरकारी मान्यतेसाठी विद्यार्थ्यांची संख्या कमी पडू नये म्हणून आम्ही त्यांची मनधरणी केली; परंतु त्यांची साथ काही मिळाली नाही.

'ही शाळा...? हे खुटलं धड व्हईल गा ऽ!'

'कुठे इंद्राचा ऐरावत नि कुठे श्यामभटाची तट्टाणी!'

असे त्यांचे खोचक आणि उपहासात्मक टोमणे मनाला बोचणी देत. परंतु मन विचलित करून चालणार नव्हते. एका अर्थाने त्यांचं बोलणं खरं होतं. आमच्या पदरात ऐरावतच नव्हे; तर साधी तट्टाणीही नव्हती....... परंतु निर्मळ मनाने नि प्रामाणिकपणे प्रयत्न केल्यास अडचणीतूनही मार्ग निघतो, उद्दिष्टप्राप्ती होते; असे गुरुवर्य म्हणत. आमची त्याच दिशेने वाटचाल सुरू होती.

***

लक्ष्मीदेवी, गावचं आराध्य दैवत! मंदिरात लोकांची सारखी ये-जा असायची. परिणामी विद्यार्थ्यांचं लक्ष अध्ययनापेक्षा मंदिरातील पूजा-अर्चेकडेच अधिक जायचे. त्यामुळे मंदिराला लागूनच असलेल्या धर्मवीर संभाजी युवक संघाच्या कार्यालयात वर्ग स्थलांतरित केला. युवक संघाचा मीच अध्यक्ष असल्याने तेथे वर्ग चालविण्यास कुणाचा विरोध झाला नाही. परंतु जागा अडचणीची. त्यामुळे वर्ग चालविणे अवघड होऊ लागले. पहिल्या वर्षी कसेबसे चालले. दुसऱ्या वर्षी नववीचा वर्ग वाढला. संघाच्या दोन खोल्यांतून दोन वर्ग सुरू केले. शिक्षकांना बसण्यासाठी मंदिराचाच आसरा घ्यावा लागला. विनाअनुदानित शाळेत सेवाभावी वृत्तीने काम करणारे शिक्षकही त्या काळात मिळणे कठीण! तरीही सुरवातीला दोघा स्थानिक शिक्षकांची मोलाची साथ मिळाली. शाळा स्थिर होईपर्यंत पहिली दोन वर्षे मी कंग्राळीला अर्धा दिवस व बेळवट्टीला अर्धा दिवस अध्यापन केले. संस्थेनेच मला तसे सुचविले होते.

तिसऱ्या वर्षी दहावीचा वर्ग सुरू झाला. त्यामुळे शाळेला स्वतंत्र इमारतीची गरज भासू लागली. देणगी व स्वत:च्या योगदानातून इमारत बांधण्याचा संस्थेने निर्णय घेतला; परंतु त्यासाठी जागा? एक नवा यक्ष प्रश्न! जागा मिळविण्याची जबाबदारी गुरुवर्यांनी माझ्यावर सोपविली.

अलीकडेच गावचे पुनर्वसन झाले होते. गावच्या सभोताली बक्कळ मोकळी जागा होती. परंतु विघ्नसंतोषी लोक जागा देण्यास विरोध करणार हे नक्की होते. समाजाच्या हितासाठी नि:स्वार्थ भावनेने केलेल्या कार्यात कुणी अडथळा आणला तरी त्याला तेवढाच प्रतिकार करण्याचा सल्ला गुरुवर्य सातत्याने देत असत. शाळा कुणाची यापेक्षा ती कुणासाठी...? हे महत्त्वाचे होते. म्हणून गावच्या पूर्वेला असलेल्या सार्वजनिक जागेवर शाळेची इमारत बांधण्याचा आम्ही निर्धार केला. त्यासाठी ग्रामपंचायतीला विश्वासात घेणे आवश्यक होते. सरपंचांची भेट घेऊन त्यांच्या कानावर ही गोष्ट घातली.

सरपंच सरळमार्गी, चांगल्या कामाला त्यांची नेहमीच साथ असायची. परंतु जागेबाबतची संभाव्य भीती त्यांनी बोलून दाखविली. ते म्हणाले,

'मास्तर, लोक खऱ्यातले न्हाईत. बांधकाम सुरू करताच भांडण काढल्याशिवाय ऱ्हाणार न्हाईत.'

'नाना'- आम्ही त्यांना 'नाना' म्हणत असू,- 'आम्ही आमच्या स्वार्थासाठी

कांही करीत नाही. शाळा गावचीच आहे नि मुलंही गावचीच शिकणार आहेत. तुम्ही हो म्हणा; पुढचं आम्ही पाहतो.'

ठरले! शाळेच्या दृष्टीने योग्य जागेची निवड केली नि गवंडी मेस्त्रीला घेऊन इमारतीसाठी आरेखनही निश्चित केले.

दुसऱ्याच दिवशी गावातील प्रमुख मंडळींना भूमिपूजनाचे निमंत्रण धाडले. सारी मंडळी नियोजित वेळेत, नियोजित स्थळी उपस्थित झाली. निमंत्रितांशिवायही काही अन्य लोकही कार्यक्रमाला उपस्थित होते. त्यांच्यात चाललेली कुजबूज माझ्या नजरेतून सुटली नाही. परंतु अशा गोष्टीकडे लक्ष देऊन आता भागणार नव्हते. मी साऱ्यांचे स्वागत करून सरपंचांना भूमिपूजन करण्याची विनंती केली.

'नाना, भूमिपूजन करा.'

'चेअरमन ऽ ऽ, इचार करून पूजा करा. हे पाटील लोकांचे प्लॉट हाईत,' कुजबुजणाऱ्या घोळक्यातून आवाज आला. त्याबरोबर पूजा करणारे सरपंच थबकले.

'जागा गावची; गावच्याच भल्यासाठी आपण तिचा वापर करतोय,' मी संयमानेच म्हणालो. त्यावर काही जणांनी मला साथ दिली.

'आम्ही सरपंचांना सांगतोय .....,' एकजण तुसडेपणानेच बोलला.

शब्दांनी शब्द वाढायला नको; म्हणून सरपंचांनी साऱ्यांना शांत केले. यावर चर्चा करून मार्ग काढू, असे सांगितल्यावर असंतुष्ट घोळका फुरफुरत निघून गेला.

गावच्या पुनर्वसनावेळी या जागेवर पाटील लोकांसाठी भूखंड पाडण्यात आले होते; परंतु त्यांनी हे भूखंड सोडून गावच्या पश्चिमेला असलेले पर्यायी भूखंड ताब्यात घेतले होते. त्यामुळे या जागेवर आता त्यांचा हक्क राहिलेला नव्हता. भांडण काढणाऱ्यांना निमित्त मात्र हवे होते.

***

भूमिपूजन झाले, तीन खोल्यांची छोटी इमारत उभी राहिली. त्यात शाळेचे तीन वर्ग सुरू झाले; पाच वर्षे सर्व काही सुरळीत होते. अधून-मधून विघ्नसंतुष्टांची धुसफूस ऐकू यायची; परंतु त्यामध्ये आता जोर राहिला नव्हता.

शाळा अनुदानास पात्र ठरणार होती. लवकरच अनुदान मंजूर होईल या आशेने शिक्षकही उमेदीने अध्यापन करीत होते.

एक दिवस रात्री घरच्या मंडळींशी गप्पा मारीत बाहेरच्या कठड्यावर बसलो होतो. शाळेचा शिपाई दबकत–दबकत आला. तो काहीसा गोंधळलेला होता. नेहमीप्रमाणे मी त्याची चेष्टा केली; परंतु त्याने पूर्वीप्रमाणे प्रतिसाद दिला नाही.

'सर, आत चला. थोडे बोलायचे आहे,' तो म्हणाला.

मी त्याला खोलीत घेऊन गेलो. आजुबाजूला कोणी नसल्याची खात्री करून तो म्हणाला,

'परवा शाळेत पार्टी झाली.'

'कुणाची?' माझा प्रश्न

'संस्थेचे... डायरेक्टर आले होते. शाळेचे मास्तर नि गावातली 'अमुक, अमुक' पोरं बी हजर होती' तो.

त्यांची नावे ऐकताच पुन्हा कांही गडबड असल्याचे मी जाणले. याच संचालकांनी गावातील विघ्नसंतुष्ट पोरांना पुढे करून मध्यंतरी वेगळे हायस्कूल सुरू करण्याचा प्रयत्न केला होता. गावची साथ न मिळाल्याने त्यांचा तो प्रयत्न फसला. आपले नाव न सांगण्याच्या अटीवर तो पुढे म्हणाला,

'शाळेच्या हजरी पुस्तकांतून ... याचे नाव कमी करून ...... याचे नाव दाखविण्यात आले आहे.'

हे सारे ऐकून मन सुन्न झाले. पुढे काहीच बोलवेना. मला एकांत हवा होता. शिपायास जाण्यास सांगून काही वेळ शांत बसून राहिलो. डोकीत विचारचक्र सुरू झाले. पाच वर्षे शाळा कुठे आहे, या संचालकांनी पाहिलेही नव्हते. मग आत्ताच हस्तक्षेप कशापायी...? मनात नानाप्रश्न येऊ लागले...संचालक ज्येष्ठ आणि संस्थापकांच्या जवळचे! त्यांच्या हस्तक्षेपास विरोध करणे म्हणजे अनावश्यक संघर्ष... शिवाय संस्थाचालकांची साथ मिळाली तर ठीक, नाही तर...

व्यक्तीपेक्षा संस्था महत्त्वाची. आपल्या हातून एक चांगले कार्य घडले, यातच समाधान मानायचे; असा मनात विचार केला. हायस्कूल गावात स्थिरावले होते. आता माझ्या सहकार्याची गरजही नव्हती. शाळेच्या कामकाजापासून मी स्वत:हून दूर झालो.

शाळेच्या अंगणात आनंदाने बागडणारी, खेळणारी मुले पाहून आज मला एक अव्यक्त समाधान मिळते... ही माझी शाळा!